कृषीवल

रायगड, रविवार, दि. १५ मार्च २०२६

किंमत ४ ₹

## कोल्हापुरात वादळी वाऱ्यासह अवकाळी

**कोल्हापूर :** राज्यातील अनेक भागात तापमान ४० अंशांच्या पुढे गेले असून, अकोला येथे तापमान ४१ अंशांवर पोहोचले आहे. उष्णतेमुळे नागरिक त्रस्त झाले असून, दुपारच्या वेळी बाहेर पडणे टाळले जात आहे. दरम्यान, कोल्हापूर जिल्ह्यात अचानक वातावरणात बदल झाला. करवीर तालुक्यात सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पाऊस आणि काही ठिकाणी गारपीट झाली. या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असला तरी काही भागांत झाडे उन्मळून पडणे, घरांचे कौल उडणे व पत्र्याच्या शेड नुकसान होण्याच्या घटना घडल्या.

## पनवेलकरांना गढूळ पाण्याचा पुरवठा

**पनवेल :** पनवेल परिसरात जलवाहिनी दुरुस्तीच्या कामासाठी तब्बल ३६ तास पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला होता. मात्र, पाणीपुरवठा पुन्हा सुरू झाल्यानंतर अनेक भागांमध्ये गढूळ व पिवळसर पाणी येत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. जलवाहिनी दुरुस्तीच्या कामामुळे काही भागात पाणीपुरवठा पूर्णपणे बंद ठेवण्यात आला होता. दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर पाणीपुरवठा सुरू झाला असला तरी सुरुवातीला पाइपलाईनमधील गाळ आणि मातीमुळे पाणी गढूळ येत असल्याचे दिसून आले. अनेक नागरिकांनी घरातील बादल्या, टाक्या आणि भांड्यांमध्ये साठवलेले पाणी पूर्णपणे तपकिरी आणि गढूळ पान २ वर

**वे|ध|क**

### महामार्गावर वाहतूक कोंडी

**मुंबई :** मुंबई-गोवा महामार्गावर माणगावजवळ मोठी वाहतूक कोंडी झाल्याने प्रवाशांना तासनतास अडकून पडावे लागले. माणगाव ते खरवली फाटा या दरम्यान सुमारे तीन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. सुट्टीच्या दिवशी मोठ्या संख्येने पर्यटक मुंबई आणि परिसरातून कोकणाकडे निघाल्याने महामार्गावर अचानक वाहनांची गर्दी वाढली. त्यामुळे वाहतूक मंदावून काही वेळातच मोठी कोंडी निर्माण झाली. कोंडीत कार, बस, पर्यटकांची खासगी वाहने तसेच मालवाहू वाहनांची मोठी रांग लागल्याचे दिसून आले. उकाड्यात दीर्घकाळ रस्त्यावर थांबावे लागल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला. दरम्यान, वाहतूक सुरळीत करण्यासाठी स्थानिक पोलिसांकडून प्रयत्न सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.

### युद्धाचा जेएनपीए बंदराला फटका

**उरण :** जेएनपीए बंदरातील कंटेनर वाहतुकीवर मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम दिसू लागला आहे. इराण, अमेरिका-इस्त्रायल यांच्यातील तणावामुळे १ मार्चपासून बंदरातील मालवाहतुकीत घट झाली आहे. यापूर्वी दररोज सरासरी सुमारे २३ हजार कंटेनर्सची वाहतूक होत होती. मात्र, सध्या ही संख्या सुमारे २० हजारांवर आली असून, दररोज सुमारे तीन हजार कंटेनरने घट झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वाहतूकदारांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. दरम्यान, या बंदरातून विशेषतः रमजानच्या काळात आखाती देशांकडे केळी, द्राक्षे, कांदा आणि बासमती तांदळाची मोठ्या प्रमाणात निर्यात केली जाते. मात्र, सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्यात प्रक्रियेवरही परिणाम होत असल्याची माहिती मिळत आहे.

# प्रकल्प मोठा, रोजगार छोटा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील थळ येथील आरसीएफ प्रकल्पामध्ये नवा एनपीके (नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशिअम) खत उत्पादन प्रकल्प उभारला जात असून, सुमारे ९०० कोटी रुपयांची गुंतवणूक या प्रकल्पासाठी करण्यात येत आहे. पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असलेली मुख्य अन्नद्रव्ये पुरविणारे खत तयार करण्यासाठी हा प्रकल्प उभारला जात असून, खतांच्या वाढत्या मागणीचा विचार करून थळमध्ये औद्योगिक विस्ताराचा हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. मात्र, एवढ्या मोठ्या गुंतवणुकीच्या प्रकल्पातून फक्त ३० जणांनाच कायमस्वरूपी नोकरी मिळणार असल्याची माहिती समोर येत असल्याने स्थानिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

हजारो कोटींच्या प्रकल्पातून स्थानिक तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळेल, अशी अपेक्षा असताना बहुतांश कामे कंत्राटी पद्धतीने होणार असल्याचे स्पष्ट होत आहे. यामुळे थळ आणि परिसरातील




- मार्च २०२७ पर्यंत प्रकल्प कार्यान्वित होण्याची शक्यता
- पिकाच्या वाढीसाठी आवश्यक मुख्य अन्नद्रव्य पुरविणारा हा प्रकल्प
- आरसीएफ कंपनीच्या प्रशासनाकडून माहिती

### आधुनिक तंत्रज्ञानामुळे मनुष्यबळाची गरज कमी

थळ येथील आरसीएफ कंपनीच्या जागेमध्ये सुमारे पाच एकर जागेमध्ये एनपीके अर्थात नायट्रोजन-फॉस्फरस-पोटॅशिअम खत प्रकल्प उभा राहणार आहे. हा प्रकल्प आधुनिक तंत्रज्ञानावर अधारित आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ९०० कोटी रुपयांचा खर्च आहे. या प्रकल्पाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या प्रकल्पामध्ये ३० जणांना कायम नोकरी असणार असून, अन्य जणांना कंत्राटी स्वरुपात नोकरी प्राप्त होणार आहे. हजारो हातांना या प्रकल्पाच्या माध्यमातून काम मिळणार असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. मात्र, हा प्रकल्प होत असताना स्थानिकांना प्राधान्याने नोकरीत सामावून घेण्याबरोबरच त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी कंपनी प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे, असे बोलले जात आहे.

### स्थानिकांना रोजगार द्या, शेकापची मागणी

थळ येथील आरसीएफ कंपनीमध्ये कार्यरत असलेले अनेक स्थानिक कर्मचारी निवृत्तीच्या उंबरठ्यावर पोहोचत आहेत. परिसरातील अनेक तरुण सध्या अभियांत्रिकी, तांत्रिक आणि पदवीधर शिक्षण पूर्ण करूनही रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत. स्थानिकांच्या जमिनी आणि परिसरावर उभारले जाणारे औद्योगिक प्रकल्प असताना रोजगाराच्या संधींमध्येही स्थानिकांना हक्क मिळालाच पाहिजे. त्यामुळे कंपनीमध्ये निर्माण होणाऱ्या नव्या रिक्त पदांवर स्थानिक तरुणांना प्राधान्याने संधी द्यावी, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

नागरिकांकडून स्थानिकांना प्राधान्याने कायमस्वरूपी रोजगार द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. औद्योगिक प्रकल्प उभारले जात असताना स्थानिकांच्या रोजगाराचा प्रश्नही सोडविणे पान २ वर

# गॅस पुरवठ्यावर सरकारची ‘मात्रा’

**एलपीजी वितरणाबाबत नवी नियमावली जारी**




**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यात निर्माण झालेल्या गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने एलपीजी गॅस वितरणाबाबत नवी नियमावली जारी केली आहे. अत्यावश्यक सेवांमध्ये अडथळा निर्माण होऊ नये यासाठी विविध क्षेत्रांसाठी गॅस पुरवठ्याचे प्रमाण निश्चित करण्यात आले आहे.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने पान २ वर

### असे होणार वितरण

- **१०० टक्के पुरवठा :** सरकारच्या नव्या नियमांनुसार रुग्णालये, शैक्षणिक संस्था, सार्वजनिक सेवा, स्मशानभूमी, वृद्धाश्रम आणि अनाथाश्रम.
- **७० टक्के पुरवठा :** उपाहारगृहे, संरक्षण क्षेत्र, शासकीय व सार्वजनिक क्षेत्रातील संस्था, रेल्वे, हवाई वाहतूक, पोलीस आणि तुरुंग.
- **५० टक्के पुरवठा :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, औषध उद्योग, बीज प्रक्रिया उद्योग आणि मत्स्यपालन क्षेत्र.

> आखाती देशातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील गॅस आणि इंधन पुरवठ्याबाबत अनेक संभ्रम आणि अफवा राज्यात पसरल्या आहेत. राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नसून, नागरिकांनी इंधन किंवा गॅस तुटवड्याबाबत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये.
> – छगन भुजबळ, अन्न व नागरी पुरवठा मंत्री

# कर्जतमध्ये हनीट्रॅप टोळीचा पर्दाफाश

**‘बंटी-बबली’सह दोघे अटकेत, तिसरा फरार**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत रेल्वे स्थानकावर बोलावून एका तरुणाचे अपहरण करून हनीट्रॅपच्या माध्यमातून सोन्याचे दागिने, रोख रक्कम आणि ऑनलाइन कर्ज काढून लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा कर्जत पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी एका महिलेसह तिच्या साथीदाराला अटक करण्यात आली असून, तिसरा आरोपी फरार आहे.

८ मार्च रोजी आरोपी आदिती रमेश ढोके (२५) हिने फिर्यादी तरुणाला कर्जत रेल्वे स्थानकावर भेटण्यासाठी बोलावले. त्यानंतर तिचे साथीदार सुशील देवराम जाधव (२९) आणि गणेश उर्फ मंगेश गजानन प्रधान यांच्या मदतीने त्या तरुणाला जबरदस्तीने पांढऱ्या रंगाच्या कारमध्ये बसवून भिसेगाव येथील न्यू बिकानेर स्वीट्स परिसरातून अज्ञात ठिकाणी नेण्यात आले. ९ मार्चच्या सकाळपर्यंत फिर्यादीला आदिती ढोके हिच्या फ्लॅटमध्ये डांबून ठेवण्यात आले. आरोपींनी चॉपरचा धाक दाखवत मारहाण केली आणि जीवे मारण्याची धमकी देत सुमारे १ लाख ८० हजार रुपये किमतीची सोन्याची चेन व दोन अंगठ्या, तसेच १५ हजार रुपये रोख लुटले. याशिवाय आधार कार्ड, पॅन कार्ड, चार डेबिट कार्ड आणि एक क्रेडिट पान २ वर

## तोतयागिरी करुन नागरिकांना त्रास

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर तालुक्यात अरेरावी, धमक्या आणि तोतया पदांच्या नावाखाली नागरिकांना त्रास देणाऱ्या बापलेकांच्या कारवायांवर अखेर ‘आपली माती आपली माणसं’ सामाजिक संघटनेने लगाम घातला. तोतया पत्रकार, तोतया पीएसआय आणि आता ‘डॉक्टर’ म्हणून वावरणाऱ्या अनिकेत मेस्त्रीच्या नव्या अवतारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलादपूर शहरात गेल्या काही वर्षांपासून प्रदीप मेस्त्री उर्फ सुतार हा कधी दुबई रिटर्न, कधी कॉम्प्युटर, सिव्हिल किंवा आयटी इंजिनियर, कधी भाजप कार्यकर्ता, कधी संभाजी ब्रिगेड पदाधिकारी तर कधी पत्रकार असल्याचे सांगत वावरत होता. पान २ वर

# ‘एनआरएचएम’चे कर्मचारी वेतनाविना

**दोन महिन्यांचे वेतन न दिल्याने उपासमारीची वेळ**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

एनआरएचएम अंतर्गत कंत्राटी कर्मचारी आरोग्य विभागात काम करीत आहेत. मात्र, या कर्मचाऱ्यांचे दोन महिन्यांचे वेतनच दिले नसल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असून, ते आर्थिक संकटात सापडले आहेत. हा विभाग सलाईनवर असल्याचे बोलले जात आहे.

शासनाच्या व जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात मनुष्यबळ कमी पडत होते. शेवटच्या घटकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविताना या कर्मचाऱ्यांना अडचण निर्माण झाली. त्यामुळे शासनाने कंत्राटी कर्मचारी नेमण्याचा निर्णय घेतला. एनआरएचएम अर्थात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य यंत्रणा अंतर्गत जिल्हा रुग्णालयापासून जिल्हा परिषदेच्या आरोग्य व उपकेंद्रामध्ये वेगवेगळ्या पदावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. ७५० कंत्राटी कर्मचारी काम करीत आहेत. आरोग्य विभागाच्या वेगवेगळ्या शाखेत हे कर्मचारी काम करतात. शासनाच्या वेगवेगळ्या आरोग्यविषयक योजना जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम या कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून केले जाते. परंतु, हेच कर्मचारी शासनाच्या उदासीनतेमुळे आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या कर्मचाऱ्यांचे जानेवारीपासून पान २ वर

जिवेत् शरदः शतम

गगनही ठेंगणे जिथे आकांक्षा पुढती,
कर्तृत्वाची नित्यनवी क्षितिजे खुणावती,
माणुसकीची ज्योत असे अखंड तेवती,
अशा वादळाची आली पंच्याहत्तरी



मा.श्री. विजय वनगे
यांना ७५ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
काळण समाज अलिबाग विभाग
लायन्स क्लब श्रीबाग सेंटिनिअल द्वारिका
को.ऑप.हौसिंग सोसा. स्नेहा अपार्टमेंट
कमल कुंज को.ऑप.हौसिंग सोसा. चेंढरे
‘एव्हरग्रीन इलेक्ट्रॉनिक्स’ कर्मचारी वृंद

# वणव्यामुळे रायगडाचा जीव गुदमरतोय!

**। महाड । प्रतिनिधी ।**

- धनगर बांधवांच्या प्रयत्नांनी आग आटोक्यात

स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्याच्या दक्षिण भागात काही दिवसांपूर्वी भीषण वणवा लागल्याची घटना समोर आली आहे. डोंगर उतारावर धगधगणाऱ्या आगीचे दृश्य सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर शिवप्रेमींमध्ये तीव्र भावना व्यक्त होत आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, वाघोली हद्दीतील दरीत लागलेला वणवा पुढे रायगडाच्या दक्षिणेकडील डोंगर उतारावर पसरला. ही आग पुढे भवानी टोक आणि काळा हौद परिसरापर्यंत पोहोचल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. रात्रीच्या अंधारात डोंगर उतारावर धगधगणारी आग दूरवरूनही दिसत होती. या घटनेचे काही व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर इतिहासातील पोटल्याच्या डोंगरावरून रायगडावर तोफांचा मारा झाल्याच्या घटनेची आठवण अनेक शिवप्रेमींनी व्यक्त केली. त्यामुळे या वणव्याबाबत मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू झाली.

दरम्यान, किल्ल्यावर वास्तव्यास असलेले धनगर बांधव आणि पुरातत्त्व विभागाच्या कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत तातडीने वणवा विझवण्याचे प्रयत्न केले. त्यांच्या शर्थीच्या प्रयत्नांमुळे अखेर आग आटोक्यात आणण्यात यश आले.

सुदैवाने या आगीत किल्ल्यावर असलेल्या ऐतिहासिक वास्तूंना कोणतीही हानी झाली नसल्याची माहिती मिळाली असून, मोठा अनर्थ टळला आहे. मात्र, या घटनेमुळे रायगड परिसरातील वनसंवर्धन आणि सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.



वरदाई चॅरिटेबल ट्रस्ट रोहा व द युनिक ॲकॅडमी, पुणे संचलित

सुनील द. तटकरे स्पर्धा परीक्षा ॲकॅडमी रोहा
व
आय.ई.एस.पी.संस्थेचा
लोकार्पण सोहळा

आदरणीय खा. श्री. सुनीलजी तटकरे साहेब
लोकसभा सदस्य,
चेअरमन, भारतीय पेट्रोलियम व गॅस नियामक मंडळ
यांच्या शुभहस्ते

मा.सौ. वरदा सुनील तटकरे
विश्वस्त, वरदाई चॅरिटेबल ट्रस्ट

मा.ना.कु. अदिती वरदा सुनील तटकरे
मंत्री, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य
यांच्या अध्यक्षतेखाली

मा. आँचल दलाल (भा.पो.से.)
पोलीस अधीक्षक, रायगड

मा.श्री. मनोज सौनिक (भा.प्र.से.)
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
यांच्या विशेष उपस्थितीत


: आपले विनीत :

श्री. अनिकेत सुनील तटकरे
विश्वस्त

सौ. वेदांती अनिकेत तटकरे
विश्वस्त

वरदाई चॅरिटेबल ट्रस्ट रोहा

मान्यवरांचे हार्दिक स्वागत



ठिकाण : परमपूज्य पांडुरंग शास्त्री आठवले संकुल रोहा.
रविवार, दिनांक १५ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता

# प्रस्तावित शिलार धरणाला विरोध

## २४ गावांतील शेतकऱ्यांचा १७ मार्चला तहसीलवर मोर्चा

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील चिल्हार नदीवर किकवीशिलार परिसरात प्रस्तावित शिलार धरणाला विरोध करण्यासाठी २४ गावांतील आणि वाड्यांमधील शेतकरी १७ मार्च रोजी कर्जत येथे मोठा मोर्चा काढणार आहेत. या मोर्चासाठी मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी होणार असल्याने कर्जत शहरात अभूतपूर्व गर्दी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



शासनाकडून स्थानिक शेतकऱ्यांची संमती न घेता धरण उभारण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. प्रस्तावित शिलार धरणामुळे अनेक शेतकरी भूमिहीन होण्याची भीती व्यक्त केली जात असून, बाधित शेतकऱ्यांनी एकत्र येत 'शिलार धरण विरोधी कृती समिती' स्थापन केली आहे. या समितीच्या माध्यमातून १७ मार्च रोजी कर्जत तहसील कार्यालयावर मोर्चा काढून धरण प्रकल्प रद्द करण्याची मागणी करण्यात येणार आहे.

दरम्यान, या प्रकल्पाविरोधात रायगड जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले असून, मुंबई उच्च न्यायालयातही जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी धरणाविरोधात तीव्र आंदोलन छेडले असून, सर्व्हेक्षणासाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांनाही गावकऱ्यांच्या विरोधाला सामोरे जावे लागत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे जलसंपदा विभाग आणि संबंधित ठेकेदार कंपनीला काम पुढे नेता आलेले नाही.

कर्जत तालुक्यातील पाथरज, मोगरज, जामरुंग, कशेळे आणि रजपे या धरणग्रस्त गावांनी ग्रामसभेत धरणविरोधी ठराव मंजूर केले आहेत. तसेच शिलार, खरबाचीवाडी, किकवी-बोरवाडी, शिलारवाडी, धोत्रे, धोत्रेवाडी (१ व २), शिंगढोळ, टेंभरे, आंबीवली, भक्ताचीवाडी, पिंगळस, फणसवाडी (१ व २), खांदन (१ व २), कोठिंबे, आनंदवाडी, मोग्रज, भल्याचीवाडी, जाधववाडी, चौधरवाडी, धामणी आणि जांभूळवाडी या भागांतील शेतकरी मोर्चात सहभागी होणार आहेत.

हा मोर्चा कर्जत येथील छत्रपती संभाजी महाराज चौकातून निघणार असून, मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी होणार असल्याने कर्जत शहर शेतकऱ्यांनी फुलून जाणार असल्याचे चित्र आहे.

# मूलभूत प्रश्नांसाठी पल्लवी भोईर आक्रमक

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या पल्लवी प्रसाद भोईर यांनी अधिकृत कामकाजाच्या पहिल्याच दिवशी जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे लक्ष देत खारेपाट परिसरातील पाणीप्रश्न आणि शिहू-बेणसे भागातील वीज समस्येबाबत ठोस पावले उचलली. त्यांच्या या सक्रिय भूमिकेमुळे पेण तालुक्यासह संपूर्ण पेणसुधागडरोहा विधानसभा मतदारसंघात सकारात्मक चर्चा सुरू झाली आहे.

जिल्हा परिषदेत सत्तेच्या समीकरणांबाबत राजकीय घडामोडी सुरू असतानाच पल्लवी भोईर यांनी रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रसाद भोईर यांच्यासमवेत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नेहा भोसले यांची भेट घेतली. यावेळी पेण तालुक्यातील वाशी-शिर्की खारेपाट परिसरातील तीव्र पाणीटंचाईबाबत निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात पाणीपुरवठा व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेणे, वितरण व्यवस्था व पाइपलाइनचे स्वतंत्र तांत्रिक ऑडिट करणे, त्याचा अहवाल जिल्हा परिषदेला सादर करणे तसेच गावनिहाय पाणीपुरवठा वेळापत्रक जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे. हा मुद्दा जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत मांडून ठराव करण्याचीही मागणी करण्यात आली.



(छायाचित्र : धम्मशील सावंत)

जिल्हा परिषदेत सत्तासमीकरणांची चढाओढ सुरू असतानाही पल्लवी भोईर आणि प्रसाद भोईर यांनी जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य दिल्याने त्यांच्या पुढाकाराचे मतदारसंघात स्वागत आणि कौतुक होत आहे.

## घरफोडीतून रोख रक्कम, दागिने लंपास

**पनवेल :** घरफोडी करून चोराने ८० हजार रुपये रोख रक्कम आणि चांदीचे ताट, कॉईन, गळ्यातला सेट, अंगठ्या चोरून नेले. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रकाश अनवेकर हे आशीर्वाद रो हाऊस, सेक्टर १२, खारघर येथे राहात असून, ते अयोध्या येथे गेले होते. यावेळी एका मोलकरणीने त्यांना त्यांच्या घराच्या कोयंडा उचकटलेला असल्याचे सांगितले. ते चित्रकूट येथून विमानाने खारघरला आले. त्यावेळी चोराने चांदीचे ताट, वाट्या, चमचे, कमरपट्टा, कॉईन, गळ्यातला सेट, अंगठ्या आणि रोख रक्कम चोरून नेली. याप्रकरणी खारघर पोलीस तपास करीत आहेत.

# देशाच्या विकासात उद्योग, कामगारांचे मोठे योगदान

## ●उपसंचालक एल.के. गोराणे यांचे प्रतिपादन

। खोपोली । प्रतिनिधी ।

५५ व्या राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहानिमित्त खोपोलीजवळील होणाड येथील प्रासोल केमिकल्स लिमिटेड कंपनीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहादरम्यान सुरक्षा जनजागृती, प्रशिक्षण सत्रे, क्रीडा स्पर्धा तसेच कामगारांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम आयोजित करण्यात आले.

सुरक्षा सप्ताहात आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धांमध्ये यशस्वी ठरलेल्या कामगार व कर्मचाऱ्यांना ११ तारखेला आयोजित भव्य समारंभात पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला रायगड जिल्हा औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे उपसंचालक एल.के. गोराणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.




यावेळी मार्गदर्शन करताना गोराणे यांनी देशाच्या विकासात शेती आणि उद्योग या दोन्ही क्षेत्रांचे महत्त्व अधोरेखित केले. शेतकरी आणि कामगार यांच्या कष्टामुळेच देशाची प्रगती होत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रासोल केमिकल्स कंपनीत कामगारांच्या सुरक्षा व आरोग्याबाबत प्रभावी उपाययोजना राबविल्या जात असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच औद्योगिक क्षेत्रातील बदलत्या परिस्थितीत कामगार व कर्मचाऱ्यांनी सुरक्षा, पर्यावरण आणि आरोग्याबाबत सतर्क राहण्याचे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाला खोपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांचीही प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी उद्योगांना सुरक्षित आणि भयमुक्त वातावरण उपलब्ध करून देणे हे पोलिस प्रशासनाचे कर्तव्य असल्याचे सांगितले. प्रासोल कंपनीच्या सामाजिक बांधिलकीबरोबरच सुरक्षा उपाययोजनांचे त्यांनी कौतुक केले.

यावेळी होणाड समूह ग्रामपंचायतीचे सरपंच प्रकाश पाटील, साजगाव समूह ग्रामपंचायतीचे सरपंच विनोद खवळे, कंपनीचे संचालक राहुल श्राप, चेअरमन निशीत शाह तसेच निवृत्त व्यवस्थापकीय संचालक व वरिष्ठ सल्लागार गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी कंपनीच्या प्रगतीबरोबरच स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबतही कंपनीचे कौतुक केले.

याप्रसंगी सुरक्षा सप्ताहातील विविध स्पर्धांमध्ये यशस्वी ठरलेल्या कामगार व कर्मचाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

संपूर्ण सुरक्षा सप्ताह आणि पारितोषिक वितरण सोहळा कंपनीचे वरिष्ठ व्यवस्थापक विलास पाटील, सतीश ताकवले आणि सचिन प्रभू यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कंपनीचे ईएचएस प्रमुख व फॅक्टरी मॅनेजर अनिल सी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम यशस्वी झाला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सुरक्षा व फायर मॅनेजर दत्ताराम देशमुख, सेफ्टी विभागाची टीम, एचआर विभागाचे वरिष्ठ व्यवस्थापक संदीप खोपकर व व्यवस्थापक योगेश पाटील यांचे विशेष योगदान लाभले. सर्व विभागप्रमुख, कामगार प्रतिनिधी, कर्मचारी तसेच महिला कर्मचाऱ्यांच्या सहभागामुळे हा सुरक्षा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.

## क्षुल्लक कारणावरुन चॉपरने मारहाण

**पनवेल :** टपरी चालकाकडून घेतलेल्या सिगारेटच्या पैशांची विचारणा केली असता चॉपरसारख्या हाताने वार करून जखमी केल्याप्रकरणी दोघांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. फरहान हसन गोलंदाज हा तळोजा सेक्टर २२ येथे राहात असून, रेल्वे फाटक सेक्टर २१, फेस टू तळोजा येथे त्यांची पान टपरी आहे. यावेळी दोन अनोळखी इसम मोटार स्कुटीवरून आले आणि सिगारेट मागितले. पैशांची मागणी केली असता त्यांनी पैसे देण्यास नकार दिला आणि तेथून जाऊ लागले. यावेळी पैशांची मागणी केली असता एका इसमाने फरहान याच्यावर चॉपरसारखे हत्यार काढून डोक्यात आणि कपाळावर वार केला, तर दुसऱ्या इसमाने हाताने मारहाण केली.

# घरफोडी करणाऱ्यांना २४ तासांत अटक



●गुन्हे शाखेची उल्लेखनीय कारवाई

● ३० तोळे दागिने, सुमारे ३६ लाखांचा मुद्देमाल जप्त

। पनवेल । प्रतिनिधी ।

नवी मुंबई गुन्हे शाखेने घरफोडीच्या गुन्ह्यातील तीन आरोपींना अवघ्या २४ तासांत अटक करून सुमारे ३० तोळे वजनाचे, अंदाजे ३६ लाख रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने हस्तगत केले आहेत. या कारवाईमुळे घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

कळंबोली येथील सेक्टर १६ मधील पृथ्वी बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या रूबी संतोष पात्रो (४९) यांच्या घरात ९ मार्च २०२६ रोजी अज्ञात चोरट्यांनी घराच्या मुख्य दरवाजाचे लॅच तोडून प्रवेश केला. त्यानंतर घरातील सुमारे ३० तोळे सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण सुमारे ३६ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याबाबत कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# पोलादपूर एसटी स्थानकामागे कचऱ्याचे साम्राज्य

## ● जमीन मालकाच्या शेतजमिनीत कचरा टाकल्याचा आरोप

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

पोलादपूर एस.टी. स्थानकाची नवीन इमारत उभारल्यानंतर स्थानक परिसरातील कचरा थेट मागील बाजूस असलेल्या मूळ जमीनमालकाच्या शेतजमिनीत टाकला जात असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. यामुळे परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले असून, संबंधित जमीन मालकांनी कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.


(छायाचित्र : शैलेश पालकर)

पोलादपूर तालुक्याच्या मुख्य ठिकाणी असलेल्या बसस्थानकाची जुनी इमारत पाडून त्याठिकाणी नव्या व मोठ्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले. मात्र, स्थानक परिसरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न अद्याप कायम असून, हा कचरा स्थानकामागील मूळ जमीन मालकाच्या शेतजमिनीत टाकला जात असल्याची तक्रार करण्यात येत आहे.

या जागेच्या सातबाऱ्यानुसार सुंदर गणपत सोनार उर्फ पालकर यांच्या नावावर सुमारे ३५ गुंठे जमीन नोंद असून, त्यातील ४ गुंठे जमीन २०५ अ असा उल्लेख करून बॉम्बे स्टेट ट्रान्सपोर्टच्या नावावर दाखविण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या जागेवर एस.टी. कॅन्टीन, रसवंतीगृह तसेच काही टपऱ्यांना जागा देण्यात आल्याचेही सांगितले जाते.

# ११ ग्रामपंचायतींसाठी पोटनिवडणुकीची तयारी

। दिघी । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन तालुक्यातील ग्रामपंचायतीतील सदस्य किंवा थेट सरपंच यांच्या निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर कारणांमुळे रिक्त झालेल्या पदांसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील ११ ग्रामपंचायतींसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. याबाबतचे आदेश श्रीवर्धन तहसील कार्यालयाकडून मंडळ अधिकारी, तलाठी आणि संबंधित ग्रामसेवकांना देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ग्रामपंचायतींतील रिक्त पदांसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकांसाठी मतदार यादी तयार करण्याची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार आहे. यामध्ये तालुक्यातील आदगाव, वाकलघर, बागमांडला, हरवित, दांडगुरी, सायगाव, भरडखोल, शेखाडी, साखरोणे, कुडगाव आणि दिवेआगर या ११ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. या ग्रामपंचायतींसाठी प्रभागनिहाय मतदार यादी तयार करण्यात येणार असून, त्यासाठी १ जुलै २०२५ रोजीची मूळ मतदार यादी ग्राह्य धरण्यात येणार आहे. संबंधित ग्रामपंचायतींसाठीची मूळ मतदार यादी १० फेब्रुवारी २०२६ रोजी तहसील कार्यालय, श्रीवर्धन येथे उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी सोमवार, १६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर नागरिकांना हरकती व सूचना नोंदविण्यासाठी १६ ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मुदत देण्यात आली आहे. तहसीलदारांनी संबंधित मंडळ अधिकारी, तलाठी व ग्रामसेवकांना आदेशानुसार मतदार यादी तयार करून विहित नमुन्यात चार प्रतींमध्ये तहसील कार्यालयात सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

पान १ वरून

## पनवेलकरांना गढूळ पाण्याचा पुरवठा

असल्याचे सांगितले.या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सध्या येणारे पाणी उकळूनच पिणे किंवा वापरण्यापूर्वी गाळून घेणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. काही भागांमध्ये पाण्याचा रंग आणि गढूळपणा कमी होण्यासाठी काही काळ लागण्याची शक्यता असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. दरम्यान, अचानक गढूळ पाणी आल्यामुळे नागरिकांची गैरसोय झाली असून, पाणीपुरवठा पूर्णपणे स्वच्छ आणि नियमित करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. प्रशासनाने जलवाहिनीतील गाळ साफ करून लवकरात लवकर स्वच्छ पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## गॅस पुरवठ्यावर सरकारची 'मात्रा'

१३ मार्च रोजी परिपत्रक काढून राज्यातील गॅस वितरणासाठी नवे निर्देश जारी केले. या आदेशानुसार शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, शाळा वसतिगृहे, शासकीय खानावळी, मध्यान्ह भोजन योजना, अंगणवाड्या तसेच शैक्षणिक संस्थांमधील खानावळी यांना शंभर टक्के गॅस पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

राज्यात काही ठिकाणी गॅस टंचाई निर्माण झाल्यामुळे ग्राहकांना सिलिंडरसाठी रांगा लावाव्या लागत असल्याच्या पार्श्वभूमीवर सरकारने हा निर्णय घेतला आहे. तसेच गॅसची साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून विशेष पथकांमार्फत तपासणीही सुरू आहे. सरकारच्या नव्या निर्णयामुळे अत्यावश्यक सेवा सुरळीत राहतील आणि गॅस टंचाईचा त्यांच्यावर परिणाम होणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

**रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत**

राज्यात घरगुती एलपीजीची दैनंदिन मागणी ९,००० मेट्रिक टन असताना, उत्पादन वाढवून ते ११,००० मेट्रिक टनांपर्यंत नेले आहे. मार्च महिन्यात गेल्या सहा महिन्यांच्या तुलनेत अधिक प्रमाणात सिलिंडर उपलब्ध आहेत. पेट्रोल आणि डिझेलचाही पुरेसा साठा उपलब्ध असून, रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. त्यामुळे घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याबाबत नागरिकांनी निश्चिंत राहावे, अशी माहिती अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली.

**जिल्हास्तरावर विशेष समिती**

गॅस पुरवठा साखळीवर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांच्या नेतृत्वाखाली विशेष समित्या स्थापन केल्या आहेत. रुग्णालये, शाळा, आश्रमशाळा आणि अत्यावश्यक सेवांना गॅस पुरवठा प्राधान्याने मिळेल, याची चोख व्यवस्था करण्यात आली आहे. कोणत्याही तांत्रिक अडचणी किंवा तक्रारींसाठी तालुका व जिल्हा स्तरावर नियंत्रण कक्ष आणि व्हॉट्सअॅप सुविधा तातडीने कार्यान्वित करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे मंत्री भुजबळ यांनी सांगितले.

## प्रकल्प मोठा, रोजगार छोटा

आवश्यक असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे. आरसीएफ अर्थात राष्ट्रीय केमिकल्स अॅन्ड फर्टिलायझर्स लिमिटेड ही भारत सरकारची एक प्रमुख नवरत्न सार्वजनिक उपक्रम कंपनी म्हणून ओळखली जाते. अलिबाग तालुक्यातील थळ येथे सातशे एकर क्षेत्रामध्ये युरिया खतनिर्मिती करणारा प्रकल्प या कंपनीमार्फत चालविला जात आहे. खतनिर्मिती प्रकल्पाचे काम होत असताना सामाजिक जबाबदारीतून या प्रकल्पाच्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले आहे. ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण, कौशल्य विकास, शिक्षण, फिरते दवाखाना, शासकीय प्राथमिक, आरोग्य केंद्रासह जिल्हा रुग्णालयांना मदतीचा हात देण्याचे काम या प्रकल्पाच्या माध्यमातून करण्यात आले असल्याची माहिती कंपनीकडून देण्यात आली आहे. थळ येथील कंपनीच्या क्षेत्रात आणखी एक नवा प्रकल्प उभा करण्यात येणार आहे. प्रकल्पामुळे देशातील संमिश्र खतांच्या उत्पादन क्षमतेत मोठी वाढ होणार आहे. या औद्योगिक प्रकल्पामुळे स्थनिक पूरक उद्योगांना चालना, प्रादेशिक आर्थिक विकास व देशाच्या कृषी क्षेत्राला बळकटी देण्याचा प्रयत्न राहणार आहे. रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात भातपिकांची लागवड केली जाते. तसेच भाजीपाला व अन्य पिकांची लागवड करण्यावर भर दिला जात आहे. पिकांच्या वाढीसाठी आवश्यक मुख्य अन्नद्रव्य पुरविणारा हा प्रकल्प असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

## 'एनआरएचएम'चे कर्मचारी वेतनाविना

मानधनच दिले नसल्याची माहिती समोर आली आहे. शासनाकडून निधी न आल्याचा फटका या कर्मचाऱ्यांना बसला आहे. महिन्यातील आर्थिक खर्चाचा ताळमेळ बिघडू लागला आहे. कर्ज काढलेल्या कर्मचाऱ्यांना बँकाचा हप्ता देतानाही अडचणी निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊ लागली आहे. मार्च महिना संपत आला आहे, त्यामुळे वेतनासाठी आणखी किती दिवस वाट पाहावी लागणार, असा सवाल कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

## तोतयागिरी करुन नागरिकांना त्रास

शासकीय व राजकीय कार्यक्रमांमध्येही तो पत्रकार म्हणून सहभागी होत असल्याची चर्चा आहे.दरम्यान, त्याचा मुलगा अनिकेत मेस्त्री याने पोलिसांची खाकी वर्दी परिधान करून स्वतः ला पीएसआय अनिकेत मेस्त्री म्हणून महाड, पोलादपूर व माणगाव परिसरात फिरत ट्रक, डंपर व कंटेनर अडवून पैसे उकळल्याचे आरोप आहेत. महाड तालुक्यातील चिंभावे येथे माध्यमिक शाळेत पीएसआय म्हणून लेक्चर देतानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर महाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी काळे यांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.दरम्यान, प्रदीप मेस्त्री उर्फ सुतार याने काही जणांविषयी आक्षेपार्ह भाषा वापरल्याचे ऑडिओ-व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर 'आपली माती आपली माणसं' सामाजिक संघटनेचे संस्थापक राज पार्टे यांनी आक्रमक भूमिका घेतली. त्यानंतर पोलादपूर पोलिसांनी प्रदीप मेस्त्री उर्फ सुतार आणि त्याचा मुलगा अनिकेत मेस्त्री यांना पोलीस ठाण्यात बोलावून घेतले.

यावेळी अनिकेत मेस्त्री सध्या स्वतःला डॉ. अनिकेत प्रदीप मेस्त्री म्हणून ओळख देत असल्याचे उघड झाले. पोलिसांनी तक्रारी मागवल्यानंतर काही तक्रारींवरून प्रदीप मेस्त्री उर्फ सुतार याच्याविरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांनी दिली. दरम्यान, सारथी महाराष्ट्राचा या वृत्तपत्राने प्रदीप मेस्त्री याला संस्थेतून बरखास्त केल्याचा मेसेज पाठविल्याची माहिती 'आपली माती आपली माणसं' सामाजिक संघटनेचे संस्थापक राज पार्टे यांनी दिली.

## कर्जतमध्ये हनीट्रॅप टोळीचा पर्दाफाश

कार्ड ताब्यात घेऊन एटीएमचे पिन मिळवले व खात्यातील पैसे काढले. इतकेच नव्हे तर, आरोपींनी फिर्यादीच्या नावावर ११ लाख ६१ हजार रुपयांचे ऑनलाइन कर्ज मंजूर करून घेतले आणि त्यापैकी ३ लाख ९० हजार रुपये काढून खर्च केल्याचे तपासात उघड झाले.

या घटनेनंतर कर्जत पोलिसांनी तातडीने तपास सुरू करून १० मार्च रोजी आदिती रमेश ढोके आणि सुशील देवराम जाधव यांना अटक केली. त्यांना कर्जत न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोघांना पोलीस कोठडी सुनावली. या गुन्ह्यातील गणेश उर्फ मंगेश गजानन प्रधान हा सध्या फरार असून, त्याचा शोध सुरू आहे.ही कारवाई रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जतचे पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक तौसिफ सहेड, महिला सहायक पोलीस निरीक्षक मनिषा लटपटे, सहायक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने, पोलीस उपनिरीक्षक सुशांत वरक तसेच पोलीस कर्मचारी सागर शेवते, ए.एम. वडते, स्वप्नील येरूणकर, समीर भोईर, सौरभ पाटील, स्वाती मसगुडे, केशव नागरगोजे, एस.एन. घोलप, विठ्ठल घावस, योगेश गर्जे, चंद्रकांत रावते यांच्या पथकाने केली.

# स्पावर कारवाई

। पनवेल । प्रतिनिधी ।

खारघर पोलिसांनी स्पावर कारवाई करत अदनान हनीफद शेख (चालक), शबीना मोहम्मद खलील शेख, जैनाब नरुल्हा शरीफ शेख या तिघांविरोधात गुन्हा दाखल केला.

खारघर, सेक्टर दोन, ग्रो मोअर बिल्डिंग येथील वेलनेस स्पा या ठिकाणी महिला थेरपीस्ट या ग्राहकांची अश्लील वर्तन करत असून, तेथील स्पा चालक त्यांना मदत करत असल्याची माहिती खारघर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी य ठिकाणी छापा टाकला. यावेळी महिला थेरपीस्ट तिच्यासमोर असलेल्या ग्राहकाला अश्लील आणि बीभत्स साळे करत असल्याचे दिसून आले.

# वाढती उष्णता आरोग्यासाठी धोकादायक

। तळा । प्रतिनिधी ।

सध्या वातावरणात उष्णतेच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असून, वाढत्या उष्णतेचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम जाणवू लागला आहे. काही दिवसांपूर्वी पडलेल्या कडकडीत थंडीनंतर अचानक हवेतील उष्णतेच्या प्रमाणात वाढ झाली आहे. यामुळे नागरिकांच्या अंगाची लाही लाही होत असून, उष्णतेच्या लाटेमुळे नागरिकांना उष्माघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच वारंवार उन्हातून फिरल्यामुळे शरीरातून घाम येऊन त्वचेचे विकार (फंगल इन्फेक्शन) होण्याचीदेखील शक्यता आहे.

वाढत्या उष्णतेमुळे होणाऱ्या आजारांपासून वाचण्यासाठी नागरिकांनी आपल्या आरोग्याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. ज्यामध्ये दुपारी बारा ते चार शक्यतो घरातून बाहेर पडणे टाळावे, अगदीच महत्वाच्या कारणासाठी बाहेर पडावे लागल्यास स्त्रियांनी चेहऱ्याला स्कार्फ अथवा ओढणी बांधावी, तर पुरुषांनी रुमालाचा वापर करावा. यांसह टोपी किंवा छत्री घेऊन बाहेर पडावे. मोटारसायकलवरून प्रवास करताना गॉगल चा वापर करावा, शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये यासाठी भरपूर प्रमाणात पाणी प्यावे, उसाचा रस, लिंबू सरबत, कोकम सरबत यांचे सेवन करावे तसेच कलिंगड, मोसंबी, संत्री, केळी यांसारखी फळे खावी, असे आवाहन डॉक्टरांकडून करण्यात आले आहे.

# पहाटे चार वाजता बत्ती गुल

। तळा । प्रतिनिधी ।

शहरात कोणताही वारा नाही, पाऊस नाही, हवामान पूर्णपणे शांत तरीही पहाटे सुमारे चार वाजण्याच्या सुमारास अचानक वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांचा संताप उफाळून आला आहे. उकाड्याच्या दिवसांत रात्रीच्या वेळी वीज गायब झाल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. महावितरण मात्र नेहमीप्रमाणेच झोपेत असल्याची टीका नागरिकांकडून केली जात आहे.

शहरातील अनेक भागांमध्ये रात्री चार वाजता अचानक वीजपुरवठा बंद झाला. विशेष म्हणजे, त्यावेळी हवामान पूर्णपणे स्थिर होते; वारा, पाऊस किंवा कोणतीही नैसर्गिक अडचण नव्हती. त्यामुळे हा बिघाड नेमका कशामुळे झाला याबाबत नागरिकांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. उन्हाचा कडाका वाढत असताना दिवसभर आणि रात्रीही अचानक वीज गायब होत असल्याने नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. नैसर्गिक कारण काहीचनाही, तरी वीज जाते कशी? असा संतप्त सवाल नागरिक महावितरणला विचारत आहेत.

गेल्या काही दिवसांपासून शहरातील अनेक भागात दिवसातून अनेक वेळा वीज खंडित होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. काही ठिकाणी तर तासन्तास वीज येत नसल्याने घरगुती कामे ठप्प होत आहेत. लहान मुले, वृद्ध आणि रुग्णांना उकाड्यात बसावे लागत असून, नागरिकांचा संयम सुटू लागला आहे. वीज वितरण कंपनीकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस उत्तर मिळत नसल्याची नागरिकांची खंत आहे. तांत्रिक बिघाड, दुरुस्ती सुरू आहे, अशी नेहमीची कारणे देऊन वेळ मारून नेली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

## निवडक



### पु.ना. गाडगीळ ज्वेलर्सचे उद्घाटन

**चिरनेर :** उरण शहर पूर्वीपासून सोन्या-चांदीच्या खरेदीसाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणी अठरापगड जाती-जमातीचे लोक राहातात. विशेषतः आगरी-कोळी समाजाची वस्ती मोठ्या प्रमाणावर आहे. येथील महिलांना कष्टाच्या पैशांतून सोने विकत घेऊन हौस भागविण्याची प्रथा आहे. त्यामुळे पु.ना. गाडगीळ ज्वेलर्सने उरण शहरात केलेले पदार्पण निश्चितच महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय कामगार नेते तथा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी काढले. उरण येथे पु.ना. गाडगीळ या ज्वेलर्सचे उद्घाटन बॉलीवूडची धक धक गर्ल तथा प्रसिद्ध अभिनेत्री माधुरी दीक्षित यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.१३) करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर नगराध्यक्षा भावना घाणेकर, काँग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, पीएनजीचे सौरभ गाडगीळ यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

### प्रलंबित पाणीपट्टी भरण्याचे आवाहन

**नवी मुंबई :** सिडको प्रशासनिक क्षेत्रातील ज्या ग्राहकांची पाणीपट्टी देयके प्रलंबित आहेत, त्यांनी ३१ मार्चपर्यंत थकीत देयकांचा भरणा करण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे. विहित मुदतीमध्ये प्रलंबित देयकांचा भरणा करण्यास असमर्थ ठरणाऱ्या ग्राहकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येऊन पाणी पुरवठा खंडित करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. सिडको प्रशासनिक क्षेत्रातील गावांना आणि नोडना सिडकोतर्फे पाणी पुरवठा करण्यात येतो. पाणी पुरवठा नियमित आणि अखंडित करण्यासाठी तसेच देखभाल व दुरुस्तीची कामे नियमितपणे करण्यासाठी ग्राहकांनी पाणीपट्टी देयकांचा भरणा वेळेवर करणे आवश्यक आहे. याकरिता ज्या ग्राहकांची पाणीपट्टी देयके प्रलंबित आहेत त्यांनी ३१ मार्चपर्यंत थकबाकीचा भरणा करण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आला आहे. विहित मुदतीत थकलेली पाणी देयके न भरल्यास संबंधित ग्राहकांवर, सिडकोच्या नियमानुसार दंडात्मक कारवाई करून त्यांचा पाणी पुरवठाही खंडित होऊ शकतो, असा इशार देखील सिडकोतर्फे देण्यात आला आहे. ग्राहकांना पाणी देयके ऑनलाइन पद्धतीने, अधिकृत संकलन केंद्रांवर किंवा सिडको कार्यालामध्ये भरण्याचे पर्याय उपलब्ध आहेत. तसेच, पाणीपट्टी देयकामध्ये काही त्रुटी अथवा शंका असल्यास संबंधित सिडको कार्यालयासोबत त्वरित संपर्क साधण्याचे सिडकोतर्फे कळविण्यात आले आहे.



### पीएनपीच्या विद्यार्थ्यांचे नेत्रदीपक यश


**अलिबाग :** पनवेल येथे अटल जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात पीएनपी होली चाईल्ड स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत सर्व चार विभागांमध्ये पारितोषिके पटकावली आहेत. विशेष म्हणजे सर्व विभागांमध्ये चारही पारितोषिके मिळवणारी पीएनपी ही एकमेव शाळा ठरली आहे. या प्रदर्शनात इलेक्ट्रॉनिक विभागात अर्नव पालकर प्रथम क्रमांक, मेकॅनिकल विभागात दिनेश राऊत प्रथम क्रमांक, डिजिटल विभागात अर्नव पालकर द्वितीय क्रमांक व थीम आधारित प्रकल्प विभागात पार्थ परदेशी द्वितीय क्रमांक पटकावला आहे. या सर्व विजेत्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे. या स्पर्धेत मार्गदर्शक शिक्षिका प्रगती भोसले, इक्रा कूर आणि सुविद्या पाटील यांनाही प्रशस्तीपत्र व सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या नेत्रदीपक यशाबद्दल विजेते विद्यार्थी, सहभागी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, होली चाईल्ड एस.एस.सी. बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले तसेच उपमुख्याध्यापिका शर्मिला शेटे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



### गांजा विकणाऱ्याला तरुणाला अटक

**नेरळ : :** गेली कित्येक वर्षे नेरळ परिसरात अंमली पदार्थ विकणाऱ्या तरूणाचा शोध पोलीस घेत होते. अखेर, नेरळ पोलिसांनी या तरूणाचा शोध घेतला असून त्याला महाबळेश्वर येथून अटक करण्यात आली आहे. नेरळ येथील रेल्वे गेट जवळ बोलेरो जीपने बेकायदेशीर अवैधरित्या गांजा वाहतूक करताना एका रिक्षाला ठोकर मारून अपघात केला होता. पोलिसांकडून पकडले जाऊ नये म्हणून जीप चालकाने गांजा सह जीप बेवारस स्थितीत सोडून बेपत्ता झाला. त्यावेळी १४५ किलो ६० ग्राम वजनाचा गांजा आढळून आला होता. या गुन्ह्याचा तपास करताना सन २००६पासून पळून गेलेल्या गांजा तस्करी करणाऱ्या तरूणाला पकडण्यासाठी गुन्हे प्रकटीकरण पथकाला कामगिरी सोपविली होती. या टीमच्या अथक प्रयत्नांनंतर या तरूणाला पकडण्यात यश आले. विलास मनोहर मोहिते असे त्याचे नाव असून त्याला. सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर जवळील अहिल्यानगर येथून पकडण्यात आले.

### अतिष सागळे यांना मातृशोक



**पाली :** शेकापचे सुधागड तालुका चिटणीस अतिष सागळे यांच्या मातोश्री सुजाता सागळे यांचे शनिवारी (दि.१४) ६५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलगे अमित सागळे व अतिष सागळे, एक मुलगी, जावई, सुन पोलीस पाटील अमिषा सागळे, भारती सागळे व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या अंत्यविधीसमयी शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, जिल्हा चिटणीस सदस्य किसन उमटे, जिल्हा परिषद सदस्या शर्मिला बोडके, पाली पंचायत समितीचे उपसभापती संदेश शेवाळे, तालुका सहचिटणीस ॲड. प्रवीण कुंभार, वाघोशीचे माजी उपसरपंच दिपक पवार, उत्तमराव देशमुख, सामाजिक कार्यकर्ते शरद बोडके, मुख्याध्यापक राजेश गोळे, मा.पंचायत समिती सभापती भारती शेळके, रमेश सागळे, भास्कर पार्टे, नितीन देशमुख, मोरेश्वर खामकर, गणेशबुवा देशमुख, डॉ. नितीन दोशी, रविंद्र जाधव, वैभव तळेकर, डॉ. उमाकांत जाधव आदींसह उपस्थितांनी शोक व्यक्त करीत भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

# मरणानंतरही मरणयातना

## ● विकासाच्या गप्पांचा फुगा फुटला; उघड्यावर अंत्यविधी करण्याची वेळ

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

एकीकडे विकासाची गंगा वाहत असल्याचे दावे सत्ताधाऱ्यांकडून मोठ्या थाटामाटात केले जात असताना, दुसरीकडे ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांची अत्यंत दयनीय आणि चिंताजनक अवस्था समोर येत आहे. श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर पर्यटन क्षेत्राजवळ असलेल्या मारळ ग्रामपंचायत हद्दीतील स्मशानभूमीची विदारक स्थिती प्रशासनाच्या उदासीनतेचे आणि लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षाचे जिवंत उदाहरण ठरत आहे. गावात स्मशान शेडच नसल्यामुळे ग्रामस्थांना अक्षरशः उघड्यावर अंत्यविधी करावे लागत आहे. त्यामुळे विकासाच्या गप्पांचा फुगा फुटला असून मरणानंतरही मरण याताना भोगाव्या लागत असल्याचे ग्रामस्थांमधून बोलले जात आहे.

मारळ गावातील स्मशानभूमीतील दहनकट्टा आणि त्यावरील शेड अनेक वर्षांपूर्वीच पूर्णपणे मोडकळीस येऊन नष्ट झाली आहे. कालांतराने त्याची अवस्था इतकी खराब झाली की, सध्या त्या ठिकाणी अंत्यविधीसाठी कोणतीही योग्य सुविधा उरलेली नाही. गावात एखाद्याचा मृत्यू झाल्यास नातेवाईक आणि ग्रामस्थांना उघड्यावरच अंत्यसंस्कार करावे लागतात. विशेषतः पावसाळ्यात मुसळधार पावसात आणि उन्हाळ्यात कडक उन्हात अंत्यविधी करताना ग्रामस्थांची मोठी गैरसोय होते. मृत व्यक्तीला शेवटचा निरोप देताना देखील गावकऱ्यांना अशा कठीण परिस्थितीला सामोरे जावे लागत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. हरिहरेश्वरसारख्या प्रसिद्ध पर्यटन स्थळाच्या जवळ असलेल्या या गावात स्मशानभूमीसारखी मूलभूत आणि अत्यावश्यक सुविधा नसणे हे प्रशासनासाठी अत्यंत लाजिरवाणे असल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. तालुक्यात विकासाच्या मोठमोठ्या घोषणा केल्या जात असल्या, तरी प्रत्यक्षात ग्रामीण भागातील साध्या आणि अत्यावश्यक गरजांकडेच दुर्लक्ष होत असल्याचे वास्तव मारळ गावातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.



### आश्वासनांची खैरात

या गंभीर प्रश्नाबाबत ग्रामस्थांनी अनेक वेळा ग्रामपंचायत, संबंधित विभागातील अधिकारी तसेच मतदारसंघातील लोकप्रतिनिधींकडे लेखी आणि तोंडी मागणी केली आहे. मात्र, प्रत्येक वेळी केवळ आश्वासनांची खैरात मिळाली असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विकासाच्या नावावर मोठमोठ्या घोषणा करणाऱ्या लोकप्रतिनिधींना गावातील ही स्मशानभूमी का दिसत नाही? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### आंदोलनाचा इशारा

मृत्यू हा आयुष्याचा शेवटचा टप्पा असला तरी, मृत्यूनंतरही माणसाला सन्मानाने निरोप देण्यासाठी आवश्यक सुविधा नसणे ही प्रशासनाची मोठी निष्क्रियता असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे आता तरी शासन आणि स्थानिक प्रशासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन मारळ येथील स्मशानभूमीची तातडीने दुरुस्ती करावी आणि नवीन शेड उभारून आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी आग्रही मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. अन्यथा येत्या काळात ग्रामस्थांना तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही गावकऱ्यांनी दिला आहे.

# काळा दिवस कोणासाठी?

## ● खासदार तटकरे यांच्या वक्तव्याने राजकारणात खळबळ

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या सत्ता स्थापनेबाबत सोशल मिडीयावर वेगवेगळ्या प्रकारचे वक्तव्य केले जात आहे. त्यामध्ये जिल्हा परिषदेवर सत्ता स्थापनेचा काळा दिवस असल्याचे सोशल मिडीयावर बोलले जात आहे. याबाबत प्रतिक्रीया देताना खा. सुनील तटकरे यांनी काळा दिवस कोणासाठी, असा प्रश्न उपस्थित करीत भाजप व राष्ट्रवादीसाठी हा दिवस सुराज्याचा पांढरा दिवस असून जनतेच्या सेवेसाठी आम्ही कटीबद्ध आहोत, असे स्पष्टीकरण केले. तटकरे यांच्या या विधानांतर जिल्ह्यातील राजकारणात खळबळ उडाली असून हा टोला नक्की कोणाला आहे, याबाबत वेगवेगळ्या प्रकारच्या चर्चेला उधाण आले आहे.

रायगड जिल्हा परिषदेची निवडणुक महायुतीमधील भाजप, राष्ट्रवादी आणि शिंदे गट वेगवेगळे लढले. शिंदे गटाने आपली सत्ता जिल्हा परिषदेवर येण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. अध्यक्षही शिंदे गटाचाच असणार, अशा जाहीरातबाजीदेखील वेगवेगळ्या माध्यमातून करण्यात आल्या. राज्याचे मंत्री भरत गोगावले यांचे सुपूत्र विकास गोगावले यांचे नाव या पदासाठी घेतले जात होते. मात्र, शिंदे गटाचा सर्व डाव भाजप आणि राष्ट्रवादीने हाणून पाडला. भाजप आणि राष्ट्रवादी हे दोन्ही पक्ष ठाकरे गट आणि काँग्रेसला सोबत घेऊन सत्ता स्थापनेच्या प्रयत्नात होते. त्यामुळे शिंदे गटावर मोठी नामुष्की ओढण्याचे चित्र होते. अखेर शिंदे गटाने नमते घेत जिल्हा परिषदेच्या सत्ता स्थापनेत सहभाग घेतला. शिंदे गटाला सुरुवातीला अध्यक्षपदासाठी अडीच वर्षे पाहिजे होती. परंतु, भाजप व राष्ट्रवादीने त्यांची ही मागणी फेटाळून भाजपचे मंगेश वाकडीकर यांना अध्यक्षपद देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार शुक्रवारी (दि.१३) झालेल्या बैठकीत भाजपकडे अध्यक्षपद आणि उपाध्यक्षपद राष्ट्रवादीकडे देण्यात आले.

सत्ता स्थापनेनंतर सोशल मिडीयावर वेगवेगळे मेसेज व्हायरल होऊ लागले. त्यामध्ये एक मेसेज सत्ता स्थापनेचा दिवस काळा दिवस म्हणून टाकण्यात आले. त्यावर खा. तटकरे यांनी, हा काळा दिवस नेमका कोणासाठी? हे मला माहित नाही. त्या समाजमाध्यमांवरील पोस्टबाबत अनभिज्ञ आहे. भाजप आणि राष्ट्रवादी यांची निवडणुक पुर्व युती होती. जनतेने निवडून दिल्यामुळे लोकशाही मार्गाने सत्ता स्थापनेचा अधिकार आमच्याकडे होता. महायूतीच्या निर्णयाने शिवसेनाही सत्तेत सहभागी झाली. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेससाठी हा दिवस सुराज्याचा पांढरा दिवस असून जनतेची सेवा करण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत, असे ते म्हणाले. तटकरे यांच्या या विधानांतर जिल्ह्यातील राजकारणात खळबळ उडाली आहे.

# बेकायदेशीर उत्खनन करणाऱ्यांविरोधात गुन्हा

**। रोहा । प्रतिनिधी ।**

भिरा फाटा ते सुतारवाडी तसेच आंबेवाडी विभागात माती माफियांनी अक्षरशः हैदोस घातला आहे. अनेक पुढाऱ्यांनी सत्तेचा दूरोपयोग करुन दिवसा डोंगर पोखरून लाखो रुपये किंमतीची माती चोरी करुन शासनाच्या नियमांची पायमल्ली केली आहे. या माती चोरट्यांना काही अधिकारी वर्गाचा देखील छुपा पाठींबा असल्याचे बोलले जात आहे. मात्र, उशिरा का होईना, महसूल खात्याला जाग आल्याने कुडली येथे बेकायदेशीर माती ऊत्खनन करणाऱ्या चौघांना रंगेहाथ पकडून त्यांच्या विरोधात कोलाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याा कारवाईत ५६ लाखांचा साहित्य जप्त करण्यात आला आहे.

कुडली गावात विष्णू पडवळ यांच्या मालकीची शेत जमीन आहे. या ठिकाणी रात्री अंधाराचा फायदा घेत चार परप्रांतीय तरुणांनी शासनाची परवानगी न घेता बेकायदेशीररित्या जेसीबीचा वापर करुन माती ऊत्खनन केले. या दरम्यान शुक्रवारी पहाटे ३ वाजताच्या सुमारास घटना स्थळी जाऊन कारवाईचा बडगा उगारला. या कारवाईत ४० लाख रुपये किंमतीचे २ डंपर व २५ लाख रुपये किंमतीचा एक जेसीबी असे एकूण ६५ लाख रुपये किंमतीचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. अबूसमा शफिकूल अलम, एम.डी.बशीर जिहाउल हाक, याकूब आली हबिबूल रेहमान आणि संजय कुमार गोविंद यादव अशी त्यांची नावे असून त्यांच्या विरोधात महसूल अधिकारी दीपक राठोड यांच्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



● मुरूड समुद्रकिनारी लाटांमध्ये गारव्याचा आनंद घेताना पर्यटक (छायाचित्रः सुधीर नाझरे)

# उरणमध्ये ग्रामस्थांना कोट्यवधींचा गंडा

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यात नागरिकांची अनेकदा चिट फंड घोटाळे झाले आहेत. तरीही उरण मधील नागरिक या घटनेतून बोध घेताना दिसून येत नाही. अनेक वेगवेगळे चिट फंडचे उदाहरण ताजे असतानाच सारडे गावात पैसे डबल करण्याच्या नादातून नागरिकांची आर्थिक फसवणूक झाल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे नागरिकांच्या आर्थिक प्रश्नाचा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

उरणमधील सारडे गावामध्ये आणखी एक चिटफंड घोटाळा उघडकीस आला आहे. या घोटाळ्यातील आरोपींनी जादा परताव्याचे आमिष दाखवून १७ गुंतवणूकदारांकडून तब्बल ३ कोटी ३० लाख रुपयांची फसवणूक करून पलायन केल्याचे उघडकीस आले आहे. उरण पोलिसांनी या प्रकरणातील एकाच कुटुंबातील तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील फरार आरोपी प्रवीण पाटील (४६), विनायक पाटील (४३) आणि कमिक्षा पाटील (३७) हे तिघेही सारडे गावातील रहिवासी असून त्यांनी वर्षभरापूर्वी चिटफंड नावाची एक गुंतवणूक योजना सुरू केली होती. या योजनेत गुंतवणूक केल्यास अवघ्या १५ दिवसांत भरघोस परतावा मिळेल, असे आमिष त्यांनी ग्रामस्थांना दाखवले होते. त्यांनी सुरुवातीला काही लोकांना परतावा देऊन त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर गावातील अनेक लोकांकडून मोठी रक्कम गोळा केली. या प्रकरणातील एकाने चिटफंडमध्ये २६ लाख ७ हजार रुपये गुंतवले होते. त्यांच्याप्रमाणेच गावातील इतर १७ प्रमुख गुंतवणूकदारांसह अनेक लोकांनी या चिटफंड योजनेमध्ये एकूण मिळून ३ कोटी ३० लाख ६६ हजार रुपये गुंतवले होते. मात्र, मुदत संपल्यानंतरही गुंतवणूक केलेली मुद्दल किंवा परतावा न देता आरोपींनी या रकमेचा अपहार केला. त्यामुळे गुंतवणूकदारांनी आपल्या पैशांची मागणी करण्यास सुरुवात केल्यानंतर त्यांनी पलायन केले.



# माथेरान डोंगर आगीच्या भक्षस्थानी

## ● वणवा विझवण्यात वन विभागाला अपयश

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान डोंगरात सायंकाळी वणवा लागला आणि त्या वणव्याचा भडका फार मोठ्या प्रमाणावर उडाला. त्यामुळे जुम्मापट्टी भागातील संपूर्ण डोंगर वणव्याच्या भक्ष्यस्थानी आल्याने संपूर्ण डोंगर काळा पडला आहे.हा वणवा विझवण्यासाठी वन विभागाचे नेरळ-माथेरान तसेच कर्जत पश्चिम येथील कर्मचाऱ्यांनी रात्री प्रयत्न केले. मात्र, ते सर्व प्रयत्न अपयशी ठरले.

माथेरानच्या डोंगर भागात मागील अनेक दिवस सातत्याने वणवे लागत आहेत. मात्र, वन विभाग अशा बाबींकडे दुर्लक्ष करीत असल्याने वणवे लागण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ म्हणून ओळख असलेल्या माथेरानकडे जाणारा रस्ता वनव्यामुळे काळा पडला आहे. तसेच, वणवा लागून येथील वनराई देखील नष्ट होत असून अनेक वन्य प्राण्यांचा वावर धोक्यात आला आहे. अशातच माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या धसवाडी या आदिवासी वाडीच्या खालच्या बाजुस संध्याकाळी सात वाजल्याच्या सुमारास वणवा लागला. त्यावेळी हा वणवा कमी स्वरूपाचा होता. मात्र, या ठिकाणी वन अधिकारी वेळेवर पोहचले नाहीत. त्यामुळे वणव्याचा भडका आणखी वाढला. वणवा रोखण्यासाठी नेरळ वन विभागाची टीम रात्री नऊ वाजता पोहचली. त्यानंतर त्यांच्या मदतीला कर्जत येथून देखील वन कर्मचारी आले. मात्र, हा वणवा एकाच वेळी किमान एक किलोमीटर परिघात लागला असल्याने सर्वांची धावपळ होत होती.

# कोर्लईजवळ टँकरचे चाक खड्ड्यात

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

रेवस-रेड्डी महामार्गाचे जोरदार काम सुरू आहे. त्यामुळे साळाव-मुरुड रस्त्यावर रस्ते रुंदीकरण व काँक्रीटिकरणासाठी अनेक ठिकाणी रस्ता खोदून ठेवला आहे. या कामामुळे पर्यायी वाहतूक व्यवस्था न केल्याने वाहन चालकांना शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान, गुरुवारी सायंकळच्या सुमारास कोर्लई स्टॉप नजीक रस्त्यालगत डाव्या बाजूला असलेल्या खड्ड्यात एका टँकरचे पुढील चाक गेल्याने वाहतूक कोंडी झाली होती. त्यामुळे वाहनांच्या



लांबच लांब रांगा लागल्या होत्या. या मार्गावर होणाऱ्या वाहन चालकांना होणारा त्रास लक्षात घेऊन साळाव-काशीद, मुरुड या मार्गाने एकेरी वाहतूक करावी व साळाव-सुपेगाव या मार्गाचा एकेरी वाहतूकीसाठी वापर करण्यात यावा, अशी मागणी जोर धरीत आहे.

### मारुती शिंदे यांचे निधन



**कर्जत :** गारपोली गावातील शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते मारुती शिंदे यांचे (९१) निधन झाले. अंबरनाथ येथील मराठा शिक्षण प्रसारक मंडळाचे ते माजी अध्यक्ष होते. त्यांनी स्व. प्रभाकर पाटील आणि स्व. दत्ता पाटील यांच्या बरोबर शेकापचे काम केले होते. त्यांनी सामाजिक कार्याबरोबर त्यांचे कौटुंबिक जवाबदारी कर्तव्यातून पार केले. त्यांचा पश्चात मुली, सुना, नातवंडे, जावई असा मोठा परिवार आहे.

**उरणमध्ये पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन | रानसई धरणात जून पर्यंतचा पाणीसाठा**

# एमआडीसीला हेटवणे धरणाची जोड

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

वाढत्या उष्णतेमुळे बाष्पीकरण वाढू लागले आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन केले जात असल्याने रानसई धरणातून उरणकरांना जूनपर्यंत पाणीपुरवठा करता येईल, अशी माहिती उरणच्या एमआयडीसी अधिकाऱ्यांनी दिली आहे.



रानसई धरणातील पाणी साठवणूक क्षमता वाढत नसल्याने उरणच्या नागरिकांचे पाणी कपातीचे संकट वाढू लागले आहे. रानसई धरणाची पाणी साठवणूक क्षमता कमी झाल्याने, या धरणातून पावसाळ्यातील साडेतीन महिन्यांचे लाखो लिटर पाणी वाया जात आहे. त्यामुळे येथील नागरिकांना वर्षानुवर्ष दर ऑक्टोबर नोव्हेंबर महिन्यापासूनच पाणी कपातीचा सामना करावा लागत आहे.

उरण तालुक्यातील नागरिकांना लागणारे पाणी एमआयडीसीच्या रानसई धरणातून पुरविले जात असून, उरणकरांना दररोज ४१ दशलक्ष लीटर पाण्याची आवश्यकता आहे. मात्र, एमआयडीसीकडे केवळ ३० दशलक्ष लीटर पाणी असल्याने दररोज १० दशलक्ष लिटर पाणी कमी पडत असल्याने, हा पाणीपुरवठा जून महिन्यापर्यंत करता यावा, यासाठी पाणी कपात केली जात आहे. तसेच, सिडकोच्या हेटवणे धरणातून दररोज एमआयडीसीला ४.५ दशलक्ष लिटर पाणी दिले जात असल्याने, सिडकोच्या या साथीची जोड उरणला मिळत आहे. मात्र, धरणाची स्थापित क्षमता १० दशलक्ष घनमीटर असली तरी ती घटून सध्या ७ दशलक्ष घनमीटर पेक्षा कमी झाली आहे.

### क्षमता वाढविण्याची मागणी

रानसई धरणाची पाणी साठवणूक क्षमता वाढविण्यासाठी धरणाची उंची वाढवावी किंवा धरणातील गाळ काढावा, या दोन उपाय योजनांची चर्चा गेल्या २५ वर्षांपासून केली जात आहे. त्यावर धरणाच्या गाळाची पाहणी पुण्यातील एका संस्थेकडून करण्यात आली असून, त्यांच्याकडून गाळाचे प्रमाण कमी असल्याचे सांगण्यात आले. कोणत्याही लोकप्रतिनिधीने त्याचा पाठपुरावा केला नसल्याने, पाणीटंचाईची ही समस्या गंभीर होऊ लागल्याचे उरणकरांकडून बोलले जातआहे.

> **रानसई धरणाची पाणी क्षमता सुमारे ९९ फुटांवर आहे. हि पातळी सामान्य असून, येत्या जून महिन्यापर्यंत पाणीपुरवठा करता येईल, इतका साठा आहे. तसेच, सिडकोकडून ४.५ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होत आहे.**
> **- ज्ञानदेव सोनावणे, अभियंता उरण एमआयडीसी**

# निवडक

## ग्राहकांना घरपोच सिलिंडर मिळणार

**खोपोली :** सध्या सुरू असलेल्या युद्धामुळे हॉटेल व्यावसायिकांना गॅस देणे बंद केल्यामुळे घरगुती गॅस सिलिंडरचा तीव्र तुटवडा निर्माण होईल, अशी भिती नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे गॅस सिलिंडर मिळविण्यासाठी खोपोलीकरांनी एजन्सीबाहेर मोठ्या रांगा लावल्या. तर, बुकींग करणाऱ्या ग्राहकांना घरपोच गॅस सिलिंडर मिळेल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे ग्राहकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे अवाहन एचपी गॅस खोपोली वितरक स्वप्निल साखरे यांनी केले आहे. सध्या गॅस सिलिंडर बुकिंग कालावधी २१ वरून आता २५ दिवसांचा करण्यात आला आहे. तर, युद्धाच्या पार्श्वभूमीवर पुढच्या काळात गॅस मिळेल की नाही? याबाबत संभ्रमावस्था असल्यामुळेच गॅस सिलिंडर घेण्यासाठी नागरिकांच्या खोपोलीतील गॅस एजन्सी बाहेर रांगा लागल्या आहेत. ज्यांचे गॅस सिलिंडर बुकिंग झाले आहे, ते देखील रांगा लावून सिलिंडर घेत आहेत. यावेळी वृद्ध महिला तसेच अंपग व्यक्तींना रांगेत उभे न ठेवता त्यांना पहिले प्राधान्य देऊन गॅस सिलिंडर दिला जात आहे. त्यामुळे वितरकांशी वादाचे प्रसंग देखील उद्भवत आहेत. या दरम्यान, गॅस सिलेंडरचा पुरेसा साठा आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरू नये. गरज असल्यावरच गॅस सिलिंडर बुकिंग करावे, असे आवाहन एची.पी. खोपोली एजन्सीचे वितरक स्वप्निल साखरे यांनी केले आहे.

## कोप्रोली नाक्यावर ग्राहकांच्या रांगा



**चिरनेर :** इराण इस्रायल संघर्षाचे पडसाद भारतातही उमटू लागल्याचे चित्र दिसून येत आहे. त्याचा परिणाम एलपीजी गॅस सिलिंडरवर झाला आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून सर्वत्रच गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यावर तुटवड्याचा परिणाम झाला आहे. हा गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्याने महिलांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे गॅस सिलिंडरची गाडी येताच ग्राहक कोप्रोली नाक्यावर मोठी गर्दी करत आहेत. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून कोप्रोली नाक्यावर महिला आणि पुरुषांकडून रिकामे गॅस सिलिंडर घेऊन रांगा लावल्याचे दिसत आहे. मात्र, गॅस एजन्सीकडून होणारा पुरवठा मागणीच्या तुलनेत कमी असल्याने नागरिकांमध्ये संतापाबरोबर चिंतेचे वातावरण आहे. गॅस सिलिंडर घेण्यासाठी लावलेल्या रांगांमुळे काही काळ नाक्यावर अडथळा निर्माण होऊन वाहतूक कोंडीला प्रवाशांना सामोरे जावे लागले.



## उतेखोल शाळेची सानेगुरुजी स्मारकास भेट

**माणगाव :** पीएमश्री शाळा उतेखोलवाडी यांची राष्ट्रीय स्मारक सानेगुरुजी वडघर व स्वयंभू गणेश मंदिर मुगावली क्षेत्र भेट उत्साहात संपन्न झाली. मुलांना ऐतिहासिक गोष्टीचा अभ्यास असणे गरजेचे आहे, म्हणून सानेगुरुजी राष्ट्रीय स्मारकास भेट देऊन तेथील साने गुरुजींचे सामाजिक कार्य आणि आई विषयी एकनिष्ठ प्रेम, ज्यातून त्यांनी शामची आई पुस्तक लिहिले अशी अनेक उदाहरणे मुलांना पाहायला व वाचायला मिळाली. स्वयंभू गणेश मंदिर मुगवली येथे बाप्पचे दर्शन घेऊन सहल सुरु झाली. क्षेत्र भेट यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षकवर्ग आणि व्यवस्थापन समिती यांनी उत्तम नियोजन केले होते. शासनाच्या मोफत अनेक पीएमश्री योजनांमुळे मुलांना कोणतीही फी न देता सहलीचा आनंद लुटता आला.

## बोनसची प्रलंबित मागणी मान्य



**उरण :** अखिल भारतीय बंदर आणि गोदी कामगारांना २०२० ते २०२६ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी लागू होणारा बोनस करार झाला आहे. त्यानुसार उचल वजा करून उर्वरित रक्कम संबंधितांना मिळणार आहे. केंद्रीय श्रम आयुक्त यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या या करारावर भारतीय मजदूर पोर्ट महासंघाचे राष्ट्रीय महासचिव सुरेश पाटील, डी.पी. सोनवणे, ऑल इंडिया पोर्ट अँड डॉग वर्कर्स फेडरेशन, इंडिया फोर्ट अँड डॉक वर्कर्स फेडरेशन, वॉटर ट्रान्सपोर्ट वर्कर्स फेडरेशन ऑफ इंडिया, इंडियन नॅशनल पोर्ट अँड डॉक वर्कर्स फेडरेशन, पोर्ट डॉक अँड वॉटर फ्रंट फेडरेशन ऑफ इंडिया, इंडियन पोर्ट असो.चे चेअरमन सुशील कुमार सिंग, एम.डी. विकास नरवाल तसेच सर्व बंदरांचे चेअरमन, पदाधिकारी या सर्वांच्यावतीने व सहा मान्यता प्राप्त महासंघांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. त्यामुळे बोनसची प्रलंबित मागणी मान्य झाली आहे.

# गॅस टंचाईमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात घरगुती गॅस वितरण केंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. घरगुती गॅस घरपोच करण्याची कार्यपद्धती सध्या तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्यात आली आहे. मात्र, घरगुती गॅस धारकांच्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून कर्जत आणि नेरळमध्ये बुकिंग केल्यानंतर गॅस उपलब्ध होत आहेत. तसेच, गॅस गोडावून आणि कार्यालयाजवळ पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. जेणेकरून कोणताही गैर प्रकार घडणार नाही.

आंतरराष्ट्रीय स्तरावर इराण आणि अमेरिकेमधील वाढत्या युद्धजन्य तणावाच्या पार्श्वभूमीवर गॅस पुरवठा अनियमित होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे कर्जत आणि नेरळमध्ये घरगुती गॅस सिलिंडरसाठी ग्राहकांकडून मोठी गर्दी पहायला मिळत आहे. घरगुती गॅस सिलिंडरसाठी ग्राहकांनी सेवा केंद्रावर रांगा लावल्या आहेत. त्यात

### ●कर्जतमध्ये कडक पोलीस बंदोबस्त

ऑनलाईन पद्धतीने घरगुती गॅस बुकिंग करण्याची सुविधा तात्पुरती बंद करण्यात आली आहे. तसेच, २५ दिवसांनी सिलिंडर देण्याचा निर्णय शासन स्तरावर झाल्याने कर्जत आणि नेरळ येथे घरगुती गॅस सिलिंडर संपला आहे. अशा ग्राहकांसाठी नवीन मोबाईल नंबर देण्यात आला आहे. त्या नंबरवर घरगुती गॅस बुकिंग करण्याची मुभा आहे. तेथे नोंदणी झाल्यानंतर अवघ्या एक-दोन तासांत घरगुती गॅस सिलिंडर उपलब्ध होत असल्याचे दिसून येत आहे. कर्जत येथे असलेल्या गॅस एजन्सीकडे १२०० गॅस टाक्यांची वाहतूक होत असते. तर, नेरळ येथे ६०० टाक्या येत असतात. मात्र, सध्याच्या परिस्थितीत दोन्ही ठिकाणी गॅस टाक्यांची वाहतूक अर्ध्यावर आली आहे. त्यामुळे काहीसा संभ्रम निर्माण झाल्याने ग्राहक सेवा केंद्राच्या कार्यालयावर गर्दी करू लागले आहेत. हे लक्षात घेऊन कर्जत पोलीस ठाण्याने कर्जत येथील गॅस कार्यालयाच्या बाहेर तसेच गॅस टाक्या ठेवण्यात आलेल्या गोडाऊन बाहेर बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. तसेच, कोणताही गैर प्रकार अथवा आर्थिक फसवणूक होऊ नये म्हणून लहान गॅस सिलिंडर विक्री होत असलेल्या ठिकाणी देखील पोलिसांनी जाऊन पाहणी केली आहे.



## पर्यटन वाचवण्यासाठी नियोजनाची गरज

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान हे केवळ पर्यटनावर आधारित असलेले शहर आहे. त्यामुळे हा पर्यटन व्यवसाय येथील जनतेचे उदरनिर्वाहाचे साधन आहे. हे लक्षात घेऊन शासनाने गॅस सिलिंडरचा तुटवडा होणार नाही, त्यासाठी नियोजन करण्याची मागणी माथेरानमधील हॉटेल व्यावसायिक आणि राष्ट्रवादी पक्षाने केली आहे.

माथेरानमधील आर्थिक व्यवहार हे शंभर टक्के पर्यटनावर अवलंबून आहेत. त्यामुळे माथेरानचे पर्यटन हेच सर्वसामान्य माथेरानकरांचे उपजीविकेचे साधन आहे. मात्र, काही दिवसांपासून व्यावसायिक गॅस पुरवठा संपूर्ण पणे बंद करण्यात आला असून घरघुती गॅसचा पुरवठा देखील कमी करण्यात आला आहे. त्याचा विपरीत परिणाम येथील हॉटेल व्यावसायिकांना होत आहे. त्यामुळे पर्यटकांची संख्या रोडावण्याची शक्यता देखीन वर्तविली जात आहे. तरी माथेरानसाठी विशेष बाब म्हणून व्यावसायिक तसेच घरघुती गॅस सिलिंडरचा नियमित पुरवठा होण्यासाठी गॅस पुरवठा धारकाला नियमित गॅस पुरवठा करण्याबाबत आदेश द्यावेत. तसेच, हा गहन प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासनाला शिफारस करावी, अशी मागणी माथेरान राष्ट्रवादी शहर अध्यक्ष सीताराम कुंभार व हॉटेल व्यावसायिकांनी माथेरानचे महसूल अधिक्षक सुरेंद्र ठाकूर यांच्याकडे केली आहे.

## कर्मचाऱ्यांचे स्नेह संमेलन उत्साहात

**उरण :** डी.पी. वर्ल्ड न्हावा शेवा कंपनीतील कामगारांना रविवारी (दि.८) २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचा रौप्य महोत्सव म्हातवलि येथे साजरा करण्यात आला. यावेळी कंपनीचे सीईओ जीबु कुरियन ईटटि हे स्वतः हजर राहून कामगारांच्या आनंदात सहभागी झाले होते. त्यांनी आयोजित केलेल्या या स्नेहसंमेलनाबद्दल सर्व कामगारांचे अभिनंदन केले. त्याचबरोबर कामगारांनी एकत्रित येऊन लहान मुलांच्या नृत्य स्पर्धे चे ओयाजन केले होते. तसेच, महिला दिनानिमित्त महिलांसाठी विविध प्रकारचे खेळ व कार्यक्रम देखील आयोजीत केले होते.



## मुरूडमध्ये गॅसची वाढती मागणी

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

मुरूड तालुक्यातील ग्रामीण भागात घरगुती गॅस सिलिंडरची टंचाई निर्माण होईल, या भीतीने येथील गॅस ग्राहक सिलिंडर घेण्यासाठी त्रागा करत आहेत. सध्या घरगुती गॅस सिलिंडर ही प्रत्येकाच्या घरात गरजेची गोष्ट आहे. अनेकाची कुंटूबे या घरगुती गॅस सिलिंडरवर अंवलबून आहेत. त्यामुळे घरगुती गॅसच्या कुत्रीम टंचाईच्या विचाराने गृहीणींमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. यादरम्यान, घरगुती गॅस सिलिंडर विक्रेत्याचे वाहन गावाच्या वेशीवर येताच ग्राहकांची त्या वाहना भोवती मोठ्या प्रमाणात गर्दी होताना दिसत आहे. त्यातच वाहनातील पुरवठा करणाऱ्या व्यक्तीचा सुद्धा चांगलाच भाव वधारला असल्याची तक्रार होताना दिसत आहे. सध्यस्थितीत मुरूड तालुक्यात गावोगावी घरगुती गॅस सिलिंडरची वाढती मागणी असून गावाच्या वेशीवर ग्राहकांची गर्दी दिसून येते.

## गॅस सिलिंडर सेवा सुरळीत सुरू

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

इराण-इस्रायल युद्धाचे थेट परिणाम एलपीजी पुरवठ्यावर होत आहे. त्यामुळे सिलिंडर मिळणार नाही, अश्या बातम्या सोशल मिडीयावर फिरत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. तरी नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नका, असे आवाहन सुधा गॅस वितरण व्यवस्था युनिट ऑफ मुरुड तालुका सहकारी सुपारी खरेदी विक्री संघ लिमिटेड यांनी केले आहे.




(छायाचित्र: गणेश चोडणेकर)

एलपीजी गॅसचा साठा पुरेसा उपलब्ध असून घरगुती सिलेंडरचा पुरवठा सुरळीत चालू आहे. प्रत्येक ग्राहकाला सिलिंडरची घरपोच डिलिव्हरी दिली जाईल. साधारणत: गॅस सिलेंडरची बुकिंग २५ दिवसाच्या अंतराने होते त्यामुळे अनावश्यक घाई करून गर्दी वाढवू नये. ग्राहकांनी केवळ गरज असल्यासच बुकिंग करावे व गॅस एजन्सी ऑफिसमध्ये विनाकारण गर्दी करणे टाळावे. सध्या गॅसचा वापर जपून करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. तसेच, गॅस खरेदी करताना प्रत्येकाने बुकिंग करणे व ओटीपी देणे बंधनकारक आहे. त्याचबरोबर अफवांवर विश्वास न ठेवता प्रत्येक ग्राहकाने संयम बाळगणे आवश्यक आहे. कोणाचीही गैरसोय होणार नाही याची काळजी गॅस एजन्सीकडून घेतली जाईल. तरी ग्राहकांने सहकार्य करावे असे, आवाहन सुधा गॅस वितरण व्यवस्था युनिट ऑफ मुरुड तालुका सहकारी सुपारी खरेदी विक्री संघ लिमिटेड यांच्याकडून करण्यात आले आहे.

## ओल्ड मर्स्कमधील कामगारांची पगारवाढ



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कंटेनर फ्रेट स्टेशन क्षेत्रातील कामगारांच्या प्रश्नांवर कामगार नेते महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखालील सातत्याने आवाज उठविण्यात आला आहे. नुकताच कामगार नेते महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखालील न्यू मॅरीटाईम ॲण्ड जनरल कामगार संघटनेच्या पुढाकारातून ओल्ड मर्स्क कंपनीतील कामगारांच्या वेतनवाढीचा महत्त्वपूर्ण करार करण्यात आला. हा करार ११ मार्च रोजी जे.एन.पी.टी. परिसरात पार पडला असून या करारानुसार कामगारांना तब्बल १८ हजार रुपयांची पगारवाढ देण्याचे मान्य करण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या कामगार धोरणांमध्ये सातत्याने बदल होत असताना कामगारांची नोकरी सुरक्षित ठेवणे आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी कामगार नेते महेंद्रशेठ घरत हे सातत्याने प्रयत्न करत आहेत. कंपनी आणि कामगार यांच्यात समतोल राखत हा करार यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात संघटनेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या करारानुसार कामगारांना पुढील आठ वर्षांसाठी १८ हजार रुपयांची वेतनवाढ मिळणार आहे.

## एपीएस-९५ पेन्शनदारांचे आंदोलन मागे

**। खांब । प्रतिनिधी ।**

एपीएस-९५ राष्ट्रीय संघर्ष समिती रोहाचे राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोक राऊत यांच्या आदेशानुसार नवी दिल्ली येथील जंतर मंतर मैदानावर २७ राज्यातील महाआंदोलनासाठी दि. ९, १०, व ११ मार्च रोजी सुमारे ४० ते ५० हजार पेन्शनर उपस्थित होते. या आंदोलनाबाबत सरकारकडून मिळालेल्या अश्वासनानंतर पेन्शनदारांचे आंदोलन अखेर मागे घेण्यात आले आहे. आंदोलनकर्ते यांची मागणी रुपये ७ हजार ५०० पेन्शन वाढ व अधिक महागाई भत्ता, वैद्यकीय मोफत मेडिकल सुविधा, हायर पेन्शन निकाल सर्वांना मिळावे, ज्यांना पेन्शन मिळत नाही तसेच ज्यांनी फॉर्म भरले नाहीत, अशा कामगारांना रुपये ५ हजार देण्यात यावे, अशा चार मागण्याकरिता हे आंदोलन करण्यात आले होते. ११ मार्च रोजी खासदार मेधा कुलकर्णी यांनी भाषणात सांगितले की, श्रम मंत्री मांडविया यांना भेटून आले व त्यांच्याजवळ पेन्शन वाढीबद्दल सविस्तर चर्चा करून लवकरात लवकर इपीएस-९५ पेन्शन वाढीचे काम होईल, असे त्यांनी आश्वासन दिले आहे. आंदोलनातील शेवटच्या दिवशी कमांडर अशोक राऊत यांनी, सरकारला २ एप्रिलपर्यंत मुदत दिली आहे. जर पेन्शनवाढ केली नाही तर रास्ता रोको, रेल्वे रोको किंवा आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा त्यांच्याकडून देण्यात आल्यानंतर आंदोलन समाप्त करण्यात आले.



## प्रमोद म्हसकर यांचा ठाण्यात गौरव



**रोहा :** आपल्या कर्तृत्वाने मुंबई ते दुबईपर्यंत व्यवसायाचा विस्तार करणारे आणि आपल्या दातृत्वाने रायगडच्या कानाकोपऱ्यात माणसातला देवमाणूस म्हणून ओळखले जाणारे प्रमोद म्हसकर यांना ठाण्यातील नामांकित द्रोणाचार्य शिक्षण प्रसारक संस्थेच्यावतीने 'द ओमेगा लिगसी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. कल्याण येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात संपन्न झालेल्या या सोहळ्यात प्रमोद म्हसकर यांचा नागरी सत्कार करण्यात आला. उपेक्षित समाज व शिक्षणापासून वंचित असलेल्या तळागाळातील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य द्रोणाचार्य शिक्षण प्रसारक संस्था अविरतपणे करत आहे. या चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना बळ मिळावे आणि त्यांच्यासमोर अनेक आदर्श व्यक्तिमत्त्व असावे, या मुख्य हेतूने संस्थेचे संस्थापक विनोद पाटील यांच्या संकल्पनेतून दरवर्षी या सोहळ्याचे आयोजन केले जाते. जिथे राज्यातील विशेष समाजसेवकांचा आदर व सन्मान केला जातो.



## शिक्षकांचा शिक्षण मंडळावर मोर्चा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्रलंबित शालार्थ प्रकरणांमुळे निर्माण झालेल्या अडचणी, शिक्षण उपसंचालक कार्यालयातील अनियमितता आणि प्रशासकीय विलंबाच्या निषेधार्थ मुंबई विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्यावतीने गुरुवारी (दि.१२) वाशी येथील मुंबई विभागीय शिक्षण मंडळ कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा दुपारी १.३० वाजता वाशी रेल्वे स्थानकातून निघून घोषणाबाजी करत दुपारी ३ वाजता शिक्षण मंडळ कार्यालयावर पोहोचला. या मोर्चात मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यातील सुमारे ३५० कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शिक्षकांच्या प्रश्नांबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. मोर्चादरम्यान प्रा. मुकुंद आंधळकर, प्रा. अमर सिंह, प्रा.प्रकाश दीक्षित, प्रा. रविंद्र भदाणे, प्रा. सुरेश अहिरे, प्रा. विलास खोपकर, प्रा. नितीन पाटील आणि प्रा. मणी यांनी शिक्षकांच्या समस्यांवर भाष्य करत प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर टीका केली. त्यानंतर संघटनेच्या शिष्टमंडळाने मुंबई विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र अहिरे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी अध्यक्ष राजेंद्र अहिरे यांनी सांगितले की, सध्या विभागात १०६ शालार्थ प्रकरणे प्रलंबित असून त्यापैकी ५३ प्रकरणांतील त्रुटींची पूर्तता सुरू आहे. मागील १५ दिवसांत ३३ शिक्षकांना शालार्थ देण्यात आले असून उर्वरित सुमारे २० शिक्षकांना गुढी पाडव्यापूर्वी शालार्थ दिले जातील. तसेच, नव्याने प्राप्त झालेल्या ५३ प्रस्तावांनाही पुढील तीन आठवड्यांत शालार्थ देण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. यापुढे शालार्थचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांत त्यावर कार्यवाही करण्याचे धोरण राबवले जाईल, असेही त्यांनी सांगितले.

जेजुरी गडावर घडली ऐतिहासिक घटना | प्रिया शिंदे, विशाल जावंळकर यांचा पुढाकार

# मुरळींनी साजरा केला महिला दिन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबाचे उपासक वाघ्या व मुरळी नृत्यांगना एकत्र येत इतिहासातील पहिला महिला जागतिक दिन साजरा केला. प्रिया शिंदे आणि लोकवाघ्या विशाल जावंळकर यांनी मुरळींचा वारसा जपला जावा म्हणून जागतिक महिला दिन आणि घाटी कोटमा उत्सव साजरा केला. या सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमातून जागरण गोंधळ नृत्य करीत आपले दैवत खंडोबा देवाला पगडी आणि घोंघडी अर्पित करण्यात आली.



पुर्वी मुरळी खंडोबा देवताच्या धार्मिक सांस्कृतिक क्षेत्रातील पूजनीय मानली जात होती. बदलत्या काळानुसार पारंपरिक जागरण गोंधळाचे स्वरूप बदलत गेल्याने मुरळी ही मनोरंजनाचे माध्यम म्हणून लोक बघू लागले आहेत. पारंपरिक वाद्यही दृष्टीहन होऊ लागली आहेत. तसेच, तरुण मुरळीची कार्यक्रमांत मागणी वाढली आहे. त्यामुळे देवाला आपले सर्वस्व अर्पित करणाऱ्या वयस्कर मुरळी महिलांचे जिने जिकरीचे झाले आहे. म्हणूनच प्रिया शिंदे आणि लोकवाघ्या विशाल जावंळकर यांनी मुरळींचा वारसा जपला जावा म्हणून जागतिक महिला दिन आणि घाटी कोटमा उत्सव साजरा केला. यावेळी सर्व महिला एकत्र आल्या आणि त्यांनी भंडारा कोटमा पूजन करीत महिला दिनाची सुरवात केली. त्यात जेष्ठ महिला मुरळीचें पाद्य पूजा करून त्यांना भेट देण्यात आली.

वार्धक्याच्या काळात मुरळी आणि वाघ्याकडे कुणी बघत नाही. जोपर्यंत तारूण्य आहे तोपर्यंत ताफायात काम मिळते व उपजिविका चालते. ही आमची खंत असून शासनाने आमच्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करीत शासनाने देवसंस्थांनाच्या माध्यमातून प्रत्येक खंडोबा देवस्थान ठिकाणी मुरळी वाघ्या पुनर्वसन केंद्राची उभारणी करावी. तसेच, सर्व वाघ्या मुरळींना कागदपत्रे, जातीच्या अटी शीतल करीत मानधन द्यावे, अशी मागणी प्रिया शिंदे, अहिल्या भुजबळ, रेखा शिंदे, मीरा तायडाबाई शिंदे सोनवणे यांनी केली आहे.

### पुनर्वसन केंद्राची आवश्यकता

सध्या केवळ जेजुरी तीर्थक्षेत्र पंचक्रोशीत तीनशेहून अधिक मुरळी महिला आहेत. तसेच, राज्यातील खंडोबा मंदिर परिसरातही काही प्रमाणात त्या आढळून येतात. परंतु, वार्धक्यात मात्र त्यांना अनाथासारखे जीवन जगावे लागते अथवा गुलामी स्वीकारवी लागते. त्यामुळे वाघ्या मुरळी केंद्राची आवश्यकता आहे. जेणेकरून या उपासक केंद्रातून जगण्याकरिता आवश्यक बाबी तसेच औषध उपचार व माणुसकीचा आधार मिळू शकतो.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे
१५ मार्च
१)श्री.विजयकुमार एकनाथ शिंदे चेंढरे, अलिबाग,१५-३-१९४६
२)श्री.कृष्णाजी मोरू रहाटाडकर ब्राम्हणआळी,अलिबाग १५-३-१९४१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हारुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

कृष्णाजी मोरू रहाटाडकर, वाढदिवस अलिबाग



विजय विश्वनाथ वनगे, वाढदिवस अलिबाग

## नियती बाबरेंचा सत्कार

**रसायनी :** राजिप अलिबाग पाणी व स्वछता विभागाच्या वतीने कॉफी विथ विनर कार्यक्रम या कार्यक्रमा अंतर्गत स्वच्छता सर्वे क्षण करणाऱ्या महिला सरपंच व महिला कर्मचाऱ्यांचे सन्मान पत्र देऊन सत्कार करण्यात आला.

# मातीच्या भांड्याची नागरिकांना भुरळ

## ●माठातील पाणी केमिकल मुक्त; नैसर्गिक थंड पाणी पिण्यास लोकांचा कल

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

उन्हाळ्याच्या झळा दिवसेंदिवस तीव्र होत असताना थंड आणि नैसर्गिक पाणी मिळवण्यासाठी नागरिकांचा कल पुन्हा पारंपरिक मातीच्या माठ व रांजणांकडे वळतांना दिसत आहे. आला उन्हाळा तब्बेत सांभाळा अशी स्थिती झाली आहे. फ्रिजमधील अतिथंड पाण्यामुळे घसा खवखवणे, सर्दी, खोकला, लर्जी यांसारख्या घशाच्या व शरीराच्या तक्रारी वाढत असल्याने अनेक नागरिक आता माठातील नैसर्गिकरीत्या थंड झालेले पाणी पिण्यास प्राधान्य देत आहेत. त्यामुळे माणगाव परिसरात मातीच्या माठ व रांजणांना मोठी मागणी निर्माण झाली आहे. गेल्या अनेक दिवसापासून स्थानिक माती भांडी करणाऱ्या व्यावसायिक



कारागिरांना पुरेशे भांडवल उपलब्ध होत नसल्याने तसेच परराज्यातील या माती भांड्याच्या तुलनेत विकणे परवडत नसल्याने स्थानिक या व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे. तर दुसऱ्या बाजूला मोठ्या प्रमाणात परप्रांतातून येणाऱ्या माती पासून बनवलेली माठ, रांजण, चूल या सह विविध प्रकारची रंगीबेरंगी व विविध डिझाईनची भांड्याचे आकर्षण वाढले असून या भांड्याच्या खरेदीसाठी नागरिकांना भुरळ पडत आहे.

स्थानिक बाजार पेठेपेक्षा बाहेरील बाजारपेठेवर अवलंबून असणाऱ्या ग्राहकांच्या आवडी निवडीनुसार विविध भांडी बनवणे अवघड बनले आहे. मागणी जास्त आणि उत्पादन कमी अशी स्थिती झाली आहे. मातीच्या भांड्यातील पाणी नैसर्गिकरीत्या थंड राहते, तसेच त्याची चवही वेगळी असल्याने उन्हाळ्यात तहान भागवण्यासाठी माठातील पाणी अधिक लाभदायी ठरते. दही, ताक ठेवण्यासाठी लहान मडकी आणि भांडीही मोठ्या प्रमाणात वापरली जातात. तर बस स्थानक गावातील वेशीवर किंवा गावाकडे जाणाऱ्या फाट्यावर माठ, रांजण ठेवून पाणपोई केली जाते. त्यामुळे अनेक व्याकुळ व तहानलेल्या जीवाची तहान भागते. कोकणात सध्या सुरू असलेल्या वाल पोपटीच्या हंगामा मुळे पोपटी पार्टीसाठीही माठांचा मोठ्या प्रमाणात उपयोग होत असल्याने या वस्तूंची मागणी आणखी वाढली आहे.

मात्र वाढत्या मागणीच्या तुलनेत स्थानिक कुंभार कारागिरांकडे माठ, रांजण, चूल आणि इतर मातीची भांडी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याचे चित्र आहे. स्थानिक उत्पादन कमी असल्याने बाजारात परराज्यातून येणाऱ्या मातीच्या भांड्यांची विक्री वाढली आहे.

परराज्यातील वस्तूंचे दर तुलनेने कमी असल्याने स्थानिक कारागिरांना स्पर्धा करणे कठीण जात आहे. परिणामी पारंपरिक कुंभार व्यवसाय हळूहळू स्थानिकांच्या हातून निसटत चालल्याची खंतही व्यक्त होत आहे.

### स्थानिक उत्पादनात घट

एकीकडे नागरिकांकडून मातीच्या भांड्यांना मोठी मागणी असताना दुसरीकडे स्थानिक उत्पादन घटत असल्यामुळे परराज्यातून येणाऱ्या माठ, रांजणांचा बाजार वाढताना दिसत आहे. पारंपरिक कुंभार उद्योग टिकवण्यासाठी स्थानिक कारागिरांना प्रोत्साहन व आर्थिक मदत मिळणे गरजेचे असल्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## मुरुड येथे लाईनमन दिवस साजरा



**मुरूड-जंजिरा :** मुरुड उपविभाग महावितरण कार्यालयामध्ये लाईनमन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. मुरुड उपविभागा अंतर्गत कार्यरत सर्व तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गुणगौरव म्हणून केंद्र शासनाच्या आदेशानुसार ४ मार्च हा दिवस लाईनमन दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.

यावेळी उपविभाग महावितरण कार्यालयामार्फत मुरुड उपविभागातील सर्व शाखा- मुरुड शहर शाखा, मुरुड ग्रामीण शाखा, बोल मांडला शाखा, कोकबन शाखा, आगरदांडा शाखा माझगाव व नांदगाव या शाखा कार्यालायामधील सर्व कर्मचाऱ्याना आमंत्रित करण्यात येऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमास उपकार्यकारी अभियंता कृष्णात सूर्यवंशी, सहाय्यक अभियंता दिनेश ढाले, परमानंद बैकर, कनिष्ठ अभियंता, मनोज देशमुख, संदेश होंडे, सतीश खरात, सचिन पवार, कासिम शैख मुख्य तंत्रज्ञ राजेंद्र पवार, समीर शिंदे, प्रणित वाडकर, गौरी राठोड, विनायक ताजवे, सुप्रिया साष्टे व सर्व जनमित्र मोठ्या संखेने उपस्थित होते. यावेळी उपकार्यकारी अभियंता कृष्णात सूर्यवंशी यांनी मुरुड शहर व ग्रामीण भागातील वीज पुरवठा सुरळीत व व्यवस्थित ठेवण्याचे महत्वपूर्ण काम लाईनमन करत असल्याचे सांगितले.

## नागोठण्यात समाधान शिबीर अभियान

**नागोठणे :** शासन निर्णयानुसार आणि रायगड जिल्हाधिकारी, अलिबाग यांचे आदेशानुसार रोहा तहसील कार्यालयांतर्गत असलेल्या सर्वच मंडळ अधिकारी कार्यक्षेत्रात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान घेण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून नागोठणे मंडळ अधिकारी कार्यालयामार्फत शनिवारी (दि.१४) मार्च रोजी सकाळी ११ वाजता नागोठणे ग्रामपंचायतीच्या शिवगणेश सभागृहात या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात येत्या शैक्षणिक वर्षात १० वी, १२ वी च्या विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेसाठी लागणारे जातीचे दाखले, रहिवासी दाखले, वय व आदिवास दाखले, उत्पन्नाचे दाखले, आधारकार्ड अशा विविध शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेपूर्वी वेळेत मिळण्यासाठी रोहा तहसीलदारांच्या दालनात २६ फेब्रुवारी रोजी रोहा तालुक्यातील शाळांचे मुख्याध्यापक व तालुका शिक्षणाधिकारी यांना आपापल्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे विविध प्रकारच्या दाखल्यांचे फॉर्म त्यासोबत ग्राम महसूल अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांच्याकडून आवश्यक ते पुरावे गोळा करून ते फॉर्म सोबत जोडून तहसील कार्यालयात दाखल करण्यास सांगण्यात आले होते. तसेच तयार झालेले दाखले विद्यार्थांनी कुठेही न जाता मंडळातील शिबिरांमध्ये देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसारच नागोठण्यातील या शिबिरात विद्यार्थ्यांना दाखले वाटप करण्यात येणार आहेत. त्यामुळे नागोठणे मंडळ अधिकारी कार्यक्षेत्रातील शेतकरी, विद्यार्थी व पालक यांनी या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान शिबिरात मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाहतूक पोलिसांचा प्रामाणिकपणा

**माणगाव :** वाहतूक पोलिसांनी आपला प्रामाणिकपणा दाखवीत एका महिलेची हरविलेली बॅग त्या महिलेच्या स्वाधीन केली. वाहतूक पोलिसांच्या या कामगिरीचे सर्वत्र विशेष कौतुक होत आहे. सदर घटना बुधवारी (दि.११) मार्च रोजी सायंकाळी मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव बस स्थानक पोलीस चौकीसमोर एक बॅग वाहतूक पोलीस शिवराज बांडे याना मिळून आली. बॅगेत २ अँड्रॉइड मोबाईल फोन,१० हजार रुपये रोख रक्कम, महत्वाचे कागदपत्रे होते. याबाबत मोबाईलवरून वाहतूक पोलिसांशी संपर्क साधल्यावर वाहतूक पोलिसांनी तुमची बॅग सापडल्याचे सांगितले. नंतर मीरा लाड यांच्या मार्गदर्शनाखाली शिवराज बांडे, पाटील, बोंबले यांनी ती बॅग बोलावून त्यांच्या स्वाधीन केली.

## 'बुद्धिस्ट मायनॉरिटी मिशन'ची कार्यकारिणी जाहीर




**। वावोशी । प्रतिनिधी ।**

बुद्धिस्ट मायनॉरिटी मिशनची राज्यस्तरीय बैठक ठाणे येथे आयोजित करण्यात आली. या बैठकीस राज्यातील सुमारे २५ जिल्ह्यांतील प्रतिनिधी व इतर सदस्य उपस्थित होते. बैठकीचे अध्यक्षस्थान राजाभाऊ कदम यांनी भूषवले.

यावेळी सेवानिवृत्त मंत्रालय अधिकारी रमेश धिवारे यांनी बुद्धिस्ट मायनॉरिटी मिशनची भूमिका स्पष्ट केली.

यावेळी मिशनच्या केंद्रीय कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. राजाभाऊ कदम यांची अध्यक्षपदी, ॲड. अरियं बौद्ध यांची कार्याध्यक्षपदी, रमेश धिवारे यांची सरचिटणीसपदी, ॲड. अशोकराज मोहोड यांची मुख्य सल्लागारपदी, ॲड. वर्षा कांबळे यांची सचिवपदी तर योजन लोखंडे यांची खजिनदारपदी निवड करण्यात आली. तर राज्य उपाध्यक्ष म्हणून दामोदर गायकवाड, राजाराम मोरे, शंकर खुने, रतन बनसोडे, विजय रोकडे, संतोष इंगळे, प्रदीप सुरवाडकर यांची नियुक्ती करण्यात आली.

## पालीत वार्षिक बक्षीस वितरण सोहळा

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

मातोश्री जानकीबाई केशव लिमये शाळेमध्ये ११ मार्च रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून इयत्ता तिसरी व चौथी आणि १२ मार्च रोजी इयत्ता पहिली, दुसरी आणि बालवाडी यांचा वार्षिक बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात वेशभूषा, स्पेलिंग पाठांतर, बोधकथा, श्लोक पाठांतर, देशभक्तीपर गीत गायन, विज्ञान प्रदर्शन, जयंती, पुण्यतिथी निमित्त भाषण स्पर्धा, क्रीडा स्पर्धेत धावणे, चमचा लिंबू लंगडी क्रिकेट डॉज बॉल, दोरीउड्या या स्पर्धांमधील यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. १५ ते २१ मार्च २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

### वरिष्ठांची मर्जी संपादन करा

**मेष :** राशीधारकांना एकूण ग्रहमान पाहता आपल्या पुष्कळशा समस्या या सप्ताहात सुटण्याची शक्यता आहे, मात्र त्या दृष्टीने आपण प्रयत्नशील राहिले पाहिजे. कामात अधिक लक्ष द्या. सरकारी नियमांचे पालन करा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. आर्थिक बाजू ठीक राहील. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः छाती, पोट, डोळे यांच्या विकारांपासून सावध राहा. थोरामोठ्यांच्या गाठीभेटीचे अथवा संपर्काचे योग संभवतात. विरोधकांची धास्ती बाळगू नका. आपल्या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळेल. आपणास ग्रहांची अनुकूलता लाभणार असल्याने आपल्या कर्तृत्वाला चांगला वाव मिळेल. वरिष्ठांची मर्जी संपादन करता येईल. काही नव्या जबाबदाऱ्या पडण्याची शक्यता आहे. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. संगणक व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना चांगला काळ राहील. निकाल आपल्या बाजूने लागेल. **महिलांना :** आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. थोरामोठ्यांच्या संपर्कात राहाल. आर्थिक बाजू ठीक राहील. सरकारी नियमांचे पालन करा. प्रकृतीस्वास्थ्य जपा उद्योग-व्यवसायात प्रगती कराल. **शुभ दिनांक :** १५,१७.

### बोलण्यावर नियंत्रण ठेवा

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहात आपण आपल्या भविष्याचा विचार करण्यापेक्षा वर्तमानकाळातील गोष्टींसाठी त्याचा योग्य विचार करून वागणे अधिक ठीक राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल, मात्र सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. सर्व बाबतीत प्रयत्नशील राहणे मात्र आवश्यक आहे. ज्या गोष्टी आपण बदलू शकत नाही, त्या स्वीकारण्याचे धोरण स्वीकारल्यास हितकारक ठरू शकेल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक ठरेल. त्यामुळे इतरांशी नाराजी आपण टाळू शकाल. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, आपण आपल्या कार्यातील कामे कशी पार पाडता येतील याबाबत अधिक लक्ष द्याल व ती पार पाडण्याचा प्रयत्न कराल. वेळोवेळी ज्येष्ठांशी अथवा जाणकारांशी चर्चा करून प्रश्न सोडविता येतील. कामाचा उत्साह वाढीला लागेल. आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आपण आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. **महिलांना :** कोणाशीही नाराजी पत्करू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवण्याचा प्रय़त्न करा. कलाक्षेत्राला एखादे बक्षीस आपल्याला मिळेल. **शुभ दिनांक :** १८,१९.

### विचारपूर्वक निर्णय घ्या

**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान आपणास मिळणारा फुरसतीचा वेळ आपण निःस्वार्थी कामासाठी दिल्यास आपणास कृतकृत्य झाल्याचे समाधान मिळू शकेल. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट होण्याची शक्यता आहे. आपण इतरांना ऊर्जा देण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. प्रकृती जपा. कोणताही निर्णय घेताना अतिशय विचारपूर्वक घ्या. नोकरदारांना चांगला दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला उत्तम प्रोत्साहन मिळेल. महिलांच्या अंगभूत कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. आर्थिक गुंतवणूक करण्याआधी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे हितकारक ठरेल. ओळखीचा लाभ घेता येईल. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवावा. आपल्यावरील जबाबदाऱ्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केल्यास मोठा लाभ होईल. विरोधकांबाबत चिंता करू नका, त्यांच्यावर अंकुश ठेवता येईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळतेजुळते घेण्याचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. **महिलांना :** माणूस पारखण्याचे सूत्र पाळल्यास पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही. व्यवसायातील मतभेद टाळण्याचा प्रयत्नकरा. **शुभ दिनांक :** १६,१७ .

### आचरण चांगले ठेवा

**कर्क :** या सप्ताहात कर्कराशीधारकास या सप्ताहात आपण आपल्या प्रकृतीबाबत अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः नियमित आहार, व्यायाम, योगाचा अवलंब करा. संघर्षाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. मेहनतीला पर्याय नाही. नको त्या प्रलोभनात अडकू नका. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळू शकेल. कुटुंबासाठी व मुलांसाठी अधिक वेळ देऊन त्यांची काळजी घ्यावी. आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. नियमित व्यायाम, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. विशेषतः उष्णतेच्या विकारापासून सावध राहा. आपली मानसिकता बिघडणार नाही याची दक्षता घ्या. घरगुती वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. सर्वांशी जुळवून घ्या. आर्थिक बाजू लक्षात घेऊन हिशोबी राहण्याचा प्रयत्न करा. जागेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आदरयुक्त वागणे कायम ठेवल्यास त्याचा उयोग होईल. नव्या ओळखींचा लाभ घेता येईल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. **महिलांना :** प्रकृतीबाबत, विशेषतः उष्णतेच्या विकारांबाबत सावध राहा. आरोग्याचा त्रास होऊ शकतो. वेळेवर जेवण घ्या, नातलगांन कडून चांगली बातमी मिळेल. **शुभ दिनांक :** १५,१७.

### प्रलोभनात अडकू नका

**सिंह :** राशीसाठी या सप्ताहात आपण मुलांशी सामंजस्याने वागणे हितकारक ठरू शकेल. चिकाटीने आपण आपले काम पूर्ण करू शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मित्रत्व राखावे. नको त्या प्रलोभनात अडकू नका. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. मुलांनी अभ्यासाकडे अधिक लक्ष द्यावे. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. आपल्या कामाबाबत अथवा महत्त्वाच्या गोष्टींची गुप्तता पाळल्यास हा आठवडा चांगला जाईल. मालमत्तेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवण्याची शक्यता आहे, तेव्हा ते सामंजस्याने सोडवा. आप्तेष्टांशी चांगले संबंध राहतील. आपण जोडीदाराच्या दैनंदिन समस्या सोडविण्याचा प्रयत्न करा. इतरांना मदत करण्यात पुढाकार घ्या. घरून काम करताना जागरूक राहा. साथीदाराशी प्रेमसंबंधांने वागणे हितकारक राहील. त्यांच्या मनाचा विचार करून वागा. **महिलांना :** बेजबाबदारपणे कोणतेही कृत्य करू नका, धोका आहे. इतरांमधील दोष काढण्याचे कटाक्षाने टाळावे. आपल्या भावनांना आवर घालून जबाबदारपणे वागण्याचा प्रयत्न कराव. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास आपल्याबद्दल गैरसमज होण्याचे प्रसंग टाळू शकाल. **शुभ दिनांक :** १८,१९.

### अनावश्यक खर्च टाळा

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान आपण थोरामोठ्यांच्या विचारांचे स्मरण करा. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळावा. साहसीवृत्ती कटाक्षाने टाळा. नोकरादारांना दिलासा मिळेल.बौद्धिकक्षेत्राला वाव मिळेल. आपली बलस्थाने कोणती याचा मागोवा घ्या, म्हणजे त्यांचा भावी काळासाठी उपयोग करता येईल. या आठवड्यात आपली आर्थिक बाजू सावरता येईल. काही जुनी वसूली होण्याची शक्यता. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. कामकाजात घरुनच व्यस्त राहाल. आपल्या हट्टी स्वभावाला मुरड घालण्याचा प्रयत्न करा. आर्थिक गुंतवणूक करताना तज्ञांचा सल्ला घेणे हितकारक ठरेल. कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. अनाठायी खर्च करण्याचे टाळावे. कठीण परिस्थितीत हुशारीने, चतुराईने पुष्कळ गोष्टी साध्य करता येतील. आपल्या नावाचा विचार मान सन्मानसाठी होणार आहे, विद्यार्थीवर्गाला चांगली संधी मिळेल. **महिलांना :** प्रकृतीच्याबाबत चालढकलपणा करू नका अनावश्यक खर्च टाळावा. आर्थिक बाबतीत तज्ज्ञांच्या सल्ल्याने व्यवहार करावेत. जेणेकरून ज्याचा योग्य परतावा आपणास मिळू शकेल. **शुभ दिनांक :** १७,१८.

### तडजोडीचे धोरण स्वीकारा

तुळ : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या सप्ताहात आपण आपल्या प्रकृतीबाबत अधिक जागृत राहावे. विशेषतः कफ, उष्णतेचे विकार, खाण्यापिण्याचा हलगर्जी पणा करू नका. जे जमते तेच करा. वाद-विवाद कटाक्षाने टाळा. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. दररोजचा व्यायाम व योगाचा अवलंब करा निराशेचे सावट दूर करून आपल्या ध्येयासाठी प्रयत्न करा. तडजोडीचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. आवश्यक कामाचा पाठपुरावा करणे महत्त्वाचे ठरू शकते. प्रयत्नाने बऱ्याच गोष्टी साध्य करू शकाल. प्रकृतीच्या बाबत अधिक जागरूक राहा. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. कामाचा व्याप वाढणार आहे. मन स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करा. आपल्या कामाकडे जास्त लक्ष दिल्यास तुमच्या मनाप्रमाणे गोष्टी घडण्याची शक्यता आहे. विद्यार्थीवर्गाने आभ्यासा बाबत दुर्लक्ष करू नका. **महिलांना :** महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. घरून काम करतानाही वरिष्ठांशी मिळतेजुळते धोरण स्वीकारा. आपल्या कामाचे बक्षीस बढतीच्या रूपात आपल्याला मिळणार आहे. **शुभ दिनांक :** १६, २०.

### रागावर नियंत्रण ठेवा

वृश्चिक : राशीसाठी या सप्ताहात इतरांपेक्षा स्वतःकडे अधिक लक्ष द्या. आपल्या मनाला जे पटेल ते योग्य समजून वागणे योग्य ठरेल. आपल्या योजना स्वतःपुरत्या ठेवा. त्याची वाच्यता करू नका. आपले उद्दिष्ट पुढे ठेवून ते गाठण्याचा प्रयत्न करा. एक उद्दिष्ट ठेवून ते साधण्यासाठी प्रयत्नशील राहा. महिलांना त्यांच्या आवडीप्रमाणे कामे करता येतील. प्रकृतीची पथ्ये पाळा. रागावर नियंत्रण ठेवा. मुलांच्या विकासाकडे लक्ष द्या. मित्रमंडळींच्या संपर्कात राहा. पहिले तीन दिवस प्रथम सत्रात प्रकृतीबाबत जागरूक राहावे. दंतविकार, उष्णतेचे विकार याकडे लक्ष द्या. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. इतरांची मने दुखावणार नाही, याची काळजी घ्या आपल्या कर्तृत्वाला वाव मिळेल. मोठ्या व्यक्तींचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून ध्येय गाठण्याचा प्रयत्न करा. विरोधकांना न दुखवता आपले कार्य साध्य करा. कायद्याचे पालन करा. नियम व कायदे यांचे पालन करा. खर्चाचे प्रमाण वाढणार आहे. **महिलांना :** अनावश्यक खर्च टाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवता येईल.आपल्या विकासाची एखादी योजना आखणे आवश्यक आहे. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. **शुभ दिनांक :** १५,२१.

### चातुर्याचा उपयोग करा

धनु : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या दैनंदिन जीवनात अनावश्यक खर्च करण्याचे टाळल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. आर्थिक बाजू ठीक राहील. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. नोकरदारांना बराचसा दिलासा मिळेल. आपण आपल्या चातुर्याचा उपयोग केल्यास उत्तम. व्यापार-उद्योगाला चांगला प्रतिसाद मिळेल व प्रगती करता येईल. गुरूकृपेचा लाभ घेता येईल व हाती घेतलेल्या कामात परिश्रमाने यश संपादन करता येईल. प्रकृतीची पथ्ये पाळा. मौल्यवान वस्तू सांभाळा. प्रवासात सावधानता बाळगा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. या सप्ताहात शांतता व संयम बाळगणे आवश्यक. आपल्या कार्यकौशल्याचा कस लागेल. विरोधकांवर कडक नजर ठेवा. त्यांना संधी देऊ नका. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. कुणालाही नाराज करू नका. **महिलांना :** आपल्या कलाक्षेत्राला चांगला प्रतिसाद मिळेल व सामाजिक क्षेत्रात आपली वाहवा मिळवाल. आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा, त्यामुळे गैरसमज वाढणार नाही. शेतीविषयक व स्थावरजंगमबाबतची कामे मार्गी लागतील. **शुभ दिनांक :** १९,२०.

### व्यवहारात सावधानता बाळगा

**मकर :** राशीसाठी या आठवड्याचे ग्रहमान पाहता आपण आपल्या हुशारीने व कौशल्याने आपले अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न कराल व त्यात यशस्वी व्हाल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. बौद्धिक क्षेत्राला चांगला वाव मिळेल. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. काहींना विवाहाचे योगही संभवतात. नको त्या प्रलोभनात मात्र अडकू नका. सरकारी नियमांचे कटाक्षाने पालन करा. येणाऱ्या प्रसंगांना धैर्याने सामोरे जा. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण कोणालाही नको ती आश्वासने देण्याचे टाळल्यास हा सप्ताह सर्व दृष्टीने चांगला जाऊ शकेल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल व वरिष्ठांची चांगले संबंध ठेवता येतील. शेतीविषयक कामांना गती मिळेल. राजकीय क्षेत्रात आपले नाव होण्याची शक्यता राहील, मात्र आपल्या भावी योजनांबद्दल गुप्तता पाळणे हितकारक राहील. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतल्यास यशाची अपेक्षा ठेवू शकाल. **महिलांना :** कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल, एखादी नवी ऑफर मिळेल कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. घरात धुसपूस होईल. **शुभ दिनांक :** १७,१८,

### हिशोबी राहणे आवश्यक

कुंभ : राशी या सप्ताहातील ग्रहमान पाहता या आठवड्याचे ग्रहमान पाहता आपण आपली कर्तव्ये काय आहेत याचा विचार करून त्यांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न केल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारावे. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावे. सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवून कोणतेही काम केल्यास बऱ्याच प्रमाणात यशस्वी होऊ शकाल. कलाक्षेत्रातील व्यक्तींना प्रोत्साहन मिळेल. सामाजिक क्षेत्रात वाहवा मिळवू शकाल. कोर्ट व शेतीविषयक कामांना चालना मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. कौटुंबिक वातावरण चांगले राहील. शुभकार्याचे संकेत मिळतील. सरकारी नियम कटाक्षाने पाळा. आपण कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य दिल्यास आपणास चांगले समाधान मिळू शकेल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. **महिलांना :** नको त्या अपेक्षा ठेऊ नका आपले काम भले आपण भले हे धोरण ठेवा. सामंजस्याने परिस्थिती हाताळा. आर्थिक बाजू ठीक राहील. **शुभ दिनांक :** १५,१६.

### अहंकारापासून दूर राहा

**मीन :** हा साप्ताहात मीनराशीसाठी विशेषतः नोकरदारांना मोठा दिलासा मिळू शकेल. आपला ताण उतरणार आहे, आपल्या कामाचे कौतुक केले जाईल, पण अहंकारापासून दूर राहणेच योग्य ठरेल. आपली मते दुसऱ्यांवर लादू नका. आर्थिक बाजू चांगली ठेवता येईल, खिशात पैसा खेळेल, पण पर्यायाने खर्चाचे प्रमाणही वाढण्याची शक्यता आहे. स्वतःमधील ऊर्जा पाहा व त्याप्रमाणे काम करणे ठीक राहील. कौटुंबिक वातावरण वादासारख्या प्रसंगांनी बिघडणार नाहीत याची दक्षता घ्या. प्रकृतीची पथ्ये पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. मित्रांची पारख करून त्यांची मैत्री ठेवा. आपण आपल्या कार्यक्षेत्रातील कामासंबंधी प्रयत्नशील राहिल्यास आपल्या ध्येयाजवळ जाऊ शकाल. व्यावसायिक क्षेत्रात मात्र तज्ञांच्या सल्ल्याशिवाय आर्थिक व्यवहार करू नये. हाती घेतलेल्या कार्यात यशाची अपेक्षा ठेवू शकता. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. **महिलांना :** विशेषतः महिलावर्गाला त्यांच्या अंगभूत कलागुणांना उत्तम संधी मिळेल. प्रवास योग संभवतात. प्रकृतीबाबत जागरूक राहा, योगाचा अवलंब करा. **शुभ दिनांक :** २०,२१.

# नांदगावमध्ये महाराजस्व अभियान



। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील माळी समाज हॉलमध्ये महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तहसीलदार आदेश डफळ, नायब तहसीलदार संजय तवर, महसूल नायब तहसीलदार राजश्री साळवी, निवडणूक नायब तहसीलदार कल्याण देऊळगावकर, पुरवठा निरीक्षक गांगुर्डे, गणेश नाक्ती, सेजल सुदेश घुमकर, मेघा मापगावकर, वैशाली रणदिवे, उदय थळे, जितेंद्र दिवेकर, विक्रांत कुबल, फैरोज घलटे, अस्लम हलडे, यशवंत पाटील, तहसील कार्यालयातील कर्मचारी, मंडळ अधिकारी मंगेश इग्रुळकर, नांदगाव महसूल मंडळातील सर्व तलाठी, कर्मचारी उपस्थित होते.

या अभियानाच्या अनुषंगाने गावोगावी जाऊन नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. तसेच शिबिरादरम्यान उपस्थित ग्रामस्थांकडून विविध शासकीय सेवांसाठी अर्ज स्वीकारण्यात आले होते त्यानुसार अनेक सेवांचा तात्काळ लाभ शिबीरातील नागरिकांना देण्यात आला. शिबिरामध्ये महसूल विभागामार्फत उत्पन्नाचे दाखले,वय व अधिवास प्रमाणपत्र, डिजिटल सातबारा, डिजिटल ८-अ उतारा, रेशन कार्ड, आधार कार्ड अपडेट, संजय गांधी निराधार योजना लाभार्थी नोंदणी, निवडणूक विभागाच्या सेवा फॉर्म क्र. ६ (नवीन मतदार नोंदणी), फॉर्म क्र. ७ (नाव वगळणे), फॉर्म क्र. ८ (दुरुस्ती / स्थलांतर) आदी.सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

तहसीलदार आदेश डफळ यांनी नागरिकांना आवाहन केले कि, छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्र समाधान शिबीर अभियान अंतर्गत पुढील शिबीर १० एप्रिल रोजी वळके येथील हनुमान मंदिरात तर दि.१७ एप्रिल रोजी उसरोली टेप येथे पंचक्रोशी आगरी समाज हॉलमध्ये आयोजित करण्यात आले असून नागरिकांनी या शिबिरामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन महसूल विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध सेवांचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार आदेश डफळ यांनी केले.

# विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन

। माथेरान । प्रतिनिधी ।

माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेच्या शिक्षण समितीची पहिली सभा गुरुवारी (दि. १२) बाळासाहेब ठाकरे सभागृहात आयोजित करण्यात आली होती. पुणे ज़िल्हा परिषदेच्या कन्हेसर येथील शाळेला तिन्ही शाळेच्या शिक्षकांसह भेट देऊन तेथील विद्यार्थ्यां साठी असलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचा अभ्यास करण्यासाठी दौरा करण्याचा महत्वापूर्ण निर्णय घेण्यात आला.

कन्हेसर येथील ज़िल्हा परिषदेच्या शाळेला देशातून प्रथम मानांकन देण्यात आलेली शाळा आहे. नगरपरिषदेच्या वीर भाई कोतवाल शाळा, प्रा शांताराम गवाणकर हायस्कुल व सेंट झेवीर्स हायस्कुल या तिन्ही शाळांच्या विद्यार्थ्यांसाठी कराको गायन स्पर्धा, फुटबॉल कोचिंग कॅम्प व डिसेंबर महिन्यात अंतरशालेय क्रीडा स्पर्धाचे आयोजन निश्चित करण्यात आले. याप्रसंगी सुनील शिंदे, प्रतिभा घ्यावे, केतन रामाने, सुरेखा साळुंखे दिलीप अहिरे, दिनेश ढोले, अभिनय कळंबे, भारत पाटीलआदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पुनाडे, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १३६/१२ | एकूण क्षेत्र ०-१७-२० हे.आर | २.१२ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही /-
दिनांक :- १५/०३/२०२६
**अॅड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ, मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

# महिलांसाठी विविध स्पर्धा उत्साहात




। सोगांव । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील मापगाव येथे ग्रामविकास परिवर्तन आघाडी मापगावतर्फे महिलांसाठी होम मिनिस्टरसह इतर विविध प्रकारच्या भव्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धेत महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.

कार्यक्रमाचे उद्घाटन महिला बचत गटांच्या अध्यक्षा यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात करण्यात आले. यावेळीग्रामविकासपरिवर्तनआघाडी मापगांवचे संतोष राऊत, जगदीश सावंत, वसीम कुर, अजित घरत, विजय भगत, स्नेहा रुत, प्रभाकर मोहिते, उत्तम राऊत, मुद्स्सर कुर, किफायत कुर, विश्वास थळे, सुमेश थळे, प्रमोद दळवी, राजेंद्र घरत, माजी मज्जीद कूर, दत्तात्रेय राऊत, दत्ताराम राऊत, मनीष म्हात्रे, मंगेश सुतार, प्रवीण पाटील, तेजस काठे, उत्तम राऊत, गितेश करळकर, संतोष रुत, शफी वाकनीस व मापगाव पंचक्रोशीतील विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिला व पुरुष ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी कर्तृत्ववान महिलांचा मान्यवरांच्या सत्कार करण्यात आला. होम मिनिस्टर स्पर्धेत मयुरी थळे यांनी प्रथम क्रमांक पटकावला त्यांना रोख रक्कम १५,००० रुपये देण्यात आले तर निमा पाटील यांनी द्वितीय क्रमांक पटकावला त्यांना रोख रक्कम १०,००० रुपये देण्यात आले, तसेच अनन्या अल्पेश मल्हार यांनी तृतीय क्रमांक पटकावला त्यांना रोख रक्कम ५,००० रुपये देण्यात आले. यासोबतच संघवी हुमणे, रेणुका थळकर, चित्रा चापडे, राजश्री जाधव, कावेरी दळवी या सर्व महिलांना चतुर्थ क्रमांक विभागून प्रत्येकी रोख रक्कम ३,००० देण्यात आले. कार्यक्रमास सर्व थरांतील व सर्व समाजातील महिलांची उपस्थिती हि लक्षणीय होती. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष राऊत यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रामविकास परिवर्तन आघाडी मापगावचे सर्व सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

## म्हसळ्यात हॉटेल व्यावसायिकांवर संक्रांत

। म्हसळा । प्रतिनिधी ।

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशात तेल व गॅस तुटवड्याची स्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्याचे पडसाद आता ग्रामीण भागातही उमटू लागले आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून शासनाने व्यावसायिक वापरासाठी देण्यात येणाऱ्या गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यावर तात्पुरती मर्यादा आणल्याची माहिती मिळत असून यामुळे म्हसळा तालुक्यातील हॉटेल व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. तालुक्यातील हॉटेल, खानावळी, चहाच्या टपऱ्या आणि नाश्त्याचे स्टॉल चालवणाऱ्या व्यावसायिकांचे कामकाज प्रामुख्याने व्यावसायिक गॅस सिलिंडरवर अवलंबून असते. मात्र सध्या सिलिंडरचा पुरवठा बंद झाल्याने अनेक हॉटेल व्यावसायिकांसमोर व्यवसाय कसा चालवायचा असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक श्री. धर्मा धोंडू पवार यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन :**
**मौजे - गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकत.**

| जुना सर्व्हे नंबर / हिस्सा नंबर | नवीन सर्व्हे नंबर / हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| पूर्वीचा महसूल गांव भालीवडी सर्व्हे नंबर २१९/२ | ७०/२ | ०.३८.५० पो.ख. ०.०२.३० | १-२६ |

वर नमूद मिळकतीपैकी खरेदी देणार यांनी खरेदी दिलेले वरकस क्षेत्र ०.२३.३० हे. आर.चौ.मी.

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल ०९३२६२३६९२३
**अॅड. वरुण नितीन देशमुख**
पत्ता. देशमुख निवास, गुंडगे रोड, मु.पो. ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ११२/५ | एकूण क्षेत्र ०-४८-०० हे.आर | ०.२८ |
| १११/३ | एकूण क्षेत्र ०-२८-४० हे.आर | १.३७ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही
दिनांक :- १५/०३/२०२६
**अॅड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ, मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, मौजे- कर्नाळा, तालुका- पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही माझे अशिल श्रीमती. आयशाबीबी गुलामसाहेब गौस, श्रीमती. अलमास दानियाल चिवणे, श्रीमती.परविन रफिक नाईक, श्री. इजहान सगीर पिठठू, श्री. नसीम सगीर पिठठू, श्रीमती.मेहजबिन जावेद पिठठू, श्रीमती.रोजीना सगीर पिठठू, श्री. फैज अहमद अब्दुल रेहमान पिठठू, श्री.लईक अहमद अब्दूल रेहमान पिठठू, श्रीमती.सबा अमिर किरकिरे, श्री. असदउल्लाह अशफाक पिठठू, श्रीमती.सुलताना अशफाक पिठठू, श्रीमती सना समद शेख, श्री. अबिद लईक अहमद पिठठू, श्री. यासर लईक अहमद पिठठू सर्व रा.मौजे- आपटा, तालुका-पनवेल, जिल्हा रायगड यांचेकडून नोंदणीकृत खरेदीखताने मालकीहक्काने कायमस्वरूपी विकत घेण्याचा विचार करीत आहेत.

**वरीलप्रमाणे परीशिष्ट**
**मौजे-कर्नाळा, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १४३ | ४/२/१ | एकुण क्षेत्र ०.५१.०० | ०.०० |

सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील परिशीष्टातील वर्णन केलेल्या मिळकती मधील हक्क, हितसंबंध व अधिकार आणि/किंवा इतर फायदे याबाबत ज्या कुणाची समझोता करार, साठेकरार, विकसनकरार, फरोक्त, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, चार्ज, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, ताबा, कुळ, वहिवाट, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन किंवा इतर बाबींद्वारें हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध असेल तर त्यांनी तशा प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हितसंबध ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून खालील सही करणार यांच्या खालील पत्त्यावर १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह सादर करावी. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा वगैरे न आल्यास वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती या निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध नाही असे समजून माझे अशिल वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक:-१४/०३/२०२६
**KISHORA. DHAKAD**
(ADVOCATE HIGH COURT)
Add-Office No.21, Muncipal Complex,
Near Vasudev Balvant Fadke Natyagruha,
At-Panvel, Taluka-Panvel 410206
Email-kishordhakad@yahoo.co.in
Mobile No. 9867051330

# महिलांसाठी कौशल्य विकास उपक्रम



। चणेरा । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील न्हावे ग्रुप ग्रामपंचायतीमार्फत महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी १५ वा वित्त आयोग निधीतून कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून महिला बचत गटांसह परिसरातील सर्व महिलांना लघुउद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जात असून महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशिक्षण दि. १४, १५ व १७ मार्च रोजी सकाळी १०.०० ते सायं. ०५.०० या वेळेत केंद्रीय मराठी शाळा, न्हावे येथे आयोजित करण्यात आले आहे. या कार्यशाळेत महिलांना दैनंदिन वापरातील विविध उत्पादने तयार करण्याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले जात आहे. यामध्ये केक व कुकीज तयार करणे, बॅगा तयार करणे, साबण बनविणे, फिनाईल तयार करणे तसेच मच्छीपासून लोणचे व पापड तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे.

उपक्रमाचे आयोजन जागृती स्वयंसहायता महिला मंडळाच्या माध्यमातून करण्यात आले असून अध्यक्ष हर्षा सुरेश आब्रुस्कर, सचिव प्रियंका गणेश पवार यांच्या पुढाकाराने कार्यक्रम पार पडत आहे. प्रशिक्षक दिप्ती गायकर या महिलांना विविध उत्पादनांची माहिती व प्रत्यक्ष मार्गदर्शन देत आहेत. प्रशिक्षणावेळी नितीन डबीर, पांडूरंग कासकर, संध्या पाटील, दिपक वारगे, अश्विनी डबीर व असंख्य महिला उपस्थित होत्या.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे शिलारवाडी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ४८/२ | एकूण क्षेत्र ०-०९-९० हे.आर | ०.०९ |
| ४९/८ | एकूण क्षेत्र ०-२७-०० हे.आर | ०.२२ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही
दिनांक :- १५/०३/२०२६
**अॅड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ, मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **जाहिरात : 'विहीर' आपल्या शेती, वाडी, बंगला सोसायटीत पाण्याच्या** सोयीसाठी RCC रिंगाची विहीर बनवून घेण्यासाठी संपर्क करा. रणजित पाटील. फोन : ९८३४३०३९४१, ९८८१६३७०४७ अलिबाग
- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२३ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग मो. ८७७९८०५३५३
- **अलिबाग मधील ऑफिस करीता** खालील जागा भरणे आहे. साईट सुपरवायझर व ऑटोकॅड ड्राफ्ट्समन मो.नं. ९९७०३९१६९७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१



# रातवड माध्यमिक विद्यालयात बांबू प्रशिक्षण

। माणगाव । प्रतिनिधी ।

छत्रपती शिक्षण मंडळ संचलित माध्यमिक विद्यामंदिर रातवड येथे विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी दोन दिवसीय बांबू प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या बांबू कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्राच्या सहकार्याने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेला श्रीनिवास वारखंडकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच सुरेश दारवा, प्रवीण मावसकर या प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देत विविध बांबू वस्तू तयार करण्याचे कौशल्य शिकविले. या कार्यशाळेत विद्यालयातील ३३ विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी बांबूपासून ज्वेलरी, पेन स्टँड, राखी, चटई तसेच विविध आकर्षक वस्तू तयार केल्या. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंना पालक, कला प्रेमी यांच्याकडून मोठी दाद मिळाली आहे. कार्यशाळेचे नियोजन विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम, अजित शेडगे यांनी केले. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले आहे.

कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी विद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली. संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकिशोर जोशी, डॉ. निलेश रेवगडे, सुनील पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्याला वाव मिळत असल्याचे सांगितले.

# रोटरी क्लब रोहा सेंट्रलच्या अध्यक्षपदी लक्ष्मण मोरेंची निवड

। रोहा । प्रतिनिधी ।

सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या रोटरी क्लब रोहा सेंट्रलच्या सन२०२५-२६) अध्यक्षपदी रोठ गावातील लक्ष्मण मोरे यांचे सर्वानुमते अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

लक्ष्मण मोरे हे एक उत्तम संघटक तसेच सामाजिक कार्यकर्ते म्हणून तालुक्यात सुपरिचित असून रोटरी सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या एका क्लबचे नेतृत्व करण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. रोटरीच्या प्रथेनुसार दि.१ जुलै रोजी ते आपला पदभार स्वीकारणार आहेत. अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल लक्ष्मण मोरे यांचे क्लबचे विद्यमान अध्यक्ष विजय दिवकर, राकेश कागडा, मयूर दिवेकर, डॉ. देवेंद्र जाधव, मनोज बोराणा, विकास जैन, निखिल दाते सर्व क्लब सदस्यांनी अभिनंदन केले.

## जाहीर नोटीस

माझे आशिल यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचेतर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते पुढील प्रमाणे.

मौजे अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड व अलिबाग नगरपालिका हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र एकक आर. चौ.मि. से.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| २७/२१ | ३.०६.०० | ३०.६० |

सदरहू मिळकतीत अलिबाग नगरपालिका मालमत्ता क्र. झेड १ ए.एस. बी.२००४३८३१९९८/१ या वर्णनाची मिळकत व त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, वहिवारंग, वगैरे सह अशी मालमत्ता सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री.अभिजीत विजय दाणी, मु. अलिबाग यांचे मालकी हक्काची असल्याचा भरवसा श्री.अभिजीत विजय दाणी यांनी दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, वहिवाटीचे हक्क, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, कब्जा कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ दिवसांचे मुदतीत खाली सही करणार यांजकडे सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल व मालकी हक्काची खात्री करून त्या अनुशंगाने दाखला देण्यात येईल. मागाहून कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख १२.०३.२०२६
**(अॅड. एस.वाय.बारटके)**
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक गणेश लक्ष्मण कानडे, सचिन राम पवार सीमा कल्लाकंडी जयारामन हे आहेत. परंतु विद्यमान मालक गणेश लक्ष्मण कानडे, सचिन राम पवार, विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे कळंब, ता- सुधागड, जि- रायगड**

| सर्वे नंबर | क्षेत्र हे. आर | आकार |
|---|---|---|
| ११२/८ | एकूण क्षेत्र ०-५०-०० पैकी लिहून देणार याच्या हिस्साचे क्षेत्र ०-२०-० | ०-०८ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

ठिकाण- पाली सुधागड
दि. १५/०३/२०२६
सही /-
**अॅडव्होकेट. तुषार गणेश कानडे**
कार्यालय - कळंब रोड कॉर्नर, जवळ हॉटेल अन्नपूर्णा, जांभुळपाडा, तालुका सुधागड, जिल्हा रायगड पिन - ४१०२०५
मोबाईल नंबर - ९१६८८०१०४८

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




## राशीभविष्य

- **मेष** : नवीन योजना सुरू कराल. कौटुंबिक जीवनात आनंददायी घटना घडतील. सत्संग घडेल.
- **वृषभ** : अपेक्षित यश मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानकारक घटना घडतील. उत्साह वाढेल.
- **मिथुन** : वादविवादाचे प्रसंग टाळावे. योजलेली कामं मनासारखी होतील. जामीन राहू नका.
- **कर्क** : नोकरीत वरिष्ठांची मर्जी लाभेल. कौटुंबिक सौख्य मिळेल. अडचणी कमी होतील.
- **सिंह** : व्यवसायातील समस्या दूर होतील. मुलांची प्रगती होईल. वादविवाद टाळावे.
- **कन्या** : खर्चाचे प्रसंग वाढतील. अडचणीतून मार्ग निघेल. गृहसौख्य लाभेल.
- **तूळ** : सामाजिक कार्यात सफलता मिळेल. वेळेचा दुरुपयोग करु नका. अडचणी कमी होतील.
- **वृश्चिक** : कौटुंबिक जीवनात अनुकूलता वाढेल. व्यवसायातील समस्या कमी होतील. अपेक्षित घटना.
- **धनु** : व्यवसायानिमित्त प्रवास घडेल. पैशाचे व्यवहार विचारपूर्वक करावे. कोर्टप्रकरणं टाळावीत.
- **मकर** : स्पर्धांमध्ये यश मिळेल. आर्थिक टंचाई जाणवणार आहे. भावंडांशी मतभेद टाळावे.
- **कुंभ** : व्यवसायातील योजना मार्गी लागतील. नोकरीत समाधानकारक घटना घडतील. प्राप्ती वाढेल.
- **मीन** : व्यवसायानिमित्त प्रवास घडेल. सुखस्वास्थ्य लाभेल. प्रतिकुलतेवर मात कराल.

सौंदर्यसाधना

## उन्हाळ्यात वापरा हे स्क्रब

उन्हाळ्यात त्वचेची विशेष काळजी घ्यावी लागते. या दिवसात त्वचा कोरडी, निस्तेज दिसते. चेहऱ्याचं सौंदर्य जपण्यासाठी विविध प्रकारचे स्क्रब वापरले जातात. बाजारात मिळणाऱ्या स्क्रबमध्ये घातक रसायनं असू शकतात. म्हणूनच घरीच स्क्रब तयार करता येतील. उन्हाच्या झळांपासून त्वचेचं रक्षण करण्यासाठी कोणती स्क्रब तयार करायची? जाणून घेऊ या.

* कॉफी, मध आणि बदामाच्या तेलापासून स्क्रब बनवता येईल. कॉफीमधल्या अँटिऑक्सिडंट्समुळे त्वचा उजळते. मृत त्वचा निघून जाते. चमचाभर मधात तेवढीच कॉफी आणि अर्धा चमचा बदामाचं तेल घाला. या मिश्रणाने चेहऱ्याला मसाज करा. थोड्या वेळाने धुवून टाका.

* ग्रीष्म ऋतूत त्वचेची चमक टिकवून ठेवण्यासाठी बटाट्याचा वापर करता येईल. थोडा बटाटा वाटून घ्या. ही पेस्ट चेहऱ्याला लावा. दहा मिनिटांनी धुवून टाका. चेहरा उजळून निघेल. **(क्रमश:)**

## १५ मार्च

दिनविशेष

**जागतिक ग्राहक दिन**

- **२०१५** : ज्येष्ठ गायिका कृष्णा कल्ले यांचे निधन.
- **२०१६** : 'रिअल इस्टेट' विधेयक लोकसभेत मंजूर.
- **२०१७** : शशांक मनोहर यांचा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या कार्याध्यक्षपदाचा राजीनामा.
- **२०१८** : नवी दिल्लीत आपल्या राजनैतिक अधिकारी–कर्मचाऱ्यांचा छळ होत असल्याचा कांगावा करत पाकने उच्चायुक्तांना मायदेशी बोलावलं.

स्मार्ट टिप्स

## असं बनवा 'जीआयएफ'

सोशल मीडियावर 'जीआयएफ' हा प्रकार खूप लोकप्रिय झाला आहे. गंमत म्हणून 'जीआयएफ' तयार करायला आवडेल का, मग या टिप्स तुमच्यासाठीच आहेत.

* यू ट्यूब व्हिडिओपासून जीआयएफ तयार करण्यासाठी तुमचा आवडता व्हिडिओ ओपन करा. या व्हिडिओच्या युआरएलमध्ये यू ट्यूबच्या आधी 'जीआयएफ' लिहा. * यानंतर तुम्हाला 'जीआयएफएस डॉट कॉम'वर वळवलं जाईल. इथे तुम्ही जीआयएफ सुरू होण्याची आणि संपण्याची वेळ नोंदवू शकता. * इथे दिलेल्या सूचनांचं पालन केल्यानंतर 'क्रिएट जीआयएफ' या ऑप्शनवर क्लिक करावं लागेल. यानंतर तुमच्यासमोर एक पेज उघडेल. यात काही पर्याय दिलेले असतील. यात 'पब्लिक' आणि 'प्रायव्हेट' असे दोन पर्याय दिसतील. यापैकी कोणताही पर्याय तुम्ही निवडू शकता. * यानंतर नेक्स्टवर क्लिक करा. इथे तुम्हाला 'सबस्क्रिप्शन'बद्दल विचारलं जाईल. 'नो थँक्स' म्हणा. आता नवं पेज उघडेल. त्यावर तुमचं 'जीआयएफ' दिसू लागेल.

### पंचांग

**रविवार, १५ मार्च २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, फाल्गुन कृ. ११, चंद्रराशी : मकर, नक्षत्र : श्रवण, योग : परिघ, सूर्योदय ६.४९, सूर्यास्त ६.४६

### फॉरवर्ड्स

**हमारीं हैसीयत क़ा अंदाज़ा ये जानकर लगालों...**

**हम उनकें नहीं होतें ज़ो हर क़िसी क़े हो जायें...!**

नवलकथा

## 'मॅजिक ऑफ मेमरीज'

'शार्क टँक इंडिया' हा कार्यक्रम खरोखरच देशाच्या स्टार्टअप इकोसिस्टमला चालना देण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो. अलीकडेच या कार्यक्रमामध्ये एका अनोख्या स्टार्टअपने आपली ओळख दिली. 'मॅजिक ऑफ मेमरीज' नावाच्या या स्टार्टअपची प्रीती मॅगो दिल्लीची रहिवासी आहे. ही अनोखी कल्पना तिनेच मांडली आहे. प्रीती मॅगोने लोकांचे केस, दात आणि आईच्या दुधापासून बनवलेल्या दागिन्यांचा संग्रह केला आहे. ती लोकांचे डीएनए जतन करत आहे तसेच ते दागिन्यांच्या स्वरूपात ठेवतही आहे; जेणेकरून लोक त्यांच्या डीएनएच्या आठवणी ठेवू शकतील.




प्रीती मॅगो म्हणते की, ती लोकांच्या डीएनएवरून उच्च दर्जाचे दागिने बनवते, जे विकत घेण्यासाठी लोक उत्तम पैसे खर्चतात. गेल्या काही वर्षांमध्ये तिने अशा ५०० ऑर्डर्स पूर्ण करून दिल्या आहेत. मॅजिक ऑफ मेमरीजकडे येणाऱ्या ऑर्डर्सची संख्या सातत्याने वाढत आहे. अशाप्रकारे दागिने बनवण्याची कल्पना एक जर्मन कंपनी पाहिल्यानंतर सुचल्याचे प्रितीने सांगितले. यानंतर, 'शार्क टँक इंडिया सीझन २' च्या न्यायाधीशांनी प्रीतीला सांगितले की, परदेशात असे बरेच काम केले जाते आणि ते तेथील बाजारपेठेसाठी ठीक आहे. परंतु भारतात हा व्यवसाय वाढवणे खूप कठीण आहे. पण प्रीतीला त्यांचे मत मान्य नाही. त्यामुळेच तिने अद्याप हार मानलेली नाही. या व्यवसायाला चांगले भविष्य असल्याचा तिला ठाम विश्वास आहे.

## वेगळ्या वाटा

पुढच्या काही वर्षांमध्ये ड्रोन तंत्रज्ञानाशी संबंधित जवळपास एक लाख रोजगार निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यात एरियल फोटोग्राफीपासून मॅपिंग आणि मॉडलिंगपर्यंत विविध पर्यायांचा समावेश आहे. सरकारी पातळीवरही ड्रोनविषयक धोरण आखलं जात आहे. कृषी, ई कॉमर्स आणि वाहतूक नियोजनाच्या क्षेत्रात ड्रोनचा वापर करण्याचा सरकारचा मानस आहे. त्यामुळे ड्रोन तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. भविष्यात वेगळी वाट निवडू पाहणारे तरुण या संधीचा लाभ उठवू शकतात. या क्षेत्रातल्या करीअरबाबतचं हे मार्गदर्शन... **(क्रमश:)**

## तणावातही जपा फिटनेस

फिटनेस मंत्रा

कॉलेज तरूण-तरूणींसाठी असाईनमेंट्स, प्रॅक्टिकल्स, परीक्षा या सगळ्यांची तयारी करताना बराच ताण असतो. अशावेळी फिटनेस राखणं कठीण वाटतं. मात्र थोड्या प्रयत्नांनी ही बाब साधता येते. याविषयी जाणून घेऊ या.

* पोट फुगण्याची समस्या असेल तर दर दोन तासांनी खायला हवं. थोड्या थोड्या वेळाने थोडं खा. दिवसभरात पाच-सहा वेळा हलका आहार घ्या. दोन वेळच्या खाण्यात दोन तासांचं अंतर ठेवा.



* लेक्चरला उशीर होत असला तरी न्याहरी टाळू नका. सकाळचा नाश्ता हे दिवसभरातलं महत्त्वाचं खाणं असतं. परीक्षा किंवा प्रॅक्टिकलच्या वेळा सांभाळताना नाश्त्यासाठी वेळ मिळत नसेल तर सोबत एखादं फळ ठेवा.

* दिवसात आठ-दहा ग्लास पाणी प्या. यामुळे पचनकार्य सुरळीत सुरू राहण्यास मदत होईल

* बाहेरचं काही तरी खाण्यापेक्षा चणे, चुरमुरे, फळं असं काही तरी सोबत ठेवा.

* आहारात पोषक घटक असायला हवे. त्यामुळे वेगवेगळे पदार्थ खा. हिरव्या भाज्या, विविध प्रकारची फळं यांचा समावेश आहारात करा. नियमित व्यायामावर भर ठेवा.

खेचाखेची

## स्टेटसला टाक

**सून** : सासूबाई, कांदा चिरताना बोट कापलंय, काय करू?

.
.
.
.
.
.
.
.
.
.

**सासू** : स्टेटसला टाक!

## वेगळं काही

धनेश आणि चेतना हे दोघे उंचीने अगदी कमी. त्यांची उंची फक्त ३६ इंच. मध्य प्रदेशमधल्या पुनासामध्ये राहणाऱ्या धनेशचं लग्न चेतनासोबत झालं. त्यांच्या लग्नाची गोष्टही रंजक आहे. चेतना बडवानी जिल्ह्यातल्या मडवाणाची. मडवाणातून एक माणूस पुनासातल्या आपल्या मित्राला भेटायला आला होता. त्यावेळी त्याची नजर धनेशवर पडली. धनेशची उंची बघून त्याला आपल्या गावातल्या चेतनाची आठवण आली. या दोघांची जोडी शोभून दिसेल असं वाटल्याने त्याने याबाबत मित्राला सांगितलं. बोलणी झाली आणि अवघ्या काही दिवसातच त्यांचं लग्न उरकलं. ३६ वर्षांचा धनेश लग्नासाठी मुली शोधत होता. मात्र उंचीमुळे त्याला कोणीही पसंत करत नव्हतं.

## सजग व्हायला हवं

माय स्पेस

सध्या नारीशक्तीचा नारा घुमतो आहे. महिलांचं विश्व व्यापक होत आहे. शिक्षण आणि अनुभव याच्या बळावर ती प्रत्येक क्षेत्रात नोंद घेण्याजोगी कामगिरी नोंदवत आहे. मात्र असं असलं तरी ती तिला स्त्रियांना संरक्षण देणाऱ्या कायद्यांची, अधिकारांची जाण असतेच असं नाही. चला, ही अनास्था टाळू या.




* भारतीय दंडसंविधानानुसार महिलांना समान वेतनाचा अधिकार आहे. लिंगभेदानुसार पगारामध्ये भेदभाव होत असेल तर न्यायालयात दाद मागता येते. * ऑफिसमधील लैंगिक शोषणाबद्दल महिला तक्रार करु शकतात. तक्रारीची तातडीने दखल घेतली जाते शिवाय संबंधित महिलेची ओळख गोपनीय राखली जाते. * घरगुती हिंसाचाराबाबत महिला कायद्याची मदत घेऊ शकतात. * प्रसूतीनंतर तीन महिने पगारी रजा मिळणं हा भारतीय महिलेचा अधिकार आहे. * एखाद्याने मानसन्मानाला धक्का पोहोचवण्याचा प्रयत्न केल्यास भारतीय महिला न्यायालयात दाद मागू शकते. * बलात्कारासारख्या घटनेमध्ये पीडितेला कायदेतज्ज्ञांची मोफत मदत मिळवण्याचा अधिकार आहे. * पोलीस सूर्यास्तानंतर आणि सूर्योदयापूर्वी महिलेला अटक करु शकत नाहीत.

## सुडोकू ७८ [redacted]

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ९ | १ | | ४ | ५ | | २ | ६ |
| ३ | | ६ | | | | | | |
| | | ७ | | | ८ | ४ | | ९ |
| | ७ | ४ | | | | | | ५ |
| | | | ४ | | ९ | | | |
| ९ | | | | | | ६ | ८ | |
| ७ | | ३ | ६ | | | ८ | | |
| | | | | | | ५ | | ३ |
| ४ | ६ | | ५ | २ | | ९ | ७ | |

टीप -

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ७७चे उत्तर [redacted]

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ४ | ८ | ३ | ९ | ५ | ६ | १ | ७ |
| ५ | १ | ३ | ७ | ६ | ८ | २ | ४ | ९ |
| ६ | ९ | ७ | २ | १ | ४ | ५ | ८ | ३ |
| ७ | ३ | १ | ६ | ५ | २ | ८ | ९ | ४ |
| ८ | ६ | ९ | १ | ४ | ३ | ७ | २ | ५ |
| ४ | २ | ५ | ८ | ७ | ९ | ३ | ६ | १ |
| १ | ७ | २ | ४ | ३ | ६ | ९ | ५ | ८ |
| ३ | ५ | ६ | ९ | ८ | १ | ४ | ७ | २ |
| ९ | ८ | ४ | ५ | २ | ७ | १ | ३ | ६ |

## शब्दकोडे क्रमांक ७८

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ■ | ४ | ५ | ■ | ६ | | ७ | ■ | ८ | | ९ |
| | ■ | १० | | | ■ | ११ | १२ | | ■ | १३ | १४ | | ■ | |
| १५ | १६ | ■ | | ■ | १७ | | | ■ | १८ | | | ■ | १९ | |
| ■ | २० | | | २१ | ■ | ■ | २२ | २३ | | ■ | २४ | | | ■ |
| २५ | | ■ | २६ | | | २७ | ■ | | ■ | २८ | | ■ | ■ | २९ |
| ३० | | ■ | ■ | | ■ | ३१ | | | ■ | | ■ | ३२ | ३३ | |
| ३४ | | ३५ | | ■ | ३६ | ■ | ■ | ३७ | ३८ | | ■ | ३९ | | |
| | ■ | | ■ | ४० | | ४१ | ४२ | ■ | ४३ | | ४४ | | ■ | |
| ४५ | ४६ | | ४७ | | ■ | ४८ | | | ■ | ४९ | | ■ | ५० | ■ |
| ■ | | ■ | | ■ | ५१ | | | ■ | ५२ | ■ | ■ | ५३ | | ५४ |
| ५५ | | | | | ■ | | ■ | ५६ | | ५७ | ■ | ५८ | | |
| ५९ | | ■ | | ■ | ६० | ■ | ६१ | ■ | ६२ | | ■ | | ■ | |
| | ■ | ६३ | | ६४ | | ■ | ६५ | | | ■ | ६६ | ■ | ६७ | |
| ६८ | | | ■ | ६९ | | ७० | | ■ | ७१ | ७२ | | ■ | | ■ |
| | ■ | ७३ | | | ■ | | ■ | ७४ | | | ■ | ७५ | | |

**आडवे शब्द :-**

१) अटीच्या करारातील जोडीने येणारे दोन शब्द
४) महिषी
६) सोने
८) योगी, साधना करणारा
१०) रात्र
११) काळ्या तोंडाचे माकड
१३) मनाची फिरणारी इच्छा
१५) मनाचा ओढा
१७) रंग (इं )
१८) सापाची एक जात
१९) स्तुती करणारा
२०) प्रयत्न
२२) अनर्थ, बिकट प्रसंग, अतिरेक
२४) पलंग, माचा, झोपाळा
२५) एक द्विदल धान्य
२६) प्रफुल्लता
२८) पुरुषांच्या नावापुढील राव सारखा एक बहुमानाचा शब्द
३०) मैत्रीण
३१) मांडणे, सजावट
३२) उच्च, श्रेष्ठ
३४) मुलाची किंवा मुलीची मुले
३७) ठराव, निश्चय
३९) धोबी
४०) वर्षानुवर्षे
४३) गाजावाजा
४५) नेत्रसुखद
४८) वाहून नेणे
४९) वाम
५१) काळोख
५३) केसाला पूर्वरंग आणणारा पदार्थ
५५) सारख्या अंतरावर
५६) शोभणारा
५८) वेतन
५९) प्रतिष्ठा, गळ्यामागील अवयव
६२) दिवसाचा चोवीसावा भाग
६३) रवाळ
६५) मुलगा
६७) विद्येचे माहेरघर
६८) मर्कट
६९) ढेकूण
७१) मुसलमान
७३) जास्तीतजास्त
७४) कडक व चिवट
७५) हिंदुस्तान

**उभे शब्द:-**

१) पिता, वडील
२) होडी
३) सिनेमाचा पडदा
५) प्रश्न
६) पराभव
७) लेखणी
८) तात्पर्यार्थ
९) लबाडी, कारस्थान
१२) यमनगरी
१४) हनुमान
१६) चकचकीत
१८) पात्याची तीक्ष्णता घ्राणेंद्रिय
१९) शपथ
२१) आवरणावरील निघालेला छोटा तुकडा
२३) उगाच
२५) निरिच्छ
२७) शूर
२८) पक्ष, दोन आठवडे
२९) बरोबर, सारखा
३२) उद्याच्या नंतरचा दिवस
३३) मातीचा कण, पराग
३५) नमस्कार
३६) एक प्रकारचा अमेरिकन गहू
३८) संताप
४०) तुलनेतील सारखेपणा
४१) दक्षतेचा इशारा
४२) मनाची फिरणारी इच्छा
४४) रानरेडा
४६) नवरा
४७) रुपेरी मुलामा
५०) पुत्र , तनय
५२) आतापावेतो
५३) दगडाचा उडालेला पापुद्रा
५४) माघारी येणे
५५) अगदी सारखे प्रमाण
५७) ढीग
६०) मीठाची चव
६१) गाल
६३) नरमच्या विरुद्ध
६४) आगमन येऊन पोहचलेला
६६) शरीर
६७) हत्तीच्या सोंडेचे अग्र
७०) स्वत:ला
७२) पारंब्या असलेले झाड

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| न | वा | ■ | ग | ■ | का | व | ■ | सा | व | धा | न | ■ | अ | फू |
| ज | ट | ■ | व | ■ | घा | ल | च | ल | न | ■ | ग | रु | ड | ■ |
| रा | ■ | तं | ग | डी | ■ | य | म | ■ | वा | प | र | ■ | स | ड्डा |
| न | र | ■ | वा | ■ | ह | ■ | च | र | स | ■ | पा | च | र | ■ |
| ज | वा | न | ■ | स | र | ■ | मी | ■ | ■ | मा | ल | क | ■ | प |
| र | न | ■ | त | ह | ह | या | त | ■ | स | ल | ■ | म | द | न |
| ■ | गी | र्वा | ण | ■ | ह | ■ | ■ | मा | मा | ■ | का | क | ■ | व |
| दी | ■ | ■ | घ | स | र | गुं | डी | ■ | धा | ड | स | ■ | मा | ती |
| न | र | व | र | ■ | म | ■ | र | त | न | ■ | रा | जी | व | ■ |
| ■ | ज | र | ■ | सं | हा | र | ■ | न | ■ | ल | ■ | व | स | न |
| क्ष | प | ण | क | ■ | दे | वा | ल | य | ■ | वं | द्य | ■ | ब | ट |
| मा | ज | ■ | पा | ल | व | ■ | व | ■ | जं | गी | ■ | स | ही | ■ |
| या | ■ | पा | ट | व | ■ | म | ण | का | ■ | फ | र | सा | ण | ■ |
| च | प्प | ल | ■ | क | जा | ग | ■ | न | व | टा | क | ■ | ■ | रु |
| ना | ■ | क | च | र | णे | ■ | वा | स | ■ | का | बा | ड | क | ष्ट |

**नागरिकांच्या राहणीमानात आमुलाग्र बदल होऊ लागला आहे. मात्र अनेकजण विशेष करून महिला आपल्या आरोग्याकडे लक्ष देत नाहीत. त्याचा परिणाम वेगवेगळ्या आजाराला बळी पडावे लागत आहे. मात्र अलिबागमधील अमृता पाटील व रुपेश पाटील या दाम्पत्यांनी चांगल्या आरोग्यासाठी पुढाकार घेतला आहे. कॅन्सर व प्लास्टीक मुक्तीसाठी एक पाऊल टाकत स्टे सेफ लाईफ या संस्थेच्या माध्यमातून हजारो महिलांना रोजगाराचे साधन उपलब्ध करून दिले आहे. त्यात महिलांच्या आरोग्याकडेही लक्ष देण्याचे काम केले जात आहे.**

# हजारो महिलांना रोजगाराचे साधन

अमृता पाटील






स्टे सेफ लाईफ या संस्थेची स्थापना एक ऑगस्ट २०२३ मध्ये झाली. या संस्थेच्या संचालक म्हणून अलिबागमधील अमृता रुपेश पाटील या काम पहात आहेत. त्यांचे पती रुपेश पाटील यांची त्यांना मोलाची साथ मिळत आहे. या संस्थेमध्ये सई गुरव, सचिन गुरव, संजना खोत व संदेश खोत आदी मंडळी काम करतात. आज एक, गाव एक शॉपी संकल्पनेच्या माध्यमातून १,५०० पेक्षा जास्त महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे. ३५००० हजार पेक्षा जास्त महिला समाधानी ग्राहक आहेत.

स्टे सेफ लाईफ व संस्कृती एन्टरप्राईजेस यांच्या संयुक्त विद्यमाने हर घर की नारी सुरक्षा अभियानअंतर्गत वेगवेगळे उपक्रम राबवून महिला सुरक्षेवर व त्यांच्या रोजगावर भर दिला आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश कॅन्सर मुक्त भारत व प्लास्टिक मुक्त भारत हा असून मासिक पाळी ही स्त्रियांच्या आयुष्यातील एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. स्टे सेफचे तज्ञ मार्गदर्शक आदिवासी वाडी-वस्ती तसेच शहर, शाळा कॉलेज व गावातील महिला तसेच किशोरवयीन मुली यांस मासिक पाळी एक नैसर्गिक वरदान या विषयावर सामाजिक स्तरावर पसरलेले गैरसमज व अंधश्रद्धा दूर करण्यासाठी प्रबोधनाचे कार्य करत आहेत. महिलांनी मासिक धर्मात अयोग्य आहार, अस्वच्छता व निष्काळजीपणा केल्यास गर्भाशय संबंधित संसर्ग व कॅन्सर सारख्या मोठ्या आजारांना आमंत्रण देण्यासारखे आहे.ही समस्या दूर करण्यासाठी व आपली काळजी घेण्यासाठी स्टे सेफ घेवून येत आहे केमिकल विरहित, प्लास्टिक मुक्त, सॅनिटरी नॅपकिन्स. नैसर्गिक घटकांपासून तयार केलेले सॅनटरी नॅपकीन्स लाखो महिलांपर्यंत पोहचविण्याचे काम या संस्थेच्या माध्यमातून करण्यात आले आहे. हे नॅपकीन प्रत्येक महिलांपर्यंत पोहचविण्यासाठी जिल्ह्यात एक हजार ५०० हून अधिक महिला काम करीत आहेत.या महिलांना यातून रोजगाराचे साधन खुले झाले आहे. गृहिणींसाठी रोजगाराचे दालन खुले करण्याचे काम केले आहे.

स्टे सेफ ७ लेअर ॲनायन नॅपकीनचे फायदे पुढीलप्रमाणे आहेत. ॲनायन स्ट्रिपमुळे जंतुसंसर्ग होत नाही व दुर्गंधी येत नाही. ओटी पोटात दुखणे, हात-पाय दुखणे, कंबर दुखणे व इतर वेदनांसोबत चिडचिड पूर्णपणे थांबते.जळजळ होणे, पुरळ उठणे, खाज येणे बंद होते. तसेच ॲलर्जी होत नाही. सर्वात जास्त शोषण क्षमता असल्याने कोरडेपणा राहतो व त्वचेला श्वास घेणे सोपे जाते. नैसर्गिक घटकांपासून बनविलेले स्टे सेफ नॅपकीन पूर्णपणे इको-फ्रेंडली व बॉडी फ्रेंडली आहेत. स्टे सेफ नॅपकीन्सचा वापर नियमित केल्याने मासिक पाळी नियमित व निश्चित वेळेवर होते.स्टे सेफ नॅपकीनचे सातहून अधिक प्रकार आहेत. त्यामध्ये स्टे सेफ, स्टे बटरफ्लाय, स्टे क्वीन, स्टे रिच, स्टे सेफ पॅन्टी लायनर, स्टे बेबी डायपर्स, स्टे प्रसूती नॅपकीन, सौंदर्य प्रसाधने, आयुर्वेदिक औषधे असे एकूण ४५ हून अधिक उत्पादन आहेत. इतर नॅपकीन विघटन होण्याची प्रक्रीया दिर्घकालीन आहे. मात्र इको फ्रेंडली नॅपकीनची विघटनची प्रक्रीया अल्प कालावधीत आहे. मासिक पाळी प्रबोधनाचे काम प्रत्येक शाळा, बचत गट तसेच गावागावात करण्याचे काम या संस्थेच्या माध्यमातून केले जात आहे.सामाजिक व इतर सर्व स्तरावर जनजागृती करून महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्याचे काम स्टे सेफ या संस्थेच्या माध्यमातून केले जात आहे.

जागतिक आरोग्य संस्थेच्या अहवालानुसार, भारतामध्ये रोज अकरा हजारहून अधिक महिलांचा मृत्यू गर्भाशयाच्या शस्त्रक्रियेमुळे होतो. केंद्र सरकारने देखील महिलांच्या सुरक्षेसाठी वेगवेगळ्या प्रकारची जनजागृती केली आहे. इको फ्रेंडली सॅनिटरी नॅपकीनचा उपक्रम हा समाज हितासाठी हाती घेतला आहे. समाजात या प्रकाराबाबत असलेले गैरसमज दुर करण्याचा प्रयत्न स्टे सेफ या संस्थेने केला आहे. अलिबाग तालुक्यातील एका महिलेने महिलांच्या हितासाठी आरोग्यासाठी एक पाऊल टाकण्याचे काम केले आहे. कॅन्सर व प्लास्टीक मुक्त भारत साठी ही चळवळ सुरु केली आहे. या चळवळीच्या माध्यमातून चांगले आरोग्य राखण्याबरोबरच राहणीमानात आरोग्यदायी बदल व्हावा, यासाठी हा प्रयत्न स्टे सेफने सुरु केला आहे. नैसर्गिक घटकांपासून तयार झालेले सॅनिटरी नॅपकीन घरोघरी पोहचवण्यासाठी दीड हजार महिला काम करीत आहेत. सध्या ३५ हजार महिलांपर्यंत ही चळवळ पोहचविण्याचे काम केले आहे. आगामी काळात एक लाख २० हजार महिलांपर्यंत ही चळवळ पोहचवून कॅन्सर व प्लास्टीक मुक्त भारतसाठी प्रयत्न केले जाणार आहे.यासाठी महिला प्रचंड मेहनत घेत आहे. त्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी बक्षीसाच्या स्वरुपात वेगवेगळ्या वस्तू भेट देण्याची परंपरा आजही जपली जात आहे. गृहपयोगी वस्तूंसह दैनंदिन वापरातील वस्तू देऊन या महिलांचा सन्मान केले जात आहे.

मागील आठवड्यात हा सोहळा अलिबामध्ये मोठ्या उत्साहात झाला. यावेळी महिलांना वेगवेगळ्या वस्तू बक्षीस स्वरुपात देऊनत्यांचा गौरव स्टे सेफ लाईफच्या माध्यमातून करण्यात आला. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या निमित्ताने वेगवेगळ्या क्षेत्रात भरारी घेणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मानही करण्यात आला. त्यांना घे भरारी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यामध्ये २५० पेक्षा अधिक महिला सहभागी झाल्या होत्या. तसेच उपस्थितांसाठी खास लकी ड्रॉचे आयोजन केले केले होते. यामध्ये प्रथम क्रमांकाला स्मार्ट टीव्ही देण्यात आला. एक ते पंधरा क्रमांकापर्यंत बक्षीसांची लुट करण्यात आली. एक वेगळा उत्साह व आनंद या निमित्ताने पहावयास मिळाला. हृदयविकार थांबविण्यासाठी हृदय संजिवनी व नोनी ज्यूस मोठया प्रमाणावर वरदान ठरत असून सोबत संस्कृती गुळाचा बासुंदी चहा या उत्पादनाला प्रचंड मागणी असल्याचे सांगण्यात आले आहे. **

# 'कवान' - कोकणी मातीतलं भूतदयेचं आणि वात्सल्याचं जिवंत प्रतीक...!



धनंजय शेटये

कोकणातील उन्हाळा म्हणजे अंगाची लाही लाही करणारा! माणसांना जिथे हा उकाडा असह्य होतो, तिथे मुक्या जनावरांची काय अवस्था होत असेल? पण कोकणातल्या शेतकऱ्याला याची पुरेपूर जाणीव असते. त्याच्यासाठी दावणीला बांधलेली गुरे ही केवळ शेतीची किंवा उपजीविकेची साधने नसून, ती त्याच्या कुटुंबाचाच एक अविभाज्य भाग असतात. स्वतःच्या पोटच्या पोरांप्रमाणे या मुक्या जिवांची काळजी घेणाऱ्या कोकणी शेतकऱ्याच्या याच निर्मळ भूतदयेतून आणि वात्सल्यातून जन्म घेते ती एक सुंदर संकल्पना 'कवान' होय.

'कवान' हा केवळ मालवणी बोलीभाषेतील एक शब्द नाही, तर तो कोकणच्या ग्रामीण जीवनशैलीशी, निसर्गाशी आणि मातीशी घट्ट जोडलेला एक जिव्हाळ्याचा धागा आहे. कवान म्हणजे गुरांना उन्हाळ्यात उष्माघाताचा त्रास होऊ नये म्हणून उभारलेला तात्पुरता, पण अतिशय हवेशीर वाडा. आजच्या काळात जिथे सिमेंट-कॉंक्रीट आणि लोखंडी पत्र्यांचा वापर वाढला आहे, तिथे कवान हे पूर्णपणे निसर्गाशी एकरूप असते. हे कवान उभारण्यासाठी ऐन, नराम, किंदळ, काटेअसन, आणि हळदीओ यांसारख्या झाडांच्या फांद्यांचा कल्पकतेने वापर करून तात्पुरत्या भिंती विणल्या जातात. तर पालेअसन, बिब्बा, आणि चारेबोर यांसारख्या सरळसोट झाडांचे खुंट जमिनीत रोवून कवानाचा भक्कम सांगाडा उभा केला जातो.

उन्हाळ्याच्या कडक उन्हात रानभर चरून आल्यावर या मुक्या जिवांना हक्काची आणि थंडगार सावली मिळावी, हा कवान उभारण्यामागचा मुख्य हेतू असतो. पत्र्याच्या शेडखाली उन्हाळ्यात असह्य उकाडा होतो, मात्र कवानाच्या छपरावर असलेल्या भाताच्या पेंढ्यामुळे आणि नारळाच्या वाळलेल्या झावळ्यांमुळे (चुडता) आत एक नैसर्गिक थंडावा निर्माण होतो. या वास्तूला एक 'तटक्या' (दरवाजा) असतो, जो 'कुमयाच्या' दोराने निसरडी गाठ मारून मोठ्या खुबीने बंद केला जातो. याच थंडगार सावलीत गुरांसाठी चारा-पाण्याची उत्तम सोय केलेली असते. चारही बाजूंनी मोकळी आणि फक्त वरून सावली देणारी ही हवेशीर रचना गुरांना एक नैसर्गिक आणि सुरक्षित विसावा देते.

उन्हाळ्यात हवेशीर असणारं हेच कवान पावसाळ्याची चाहूल लागताच अधिक मजबूत केलं जातं. मुसळधार पावसापासून गुरांचं रक्षण व्हावं म्हणून या कवानाच्या बाजूंनी करवीचे किंवा झावळ्यांचे कुंपण घातले जाते आणि बघता बघता या उन्हाळी विसाव्याचे रूपांतर एका उबदार गोठ्यात किंवा पडवीत होते.

कोकणातील कृषीसंस्कृती ही प्रामुख्याने बैलांवर आणि गुरांवर अवलंबून आहे. मुक्या प्राण्यांबद्दल कृतज्ञतेची भावना शेतकऱ्याच्या नसानसात भिनलेली असते. त्यामुळेच, बऱ्याचदा स्वतःच्या घराला छप्पर घालण्याआधी तो आपल्या सर्जा-राजासाठी आणि गाई-गुरांसाठी 'कवान' उभारण्याला प्राधान्य देतो. कवान हे केवळ लाकूड आणि झावळ्यांनी बनलेले एक छप्पर नसून, ते शेतकरी आणि त्याच्या मुक्या प्राण्यांमधल्या अतूट प्रेमाचे प्रतीक आहे. पुस्तकांतून मिळणाऱ्या भूतदयेच्या शिकवणीपेक्षा, कवान बांधून गुरांच्या पाठीवरून मायेचा हात फिरवणारा कोकणी शेतकरी हीच खऱ्या भूतदयेची साक्षात मूर्ती आहे.

कोकणाच्या काही भागात याला गोठा, मांडव किंवा छप्पर असेही म्हणतात; पण 'कवान' या अडीच अक्षरी शब्दात जो अस्सल मालवणी गोडवा, मातीचा गंध आणि वात्सल्याची ऊब दडली आहे, ती इतर कशातही नाही! **

# 'माइंडसेट'

## व्यक्तिमत्त्व घडविण्याचे अदृश्य कौशल्य

सुनील गवळी

मानवाचे जीवन हे बाह्य परिस्थितीपेक्षा अधिक प्रमाणात त्याच्या मनस्थितीवर (Mindset) अवलंबून असते. आपण स्वतःबद्दल काय विचार करतो, इतरांना काय सांगतो, आणि आपल्या कृतींमधून कोणती प्रतिमा निर्माण करतो यावरच आपल्या व्यक्तिमत्त्वाची आणि समाजातील कीर्तीची उभारणी होत असते. म्हणूनच म्हणतात, ''मन जिंकलं तर जग जिंकलं.''

१. मनाचा आरसा आपण जे विचारतो तेच बनतो

मन म्हणजे एक सुपीक जमीन आहे. त्यात आपण सकारात्मक विचारांची बीजे पेरली तर आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, परिश्रम आणि संयम उगवतात; पण नकारात्मक विचारांची बीजे पेरली तर न्यूनगंड, आळस, राग आणि चुकीच्या सवयी वाढतात.

उदाहरणार्थ :एखादी व्यक्ती सतत म्हणते ''मी काहीच करू शकत नाही.''


कालांतराने ती खरंच प्रयत्न करणे थांबवते.

दुसरी व्यक्ती म्हणते ''मी शिकत आहे, मी सुधारत आहे.'' ती हळूहळू यशाच्या दिशेने वाटचाल करते. म्हणजेच विचार भावना कृती सवय व्यक्तिमत्त्व ही साखळीच जीवन घडवते.

२. स्वतःची प्रतिमा आपणच तयार करतो

अनेक वेळा आपण जाणीवपूर्वक किंवा नकळत इतरांसमोर स्वतःची एक प्रतिमा (Image) तयार करत असतो. कोणी स्वतःला धार्मिक, सज्जन दाखवण्याचा प्रयत्न करतो. कोणी स्वतःला बेफिकीर किंवा व्यसनी म्हणून मांडतो.

कोणी ''मी प्रामाणिक आहे'' असे वागून दाखवतो. ही प्रतिमा फक्त शब्दांनी नाही तर वर्तनातून समाजात पसरते. जशी सुगंधी फुलांचा सुगंध दूरवर पसरतो, तशीच व्यक्तीची वृत्तीही परिसरावर परिणाम करते.



३. मुलांवर आणि समाजावर माइंडसेटचा परिणाम मुलं आपण सांगतो ते कमी आणि आपण करतो ते जास्त शिकतात. जर घरात सकारात्मक संवाद असेल परिश्रमाची सवय असेल वाचन, शिस्त, आदर यांचे वातावरण असेल तर मुलंही तेच आत्मसात करतात.

परंतु नकारात्मक बोलणे दोषारोप व्यसन किंवा निरुत्साह असल्यास मुलांच्या मनात असुरक्षितता आणि दिशाभ्रम निर्माण होतो. म्हणूनच पालक आणि शिक्षक हे मुलांच्या माइंडसेटचे पहिले शिल्पकार असतात.

४. जसं पाहतो तसं घडतो. मानवाची एक विलक्षण क्षमता म्हणजे कल्पनाशक्ती. खेळाडू सामना खेळण्यापूर्वी विजयाची कल्पना करतो. विद्यार्थी यशस्वी होण्याची प्रतिमा मनात उभी करतो. शिक्षक आदर्श विद्यार्थी घडवण्याचे चित्र मनात ठेवतो. यालाच म्हणतात. मनात जे चित्र वारंवार उभं राहते, तेच आपल्या कृतींना दिशा देतं.

५. शिक्षक आणि पालकांची भूमिका समाजनिर्मितीची गुरुकिल्ली

एक चांगला शिक्षक फक्त विषय शिकवत नाही, तो विचार करण्याची पद्धत शिकवतो. एक सजग पालक फक्त मुलांना वाढवत नाही, तो मूल्ये रुजवतो.

जर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सांगितले. चुका करायला हरकत नाही, पण शिकायला हवं. स्पर्धेपेक्षा प्रगती महत्त्वाची प्रामाणिकपणा हा सर्वात मोठा गुण तर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.

यातूनच तयार होतो सजग नागरिक सुसंस्कृत समाज सक्षम राष्ट्र

६. तात्विक दृष्टिकोन

भारतीय चिंतनपरंपरेत मनाला अत्यंत महत्त्व दिले गेले आहे.

मनच बंधन आणि मनच मुक्तीचे कारण आहे.

विचार शुद्ध तर जीवन शुद्ध.

बाह्य बदलांपेक्षा अंतर्मनाचा बदल अधिक प्रभावी.

म्हणूनच व्यक्तिमत्त्व विकास म्हणजे बाह्य सजावट नव्हे, तर आंतरिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे.

७. सकारात्मक माइंडसेट घडविण्याचे काही व्यवहार्य उपाय

१. दररोज स्वतःशी सकारात्मक संवाद साधा.

२. तुलना टाळा प्रगतीवर लक्ष केंद्रित करा.

३. चांगल्या सवयींचा छोटा पण सातत्यपूर्ण सराव करा.

४. मुलांसमोर आपणच आदर्श बना.

५. अपयशाला शिकण्याची संधी म्हणून स्वीकारा.

६. कृतज्ञता आणि शिस्त या दोन मूल्यांचा अंगीकार करा.

७. समाज बदलायचा असेल तर योजना बदलून उपयोग नाही, मन बदलावे लागते.

प्रत्येक पालक, शिक्षक आणि व्यक्ती जर स्वतःचा माइंडसेट सकारात्मक, विधायक आणि मूल्याधिष्ठित केला, तर आपोआपच चांगल्या व्यक्तिमत्त्वांची निर्मिती होईल. कारण ''समाज हा वेगळा नसतो; तो आपल्या विचारांचेच प्रतिबिंब असतो.''

**(लेखक गटशिक्षणाधिकारी तथा विद्यार्थी शिक्षक पालक समुपदेशक)**

# ''भारत विश्वविजेता''

अरविंद मोरे

भारत आणि श्रीलंका या दोन देशाच्या संयुक्त विद्यमाने २०-२० क्रिकेट स्पर्धेचे सामने नुकतेच थाटात संपन्न झाले. ही स्पर्धा ७ फेब्रुवारी ते ८ मार्च २०२६ ह्या कालावधीत संपन्न झाली. जवळपास एक महिना ह्या स्पर्धेचा क्रिकेट प्रेमींनी जोमाने आनंद घेतला. ह्यात विश्वंभरातील २० चमूंनी सहभाग घेतला होता. ह्यात भारत, श्रीलंका, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, साऊथ आफ्रिका, अफगाणिस्थान, स्कॉटलंड, वेस्ट इंडिज, युनाटेड स्टेट्स, आयर्लंड, न्यूझीलंड, पाकिस्तान, कॅनडा, इटली, नाम्बिया, नेपाळ, ओमान, स्कॉटलंड, यु. ए.ई., आणि झिम्बाबे ह्या चमूने सहभाग घेतला होता. हे संघ ४ गटात विभागून खेळले होते.

ह्या गटातल्या साखळी सर्व सामने भारताने जिंकले होते आणि आपला सुपर ८ मध्ये थाटात प्रवेश झाला. आपला विजयी रथ हा सतत धावतच होता. जणू भारताचा आणि पराभवाचा काहीही संबंधच नाही. आपला पहिलाच सामना दक्षिण आफ्रिके सोबत झाला. दोन्ही चमूंची घोडदौड जोरातच होती. पहिल्याच सुपर ८ च्या सामन्यात भारताला चांगलीच मात दक्षिण आफ्रिकेने खूप फरकाने हरविले आणि आपले सर्व तारे जमिनीवर आले. आता आपला विजय आपला राहिला नाही. जर ही टीम जिंकली तर असे होईल जर ही टीम हरली तर असे होईल असे गणितं सुरु झाले. आता आपल्या टीमवर चांगलेच दडपण आले होते. आता आपल्याला वेस्ट इंडिज आणि झिम्बाबेने खूप चांगले प्रदर्शन केले होते. पहिला सामना आपण सुपर ८ मध्ये झिम्बाबे सोबत खेळाला आणि त्यांच्यावर विजय मिळविला. दुसरा सामना वेस्ट इंडिज सोबत होता आणि वेस्ट इंडिज संघ चांगलाच फार्मात होता. ह्या चमूवर मात करणे भारतासाठी फार मोठे आव्हान होते. आपण वेस्ट इंडिजला नमविले आणि आपल्या सेमी फायनलच मार्ग मोकळा झाला. आपल्याला आता इंग्लंडला सेमी फायनल मध्ये लढायचे होते. इंग्लंड संघ सुरुवाती पासूनच मजबूत स्थितीत होता. इंग्लंड संघ हा सुरुवाती पासूनच प्रोफेशनल आणि चिवट सुद्धा आहे. तो सहजा हार मानत नाही. क्रिकेट मधील सर्व बारकावे त्यांना चांगलेच माहित आहेत. तो त्यांचा राष्ट्रीय खेळ सुद्धा आहे. दुसऱ्या सेमी फायनल मध्ये न्यूझीलंडने चांगलीच कमाल केली. मोठ्या फरकाने हा संघ दक्षिण आफ्रिके सोबत जिंकला होता. न्यूझीलंडच्या फील ॲलन याने तर खूपच धमाल केली. ह्या पठ्ठ्याने ३३ चेंडूत सर्वात वेगवान शतक केले आणि तो संघ फायनल मध्ये जाण्या अगोदरच न्यूझीलंडचा दबाव आपल्या भारतीय टीम वर आला होता. त्या अगोदर इंग्लंडला आपल्याला चमूला सामोरे जायायचे होते. इंग्लंडने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण घेतले. आपल्या भारतीय चमूने २५३ धाव काढल्या. इंग्लंडला मोठे लक्ष्य दिल होत. वाटलं होत आपण सहज जिंकू परंतु इंग्लंडने आपला चांगलाच घाम काढला. आपण फक्त ७ धावाने जिंकलो. कसे बसे आपल्याला अहमदाबादचे फायनलचे तिकीट मिळाले. न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेवर दणदणीत विजय मिळविला म्हणून न्यूझीलंड टीम जोरात होती व आपण चांगलेच दबावात होतो. हरता हारता जिंकलो. वाचलो एकदाचे.

८ मार्च फायनल सामन्याचा दिवस उजाडला. भारतीय फलंदाजांनी कमाल केली. २० षटकात २५५ धावा काढल्या. संजू सॅमसन, अभिषेक शर्मा, इशान किशन व शिवम दुबेने धुवाधार फलंदाजी केली. एवढ्या मोठ्या धावांचे लक्ष्य बघून न्यूझीलंड दबावात आले पण फिल ॲलनचे दडपण भारतीयांवर होतेच. त्यात एक झेल आपण फिल ॲलन चा सोपा झेल सोडला आणि आपल्या पोटात तर गोळाच आला. तो नंतर लवकर बाद झाला म्हणून आपला मार्ग सुकर झाला. अक्षर पटेल, जसप्रीत बुमराह यांनी न्यूझीलंडचे मनसुबे पूर्ण होऊ दिले नाही आणि शेवटी भारताने ९६ धावांनी मोठया फरकाने विश्वचषक जिंकला. ह्या फायनलच्या सामन्यात भारताने प्रत्येक क्षेत्रात चांगली कामगिरी केली. मग ते फलंदाजी असो, की गोलंदाजी, की क्षेत्ररक्षण असो. ह्या तिन्ही आघाडयांवर भारतीय टीम अव्वल होती म्हणून विश्वचषक जिंकू शकली. काही अफलातून झेल पकडल्यामुळे न्यूझीलंड दबावात आली आणि आपला आत्मविश्वास वाढला. जसप्रीत बुमराहची अचूक टप्प्याची गोलंदाजीमुळे भारताचा विजय साकार झाला. हा विजय भारताच्या आत्मविश्वासाचा आणि संघ भावनेचा होता. एक वेगळ्याच ऊर्जेचा संचार त्या दिवशी भारतीय चमू मध्ये बघायला मिळाला. वेल प्लेड टीम इंडिया. अभिनंदन. **

# आजची महिला सुरक्षित आहे का?



जगन घाणेकर

जागतिक महिला दिन नुकताच पार पडला. भारतात या दिवसाची विशेष क्रेझ असते. आपल्या कर्तृत्वाने नावलौकिक मिळवलेल्या स्त्रियांचा या दिवशी विविध कार्यक्रमांतून, वृत्तवाहिन्यांतून, वृत्तपत्रांतून गौरव केला गेला. महिला दिनाच्या निमित्ताने ऑनलाईन विक्रीच्या संकेतस्थळांवरसुद्धा महिलांसाठी विशेष सवलती देण्यात आल्या होत्या. अनेक कंपन्यांच्या खासगी कार्यालयांतून महिला अधिकाऱ्यांचा गौरव केला गेला. हे सर्व पाहिल्यावर एक प्रश्न पडतो कि स्त्री ही केवळ एक दिवस गौरवण्याची बाब आहे का? या भारतभूमीचा, येथील प्राचीन हिंदू संस्कृतीचा अभ्यास केल्यास येथे स्त्रीला नेहमीच सर्वोच्च स्थान दिले गेल्याचे लक्षात येईल. हिंदू धर्मशास्त्राने स्त्रीला शक्तिरूप मानले आहे. कोणतेही कार्य असो वा संकल्प, त्यासाठी शक्ती अनिवार्य आहे. शक्तीविना कोणताही जीव अथवा वस्तू निर्जीव स्वरूप असते. शक्तीचा सन्मान करणारी या देशात ५१ शक्तिपीठे आहेत , त्यांतील साडेतीन शक्तिपीठे आपल्या महाराष्ट्रात आहेत. सज्जनांच्या रक्षणार्थ आणि दृष्टांच्या संहारार्थ शक्तीने आपले मारक रूप वेळोवेळी प्रकट करून असुरी शक्तीचा विनाश केल्याचे आपण धार्मिक कथांतून, मालिकांतून वाचले आणि पाहिले आहे. ज्या दृष्ट शक्तींपुढे देवताही हतबल झाल्या अशांचा नाश देवींनी आपल्या अगाध सामर्थ्याने केला आहे.



रामायण घडले ते माता सीतेच्या हरणामुळे, महाभारत घडले द्रौपदीच्या अपमानामुळे. स्त्रीचा सन्मान करण्याची आणि तिच्या रक्षणासाठी सर्वस्व पणाला लावण्याची शिकवण येथील संस्कृती आपल्याला देते. वीरमाता जीजाउंनी शिवाजी महाराजांना बालपणीच शौर्याचे, अन्यायाच्या प्रतिशोधाचे, जनतेचे सर्वस्वी कल्याणाचे बाळकडू पाजले नसते, तर कदाचित या देशाला हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवराय लाभले नसते. एव्हढा गौरवशाली इतिहास ज्या भारतभूमीला लाभला आहे त्या भारतात आज स्त्रियांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर होत चालला आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये स्त्री अत्याचाराच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. बलात्कार, विनयभंग, अपहरण, कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये दिवसागणिक वाढ होत आहे. ज्यामध्ये महाराष्ट्र आघाडीवर आहे. शाळकरी मुलीच काय वृद्धाही वासनांधांच्या अत्याचारापासून वाचलेल्या नाहीत. राज्यातील प्रतिदिन होणाऱ्या स्त्री अत्याचाराच्या वाढत्या घटना मनाला अस्वस्थ करणाऱ्या आहेत. पोलीस असो, शिक्षण असो वा वैद्यकीय क्षेत्र कोणतेच क्षेत्र आज महिलांसाठी सुरक्षित राहिलेले नाही. ज्या क्षेत्रांवर महिला पूर्वी डोळे झाकून विश्वास ठेवत असत त्या क्षेत्रातही वासनांधांचा भरणा झाला आहे. चरितार्थ चालवण्यासाठी नोकरीनिमित्त घराबाहेर पडणारी स्त्री खासगी कंपन्यांतील लैंगिक शोषणाला बळी पडू लागली आहे. नात्यातील मंडळींकडून केल्या जाणाऱ्या शोषणाचे प्रमाणही वाढू लागले आहे. स्त्रीच्या निर्बलतेचा फायदा घेऊन संधी साधण्यासाठी टपून बसलेल्या वासनांधांची संख्या समाजात वाढू लागली आहे. स्त्री अत्याचारविरोधी कायदे अधिक कठोर करूनही स्त्री अत्याचारांच्या घटनांमध्ये तिळमात्र घट न होता वाढच होत चालली आहे. पोलीस ठाण्यामध्ये नोंद झालेल्या गुन्ह्यांपैकी किती गुन्हे न्यायालयात तग धरतात आणि किती गुन्हेगारांना शिक्षा मिळते? गुन्हेगारी कृत्यांना चाप बसण्यासाठी आणि गुन्ह्यांची मीमांसा करून गुन्हेगारांना दंडित करण्यासाठी देशात न्यायपालिका कार्यरत आहे; मात्र न्यायपालिकेचा रटाळ कारभार, यादरम्यान गुन्हेगारांना पुरावे नष्ट करण्यास मिळणारी मोकळीक, पोलिसांवरील राजकीय दबाव, पोलीस व्यवस्थेतील भ्रष्टाचार यांमुळे उशिरा मिळाला तरी तो न्याय असेलच याची शाश्वती नसते. महिला अत्याचारांच्या घटना रोखण्यासाठी राज्यात दामिनी आणि निर्भया पथक कार्यरत आहेत.

मात्र स्त्री अत्याचाराचा वाढता आ-लेख पाहता त्यांना अधिक सक्षम करण्याची आज आवश्यकता आहे. बलात्कारासारख्या घटनांमध्ये गुन्हेगारांना शिक्षा मिळण्याचे प्रमाण आपल्याकडे अगदीच नगण्य आहे, परिणामी गुन्हेगारांमधील भय लुप्त होत चालले असून अशा स्वरूपाचे गुन्हे गेल्या काही वर्षांत कमालीचे वाढले आहेत. रांझेगावच्या पाटलाने एका अबला स्त्रीवर अत्याचार केल्याचे कळताच छत्रपती शिवाजी महाराजांनी त्याचे हात पाय तोडण्याचे आदेश देऊन अशा गुन्ह्यांविषयी रयतेमध्ये कायमस्वरूपी भय निर्माण केलेच शिवाय स्वराज्यातील स्त्रियांनाही सुरक्षित केले. स्त्री अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये तत्परतेने आणि कठोर शासन केले गेले तरच गुन्हेगारांमध्ये भय निर्माण होते, हेच या प्रसंगातून सिद्ध होते. त्यामुळे स्त्री अत्याचाराचा चढता आलेख थांबवायचा असेल तर शिक्षाही स्वराज्याप्रमाणेच असायला हवी.

आजच्या स्त्रीपुढे कोण्या मॉडेलचा किंवा नटीचा आदर्श असून चालणार नाही. आजच्या स्त्रीपुढे आदर्श हवा आपल्या पराक्रमाने शत्रूला नामोहरम करणाऱ्या झाशीच्या राणीचा, अहील्याबाई होळकरांचा, वीरमाता जिजाऊंचा, राणी पद्मिनीचा आणि राणी चेन्नम्माचा. जेव्हा प्रत्येक स्त्री स्वतःचे रक्षण करण्यास सक्षम होईल, तेव्हा कोणाची हिम्मत होणार नाही तिच्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याची. यासाठी प्रत्येक शाळेमधून मुलींसाठी स्वरक्षण प्रशिक्षणाचे नियमितपणे धडे दिले जावेत. येणाऱ्या प्रतिकूल प्रसंगाला कसे सामोरे जावे आणि त्याचा प्रतिकार कसा करावा याचे अद्यावत ज्ञान प्रत्येक मुलीला शालेय जीवनापासूनच दिले जावे. जेणेकरून आज नाहीतर येणाऱ्या काही वर्षांत याचे सकारात्मक परिणाम आपल्याला नक्कीच दिसतील. राज्य सरकरने यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता असून स्वरक्षणासाठी सिद्ध होणाऱ्या मुली भविष्यात समाजातील वाढत्या स्त्री अत्याचारावर नक्कीच अंकुश आणू शकतात. ज्या दिवशी स्त्री अत्याचाराच्या आलेखला उतरती कला लागेल, ज्या दिनी स्त्रियांविषयी सन्मानाची भावना समस्त समाजात निर्माण होईल तोच खऱ्या अर्थाने महिला दिन असेल. **

## जगण्यातले दाहक अनुभव

# तुफानातल्या पणत्या

पुस्तक परीक्षण

प्रा. शाम जोगळेकर

मो. ९२७३३४३१७७

'तुफानातल्या पणत्या' हे वृषाली मगदूम लिखित पुस्तक मुंबईच्या डिंपल पब्लिकेशनने देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. सुरुवातीला लेखिका वृषाली मगदूम यांचे 'मनोगत' आहे. १९८६ साली, नवी मुंबईत बदलीमुळे आल्यानंतर, त्यांची प्राध्यापकी नोकरी सुरू असतानाच, त्या लेखन आणि घराकडे लक्ष देत होत्या. १९८८ मध्ये, त्यांना महिला चळवळीतील कार्यकर्त्या भेटल्या आणि त्यांच्या कार्यात त्या समाविष्ट झाल्या. तेव्हापासून कचरावेचक स्त्रियांमध्ये त्यांचे कार्य सुरू आहे. या अनुभवांवर आधारित, प्रा.वृषाली मगदूम यांनी विविध नियतकालिकांमधून, त्यांचे सच्चे आणि जगण्यातले दाहक अनुभव वेळोवेळी मांडले. आता त्या अनुभवांना पुस्तकरूप प्राप्त झाले आहे. पुस्तकात एकूण पस्तीस लेख समाविष्ट आहेत. पुस्तकाचे समर्पक, सूचक आणि रंगीत मुखपृष्ठ संतोष घोंगडे यांचे आहे.



कणखर ती, या पहिल्या जीवन कहाणीत, उमाची ३८ वर्षांच्या जीवनाची झालेली फरपट जाणवते. पाच वर्षांची असताना, उमा मद्रासहून एका रेल्वे डब्यात बसून मुंबईला आली. बालकल्याणनगरी बोर्डिंगमध्ये तिला प्रवेश दिला गेला. सुरुवातीला तिला तमिळशिवाय कोणतीच भाषा येत नव्हती. हळूहळू ती हिंदी, मराठी शिकली. जेमतेम आठवीपर्यंत शिकली. मात्र ती उत्तम स्वयंपाक करू लागली. चित्रकला, शिवणकला शिकली. अठरा वर्षानंतर ती एका घरी मुलांचा सांभाळ, स्वयंपाक इ. कामे करू लागली. मात्र वेळोवेळी तिला घरे आणि नोकऱ्या बदलाव्या लागल्या. कारण पुरुषांपासून होणारा त्रास. कालांतराने साताऱ्च्या मुलाशी लग्न झाले. वर्षभर संसार चांगला झाला, मुलगा झाला, पण दारुड्या नवऱ्यामुळे तिला घर सोडावे लागले. आता ती एका आजी, आजोबांच्या घरात राहून त्यांची सेवा करत आहे. तिला आता स्थिर आणि शांत आयुष्य जगायचे आहे. 'दमदार पाऊल' या लेखात अनुराधा भोसले यांची जीवनकहाणी समजते. अहमदनगर जिल्ह्यातील एका छोट्या गावात, अतिशय गरीब, अकरा भावंडे असलेल्या कुटुंबात जन्मलेल्या अनुराधा यांना सतत दारिद्र्य, कष्ट, उपासमार यांच्याशी संघर्ष करावा लागला. शिक्षणाच्या दुर्दम्य इच्छेमुळे, काम करत, त्यांनी बीएसडब्ल्यू आणि एमएसडब्ल्यू केले. सरकारी नोकरी काही काळ केली. नंतर 'अवनी' ही स्वतंत्र संस्था सुरू केली. संस्थेच्या माध्यमातून विविध गावांमध्ये सहाशे शौचालये उभी केली. विविध ठिकाणच्या भटक्या जमातीतील शाळाबाह्य मुलांची पाहणी करून त्यांना शिक्षण दिले.२०१२ साली, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटिता, अविवाहित, अत्याचारग्रस्त अशा महिलांसाठी निवारागृह सुरू केले. कोल्हापुरात चार ठिकाणी निवारा केंद्रे आहेत. तेथे राहणाऱ्या काही आजारी, वृद्ध, मनोरुग्ण महिलांना जेवण, कपडे, औषधोपचार संस्था पुरवते. कामाचा व्याप वाढत आहे. अनेक कार्यकर्ते सहकार्य करत आहेत. कचरावेचकांचा विश्वास संपादन करून त्यांच्यासाठीही विविध उपक्रम सुरू केले आहेत. त्यांनी अनेक स्त्रियांना आधार दिला आहे. झंझावाती वळण, या लेखातून फुलनची जीवनकहाणी वाचकांसमोर उलगडते. गरीब, शेतकरी कुटुंबातील अल्पशिक्षित मुलगी, अल्पवयात झालेले लग्न, अनेक जबाबदाऱ्यांचे ओझे, अपंग मुलासाठी खाल्लेल्या खस्ता, नंतर त्याच्या निधनाने आलेले नैराश्य, यावर मात करत, आज खंबीरपणे, कणखरपणे फुलन आज आत्मविश्वासाने उभी आहे. ती इतरांसाठी जगते आहे. गरीब, गरजू, अन्यायग्रस्त महिलांची ती आधार आहे. प्रत्येकाच्या गरजेनुसार फुलन काम करते आहे. तिच्या कार्याचा विष्णुदास भावे सभागृहात, थोर सामाजिक कार्यकर्त्या, राणी बंग यांच्या हस्ते, हजारो महिलांच्या उपस्थितीत, 'उद्योजिका' पुरस्कार देऊन सन्मान केला गेला. भरारी जागतिक पटलावर, हा सुशीला साबळे यांचा जीवन प्रवास सांगणारा लेख विलक्षण प्रेरक आहे. १९७२च्या दुष्काळात, त्यांचे सारे कुटुंब जालना जिल्ह्यातून मुंबईत आले. घाटकोपर परिसरात राहू लागले. भंगार गोळा करून मिळेल त्या पैशात कसेतरी भागू लागले. भीक, उधारी यांचाही आधार घ्यावा लागला. १५ व्या वर्षी सुशीलाचे लग्न झाले. दारुडा नवरा मारझोड करायचा आणि सुशीलाच्या कमाईवर आयता बसून खायचा. २००० साली सुशीला स्त्रीमुक्तीसंघटनेच्या कचरावेचक गटात आल्या. सुशिलाताईंच्या नेतृत्वाखाली तीन हजार कचरावेचक महिलांचे संघटन झाले. खतनिर्मिती, बागकाम, इमारत स्वच्छता अशी कामे घेण्यास सुरुवात झाली. तीस वर्षांच्या अथक मेहनतीनंतर भारतीय कचरा वेचक आघाडीच्या प्रतिनिधी म्हणून जागतिक परिषदेत उपस्थित राहण्याची त्यांना संधी मिळाली आणि उपाध्यक्षपदही!

लढाई माणुसकीची, मळभ, कोर्टकेस, पूर्णविराम, मरण स्वस्त होत आहे!, हतबल, नशीब, थारा, खेळखंडोबा, अनाडी, जामीन, गिरमिट, भगिनीभाव हे लेख विलक्षण वाचनीय आणि कचरावेचक स्त्रियांच्या जीवनातील, विविध भीषण दुःखे वाचकांसमोर मांडणारे आहेत. हे सर्वच लेख वाचकाला अस्वस्थ आणि हतबल करतात. प्रचंड दारिद्र्य, कुटुंबातील भावंडांची मोठी संख्या, अल्प शिक्षण किंवा निरक्षरता,आजारपण, नादान मुले आणि दारुडा नवरा या साऱ्या यातना सोबत घेऊन या कचरावेचक महिला, जीवनात प्रगती साधण्याचा प्रयत्न करतात. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांची जगण्याची विलक्षण ऊर्मी वाचकाला थक्क करते. प्रा.वृषाली मगदूम यांनी कचरावेचक समाजामध्ये दीर्घकाळ काम केले आहे. या स्त्रियांचे अनेक प्रश्न सोडविण्यातील त्यांचे कार्य उल्लेखनीय आणि प्रशंसनीय आहे. त्यांचा सचित्र परिचय शेवटी दिला आहे. मलपृष्ठावर या पुस्तकाचे महत्त्व, प्रा.अजित मगदूम नेमक्या शब्दांत मांडतात. हे पुस्तक नितांत वाचनीय, अस्वस्थ आणि अंतर्मुख करणारे आहे. **

**पुस्तकाचे नाव : तुफानातल्या पणत्या**
**लेखिका : वृषाली मगदूम**
**९३२२२५५३९०**
**प्रकाशक : डिंपल पब्लिकेशन, नवघर, जि. पालघर**
**प्रथमावृत्ती : २० सप्टेंबर, २०२५**
**पृष्ठे : १८३, किंमत : रू. ३००/-**

# अल्गोरिदमिक युद्धाचे नवे युग

## मृत्यूचे नवे गणित

**आज जग ज्या वेगाने बदलत आहे, त्यात युद्धाची व्याख्याही बदलत आहे. पॅट्रियट क्षेपणास्त्रासारख्या महागड्या शस्त्रांच्या जोरावर केल्या जाणाऱ्या हल्ल्यांची जागा आता एका नव्या, अधिक भयानक आणि अधिक निर्दयी तंत्रज्ञानाने घेतली आहे. हे तंत्रज्ञान आहे 'अल्गोरिदमिक युद्ध'. युद्धभूमीवर शत्रूचा नायनाट करण्यासाठी आता मशीन लर्निंग, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रचंड डेटा सेंटरचा वापर केला जात आहे. हे तंत्रज्ञान ज्या थंडपणे, ज्या वेगाने आणि ज्या निर्दयतेने कार्यरत आहे, त्याने केवळ युद्धाचे स्वरूपच बदलून टाकले नाही, तर अमेरिका, इस्त्रायल आणि त्यांच्या खासगी कॉर्पोरेट कंपन्यांचा खरा चेहरा जगासमोर आणला आहे. हा चेहरा आहे रक्ताचा व्यापार करणाऱ्या भांडवलशाहीचा.**



राजन क्षीरसागर

**अमेरिकेचे 'डिजिटल एअर कंट्रोलर': मेव्हन स्मार्ट सिस्टम**

इराणविरुद्धच्या अलिकडील कारवायांमध्ये अमेरिकेने आपले हे नवे राक्षसी रूप दाखवून दिले. पेंटागॉनचा 'अल्गोरिदमिक युद्ध' कार्यक्रम म्हणून विकसित करण्यात आलेली 'मेव्हन स्मार्ट सिस्टम' ही केवळ एक सॉफ्टवेअर नसून, ती एक संपूर्ण हत्या यंत्रणा आहे. पालेंटीर सारख्या खासगी कंपनीने विकसित केलेली ही प्रणाली, अँथ्रोपिकच्या 'क्लॉड एआय' सारख्या मॉडेल्सच्या सहाय्याने कार्यरत आहे.

ही प्रणाली ड्रोन, उपग्रह आणि गुप्तचर यंत्रणांकडून मिळणाऱ्या पेटाबाइट्स माहितीचे विश्लेषण करते. मानवी डोळ्यांना न दिसणाऱ्या हालचाली, नमुने ओळखून ती संभाव्य लक्ष्यांची यादी तयार करते. केवळ लक्ष्यच नव्हे, तर त्यांचे अचूक भौगोलिक निर्देशांकठरवूनतीहल्ल्यांचीप्रक्रियाअविश्वसनीयरीत्या वेगवान बनवते. याच क्षमतेच्या जोरावर, 'ऑपरेशन एपिक फ्युरी' दरम्यान पहिल्या २४ तासांत हजारो लक्ष्ये ओळखण्यात आली. जे काम पूर्वी २,००० कर्मचारी अनेक महिने करायचे, ते काम आता केवळ २० सैनिक मिनिटांत करू शकतात. या वेगाचा अर्थ काय? याचा अर्थ, मृत्यू आता अधिक वेगाने, अधिक प्रमाणात आणि अधिक अचूकपणे पाठवला जाऊ शकतो.

**खामेनी आणि ४८ नेत्यांचा शिरच्छेद : अचूकतेचा क्रूर चेहरा**

या अल्गोरिदमिक युद्धाची भीषणता सर्वात भयानकरित्या उघडकीस आली ती इराणच्या सर्वोच्च नेत्यांवर झालेल्या हल्ल्यात. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे, अमेरिकेची सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी आणि इस्त्रायलची गुप्तचर यंत्रणा यांनी एकत्रितपणे केलेल्या अचूक माहिती संकलनाच्या जोरावर, तेहरानमधील एका सरकारी निवासस्थानावर हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातोल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला. त्यांच्यासोबत त्यांची मुलगी, जावई आणि नातू यांचाही मृत्यू झाला. हा हल्ला केवळ एका व्यक्तीवर नव्हता, तर तो इराणच्या संपूर्ण नेतृत्वाचा शिरच्छेद करणारा होता. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीच अभिमानाने सांगितले की, या पहिल्याच हल्ल्यात इराणचे ४८ नेते मारले गेले. यामध्ये क्रांतिकारी रक्षक दलाचे प्रमुख मोहम्मद पाकपूर, संरक्षणमंत्री अझीझ नासिरझादेह, लष्करी परिषदेचे प्रमुख अली शमखानी आणि अब्दोलरहीम मूसवी, गुप्तचर उपमंत्री मोहम्मद शिराझी यांसारख्या महत्त्वाच्या सैनिकी आणि सुरक्षा यंत्रणेतील शीर्ष नेत्यांचा समावेश होता.

न्यूयॉर्क टाइम्सच्या वृत्तानुसार, सीआयएने खामेनी आणि इतर वरिष्ठ नेत्यांच्या सभेची 'अचूक माहिती' इस्त्रायलला दिली, ज्यामुळे इस्त्रायलने रात्रीच्या हल्ल्याऐवजी सकाळची वेळ निवडून ही 'कामगिरी' पार पाडली. इस्त्रायली लढाऊ विमानांनी प्रदीर्घ अंतरापर्यंत मारा करणाऱ्या अचूक क्षेपणास्त्रांचा वापर करून स्थानिक वेळेनुसर सकाळी ९:४० च्या सुमारास ही हत्याकांड घडवून आणले. इस्त्रायलच्या संरक्षणमंत्र्यांनी ट्वीट केले की, ''इस्त्रायलचा नाश करू पाहणाऱ्या जुलमीचा नाश झाला.'' पण येथे एक महत्त्वाची बाब लक्षात घेतली पाहिजे. ही प्रणाली वापरताना अमेरिकेने सरकारी स्तरावरील बंदी झुगारून दिली. अँथ्रोपिक कंपनीचे क्लॉड एआय वापरण्यास मनाई असतानाही, 'तात्काळ पर्याय नाही' म्हणत पेंटागॉनने हे तंत्रज्ञान वापरले. हे दाखवते की अमेरिकेसाठी आंतरराष्ट्रीय कायदे आणि नैतिक बंधने केवळ कागदावरच आहेत. त्यांच्या साम्राज्यवादी महत्त्वाकांक्षेपुढे हे सर्व फिके आहेत.

**मिनाब येथील शाळेवरील हल्ला : १७० निरपराध मुलींची हत्या**

या अल्गोरिदमिक युद्धाची क्रूरता आणि नैतिकतेचा संपूर्ण भंग याचे सर्वात भयानक उदाहरण म्हणजे इराणमधील मिनाब शहरातील शाजरेह तय्येबेह नावाच्या प्राथमिक शाळेवर २८ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेला हल्ला. या हल्ल्यात सुमारे १७० निरपराध मुलींचा मृत्यू झाला. ही शाळा इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सच्या एका तळाशेजारी होती. व्हिडिओ आणि उपग्रह पुराव्यांनुसार, अमेरिकन उत्पादित टोमाहॉक क्षेपणास्त्र या शाळेजवळ आदळल्याचे दिसून आले. टोमाहॉक हे अमेरिकेने बनवलेले प्रदीर्घ अंतपर्यंत मारा करणारे क्षेपणास्त्र आहे आणि इराणकडे अशी क्षेपणास्त्रे नाहीत. या हत्याकांडानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी केलेले वक्तव्य अत्यंत धक्कादायक आणि अमानुष आहे. त्यांनी हा हल्ला इराणने स्वतः केला असल्याचा निराधार आरोप केला. पण सर्वात भयानक गोष्ट म्हणजे, या घटनेची चौकशी होईपर्यंत आपण थांबू, आणि त्या अहवालात काय असेल, ते मी स्वीकारायला तयार आहे असे ते म्हणाले. १७० निरपराध मुलींचा मृत्यू ही केवळ 'अहवालातील एक ओळ' बनून राहिली आहे, याचे हे पराकाष्ठेचे दारुण वास्तव आहे. तुर्कीचे राष्ट्राध्यक्ष रेसेप तय्यिप एर्दोगान यांनी या हत्याकांडाबद्दल शोक व्यक्त केला आणि 'निरपराध नागरिकांच्या हत्येबद्दल' दुःख प्रकट केले. युनायटेड नेशन्स आणि युनेस्कोने शाळांवरील हल्ल्यांना आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याचे संभाव्य उल्लंघन ठरवले आहे.

**इस्त्रायलची 'लॅव्हेंडर' प्रणाली : हत्येचे गणित**

अमेरिकेच्या या तंत्रज्ञानाचा जवळचा सहकारी म्हणजे इस्त्रायल. गाझावरील अमानुष हल्ल्यांमध्ये इस्त्रायलने 'लॅव्हेंडर' सारखी एआय प्रणाली वापरली. ही प्रणाली चुकीची लक्ष्ये निवडण्यासाठी कुप्रसिद्ध आहे. एआय मॉडेल्समध्ये 'भ्रम' निर्माण होण्याचा धोका असतो, आणि इस्त्रायलने या धोक्याची पर्वा न करता, केवळ गणिताच्या जोरावर हजारो नागरिकांना लक्ष्य केले. रुग्णालये, शाळा आणि निवासी इमारतींवर झालेले हल्ले हे याच भयानक वास्तवाची उदाहरणे आहेत. हे तंत्रज्ञान हे दाखवून देते की इस्त्रायलसाठी फिलिस्तिनी नागरिकांचा जीव केवळ एक आकडा आहे, एक 'डेटा पॉइंट' आहे.

**डेटा सेंटर : नवी रणभूमी, नवे लक्ष्य**

या संघर्षाने आणखी एक धोकादायक उदाहरण निर्माण केले आहे. इराणने अमेरिकेच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देताना बहरीन आणि संयुक्त अरब अमिरातीमधील अमेझॉन वेब सर्व्हिसेसच्या डेटा सेंटरवर हल्ला केला. जगात पहिल्यांदाच व्यावसायिक क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चरवर थेट लष्करी हल्ला झाला.

इराणने गूगल, मायक्रोसॉफ्ट आणि अमेझॉन सारख्या कंपन्यांना वैध लष्करी लक्ष्य घोषित केले, कारण या कंपन्यांची पायाभूत सुविधा अमेरिकन लष्करी कमांड आणि गुप्तचर माहितीला थेट समर्थन पुरवत होती. येथून एक भयानक सत्य उघडकीस येते. नेटफ्लिक्स पाहण्यासाठी किंवा ऑनलाइन शॉपिंग करण्यासाठी वापरला जाणारा डेटा सेंटर, तोच डेटा सेंटर अमेरिकेच्या मध्य पूर्वेतील लष्करी कारवायांचा कणा बनला होता. 'दुहेरी वापराची लक्ष्ये' या संकल्पनेने आता प्रत्यक्ष आकार घेतला आहे. आता केवळ सैनिकी तळच नव्हे, तर खासगी कंपन्यांचे सर्व्हर रूम देखील युद्धाचे मैदान बनले आहेत. ही कंपन्सी युद्धातून नफा कमावतात, आणि आता त्या स्वतःही या युद्धाच्या आगीत होरपळत आहेत. ही भांडवलशाहीची शोकांतिका आहे.

**कॉर्पोरेट कंपन्यांचा रक्ताने माखलेला हात : स्नोडेनचा इशारा आणि आजचे सत्य**

या संपूर्ण प्रक्रियेत अमेरिका, इस्त्रायल आणि भारत यांची सरकारे जितकी दोषी आहेत, तितक्याच दोषी आहेत या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अब्जावधी डॉलर्स कमावणाऱ्या खासगी कंपन्या. एडवर्ड स्नोडेनने २०१३ मध्येच या कॉर्पोरेट-सैनिकी संकुलाचा पर्दाफाश केला होता.

**पालेंटीर :** ही कंपनी 'मेव्हन स्मार्ट सिस्टम'ची निर्माती आहे. हिचे तंत्रज्ञान थेट हत्येसाठी वापरले जात असताना, कंपनीचे समभाग उसळ्या मारत आहेत.

**अँथ्रोपिक :** एआय सुरक्षेच्या नावाखाली उभ्या राहिलेल्या या कंपनीने आपले 'क्लॉड एआय' पेंटागॉनच्या हत्याकांडासाठी दिले. सरकारी बंदी असतानाही हा करार गुप्तपणे सुरू ठेवला गेला.

अमेझॉन, गूगल, मायक्रोसॉफ्ट : या कंपन्या आपले डेटा सेंटर अमेरिकन लष्कराला भाड्याने देतात. लष्कराला मिळणारे 'क्लाउड कॉम्प्युटिंग'चे पैसे आणि आपल्याकडून घेतल्या जाणाऱ्या सेवांचे शुल्क, हे दोन्ही या कंपन्यांच्या पोत्यात जाते. त्या युद्धाच्या नफ्यात भागीदार आहेत.

मेटा - फेसबुक : एडवर्ड स्नोडेनच्या खुलाशांमध्ये फेसबुक (आताचे मेटा) हे 'प्रिझम' कार्यक्रमातील एक प्रमुख भागीदार होते. स्नोडेनने सांगितले की, फेसबुकने ला वापरकर्त्यांच्या खाजगी संदेशांपासून ते फोटोंपर्यंत सर्व डेटाच्या बॅकएंडमध्ये थेट प्रवेश दिला होता. ही भागीदारी केवळ माहिती गोळा करण्यापुरती मर्यादित नव्हती, तर लाखो लोकांच्या सामाजिक जीवनाचा नकाशा तयार करून तो अमेरिकन गुप्तचर यंत्रणेच्या स्वाधीन करण्याचे काम होते. आज 'मेव्हन सिस्टम' जेव्हा एखाद्या व्यक्तीचे अचूक निर्देशांक काढते, तेव्हा त्यामागे फेसबुकसारख्या कंपन्यांनी गोळा केलेला दशकांचा डेटा असतो.

**ग्रुप :** इस्त्रायलची ही कंपनी 'पेगासस' स्पायवेअरची निर्माती आहे. भारतासह जगभरातील हुकूमशाही राजवटींना हे स्पायवेअर विकून ही कंपनी अब्जावधी डॉलर्स कमावते. भीमा कोरेगाव आरोपी, त्यांचे वकील आणि पत्रकार यांना लक्ष्य करण्यासाठी याच कंपनीच्या तंत्रज्ञानाचा वापर झाला. ग्रुप दावा करते की ती फक्त ''सरकारी गुप्तचर आणि कायदा अंमलबजावणी यंत्रणांना'' आपली उत्पादने विकते .

शेतकरी, कामगार, आदिवासी, दलित आणि सर्व कष्टकरी जनता या युद्धांचा आणि राजकीय दडपशाहीचा खरा खर्च भोगते. तिच्या मुलांचा बळी जातो, तिची घरे उद्ध्वस्त होतात आणि तिचे भवितव्य उद्ध्वस्त होते. या व्यापारी युद्धांना आळा घालण्यासाठी, या हत्यार उद्योगावर बंदी घालण्यासाठी, पाळत यंत्रणेच्या अतिरेकाविरुद्ध लोकशाही वाचवण्यासाठी आणि जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन संघर्ष करायलाच हवा. कारण, युद्ध आणि दडपशाही हा कोणताही प्रश्न सोडवण्याचा मार्ग नाही, तर तो केवळ मृत्यू, विनाश आणि असहायता पेरण्याचा व्यवसाय आहे. **

# नि|व|ड|क

## श्रेयसला पिंच्याक सिल्याट स्पर्धेत रौप्यपदक

**नागोठणे :** महर्षी दयानंद युनिव्हर्सिटी रोहतंग येथे दि. ९ ते १३ मार्च दरम्यान भरविण्यात आलेल्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी पिंच्याक सिल्याट चॅम्पियनशीप या स्पर्धेमध्ये संपूर्ण भारतातील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यामधील रोहा तालुक्यातील नागोठणे गावचा सुपुत्र कु.श्रेयस सचिन शेडगे याने गार्डन सिटी युनिव्हर्सिटी बंगलोर या युनिव्हर्सिटी कडून खेळताना सोलो या प्रकारात रौप्यपदक पटकविले आहे.




श्रेयसला लहानपणापासून पिंच्याक सिल्याट या खेळामध्ये आवड असून त्याने या खेळात जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय स्तरावर अनेक पदक प्राप्त केली आहेत. श्रेयस याला महाराष्ट्र पिंच्याक सिल्याट असोसिएशनचे सचिव व प्रमुख मार्गदर्शक मास्टर किशोर येवले यांचे मार्गदर्शन लाभले आहे. श्रेयस याने रौप्यपदक मिळविल्याबद्दल गार्डन सिटी युनिव्हर्सिटी बंगलोर तसेच महाराष्ट्रातील अनेक स्तरांतून श्रेयस यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## बुद्धिबळ स्पर्धेत रियाश अंतिम विजेता



**ठाणे :** इंटर स्कूल बुद्धिबळ स्पर्धा ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली मधील ३० शाळांनी भाग नोंदविला होता. त्यामध्ये डिवाइंड पॅराडाईज हायस्कूलचे अकरा विद्यार्थी सहभाग झाले होत. इयत्ता पहिली ते दुसरी स्पर्धेमध्ये संविधान केदारे तिसऱ्या क्रमांकाचा मानकरी ठरला. तसेच इयत्ता पाचवी ते सहावी स्पर्धेमध्ये डिवाईन पॅराडाईज हायस्कूल चिंचपाडा कल्याण शाळेचा विद्यार्थी रियाज चौगुले याने प्रथम क्रमांक मिळवून अंतिम विजेता ठरला. तर पिया नायर हिने तिसरा क्रमांक पटकावला. इयत्ता सातवी ते आठवी स्पर्धेमध्ये समयका गोरखनाथ केदारे हिने तिसरा क्रमांक पटकावला. स्पर्धेचे सर्वश्रेय डिवाइन पॅराडाईज हायस्कूलचे मुख्याध्यापक राजेश कुमार शर्मा, दत्ता पंची तसेच सर्व शिक्षकांना देण्यात आले.

## योगेशला पॉवरलिफ्टिंगमध्ये यश

**पुणे :** पिंपरी गुरव परिसरात राहणाऱ्या योगेश जांभुळकर यांनी दिल्लीत झालेल्या आशियन पॉवरलिफ्टिंग २०२६ मध्ये १ सुवर्ण आणि २ कांस्य पदकांची कमाई केली आहे. आशियाई स्तरावरील ७५ किलो वजनी गटात भारताचे प्रतिनिधित्व करत त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. योगेश यांनी दिल्लीतही आपले यश कायम राखले आहे. दिल्लीत झालेल्या आशियन पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत त्यांनी मास्टर गटात एक सुवर्ण आणि दोन कांस्य पदकांची कमाई केली आहे. महाराष्ट्राच्या विविध भागातील स्पर्धकांनी एकूण ५५ सुवर्णपदके पटकावून राज्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या स्पर्धेत आशिया खंडातील एकूण २५२ स्पर्धक सहभागी झाले होते. पाच देशांमधील या स्पर्धकांमध्ये महाराष्ट्रातील ३१ स्पर्धक होते. ही स्पर्धा 'वर्ल्ड रॉ पॉवरलिफ्टिंग फेडरेशन इंडिया' यांच्याकडून आयोजित करण्यात आली होती.

## क्रिकेट स्पर्धेत महाराष्ट्र पोलिसांना विजेतेपद

**मुंबई :** दुसऱ्या ऑल इंडिया पोलीस क्रिकेट स्पर्धेत महाराष्ट्र राज्य पोलीस संघाने दमदार कामगिरी करत अंतिम सामन्यात आरपीएफला नमवत विजेतेपद पटकावले. अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या लढतीत महाराष्ट्राने २० षटकांत २५१ धावांचा डोंगर रचत आपले जेतेपद निश्चित केले होते. कर्णधार सुनील पाटील, रोहित पोळ, योगेश पाटील, श्रीकांत लिंबोळे आणि योगेश शिंदे यांच्या धडाकेबाज फलंदाजीने महाराष्ट्राची धावगती वेगाने उसळली. २५१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना आरपीएफची सुरुवात चांगली झाली, मात्र रोहित बेहेरेच्या भेदक गोलंदाजीने सामना महाराष्ट्राच्या बाजूने झुकला. महाराष्ट्राचा कर्णधार सुनील पाटील स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला, तर अंतिम सामन्यात रोहित बेहेरेने मसामनावीराफ्च्या मान मिळवला. महाराष्ट्र पोलीस संघाच्या यशाबद्दल पोलीस महासंचालक सदानंद दाते, अतिरिक्त महासंचालक मधुकर पांडे, पोलीस महानिरीक्षक कृष्ण प्रकाश आणि प्रवीण पडवळ यांनी अभिनंदन केले. प्रशिक्षक रोहन बगाडे, संदेश चव्हाण तसेच निवड समितीचे संतोष कांबळे, एमसीएचे दीपक पाटील आणि नीलेश भोसले यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# आखाती युद्धाच्या आयपीएलला झळा

■ एका सामन्यासाठी २५०० लीटर डिझेलची गरज, खेळाडूंच्या प्रवासावरही परिणामाची शक्यता

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

आखाती युद्धामुळे युरोप, अमेरिका अर्थातच पश्चिमेकडील देशांतून येणाऱ्या परदेशातील क्रिकेटपटूंच्या प्रवासावर परिणाम होऊ शकतो. एवढेच नव्हे, तर एलपीजीचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा जाणवत असल्याचा हॉटेल उद्योगांवर विपरीत परिणाम होत आहे. त्यातच डिझेलचे भाव सातत्याने वाढत असल्याचेही आव्हान असेल, त्याचबरोबर या युद्धामुळे जाहिरातीच्या उत्पन्नावरही प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असल्याचे सूत्रांनी सांगितले. वर्ल्ड कप स्पर्धेची सांगता झाल्यानंतर इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज, झिम्बाब्वे प्रयाणाचा प्रश्न निर्माण झाला होता. आंतरराष्ट्रीय संघ असल्यामुळे या संघाच्या प्रयाणासाठी चार्टर विमानाची सोय करण्यात आली होती. मात्र,




आयपीएल खासगी आहे. त्यामुळे संबंधित देशांतील खेळाडूंच्या प्रवासासाठी चार्टर विमानाची सोय होणार नाही, याचा परिणाम खेळाडूंच्या आगमनावर मोठ्या प्रमाणावर होऊ शकेल.

तूर्तास अफगाणिस्तानमधील ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, श्रीलंका; तसेच खेळाडूंच्या सहभागाचा प्रश्न येणार नाही, असे सांगितले जात आहे. सध्या काही प्रमाणात विमानसेवा सुरू आहे. मात्र, त्यात कधीही प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

### जाहीरात उत्पन्नही घटणार?

आयपीएलचे सहपुरस्कर्ते, तसेच काही संघाचे सहपुरस्कर्ते पश्चिम आखातामधील कंपन्या आहेत. त्या कंपन्या पुरस्कृत राहण्याबाबत फेरविचार करू शकतात. त्यामुळे आयपीएलच्या उत्पन्नातही घट होऊ शकेल, असा अंदाज व्यक्त होत आहे.

### विद्युतझोताचाही प्रश्न

आयपीएलमधील ९० टक्के खेळ विद्युतझोतात होत असतो. दुपारी तीनची लढत असली तरीही सामन्याची सांगता विद्युतझोतात होत असते. एका आयपीएल सामन्यासाठी किमान दोन ते अडीच हजार डिझेल लागते. त्याशिवाय सरावाच्या वेळीही जनरेटरचा वापर होतो. युद्धामुळे हे डिझेल उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होऊ शकतो. गुवाहाटी (डॉ. भूपेन हझारिका स्टेडियम), बेंगळुरू (चिन्नस्वामी स्टेडियम), कटक (बाराबती स्टेडियम) येथे डिझेलच्या जनरेटरचा वापर होतो.

# अभिषेक, कौस्तुभची सुपर लीगसाठी निवड






| रायगड | क्रीडा प्रतिनिधी |

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने रायगड जिल्ह्यात गेल्या महिन्यात वरिष्ठ गटातील निवड चाचणी स्पर्धेतील सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. या आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेत रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघातील दोन प्रतिभावान जगदगती गोलंदाज अभिषेक खातू आणि कौस्तुभ म्हात्रे यांनी केलेल्या सुरेख खेळाच्या आधारावर त्यांची निवड पुढील होणाऱ्या सुपर लीगच्या सामन्यांसाठी करण्यात आली आहे. अभिषेक खातू यांची निवड सेक्रेटरी ११ संघात तर कौस्तुभ म्हात्रे यांची अध्यक्षीय ११ संघात करण्यात आली आहे. अभिषेक खातू यांनी साखळी फेरीतील पाच सामन्यात एकूण १८ गडी बाद केले, त्यामध्ये त्यांनी एका डावात ८ फलंदाज बाद करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले असून फलंदाजी करतांना त्यांनी एकूण १६१ धावा काढल्या त्यामध्ये दोन डावात त्यांनी ५० पेक्षा जास्ती धावा काढल्या आहेत. कौस्तुभ म्हात्रे यांनी रायगडच्या संघाकडून खेळतांना साखळी फेरीतील सामन्यात एकूण २२ फलंदाजांना बाद केले होते. दोन्ही युवा प्रतिभावान जलदगती गोलंदाजांनी आपल्या खेळाची छाप स्पर्धेतील सामन्यात पडल्यामुळे दोघांची निवड सुपर लीगच्या सामन्यांसाठी करण्यात आली आहे.दोन्ही खेळाडूंना भावी वाटचालीसाठी आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदीप नाईक यांच्या सह सर्व पदाधिकारी, सदस्य व क्रिकेट प्रेमींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# महाराष्ट्र केसरी कुस्तीच्या बोधचिन्हाचे अनावरण




| वाघोली | प्रतिनिधी |

मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी ६८ व्या 'महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धेच्या अधिकृत बोधचिन्हाचे अनावरण व मानाच्या गदेचे पूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याच्या हस्ते व राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत करण्यात आले. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने रामकृष्ण सातव पाटील यांच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन १८ ते २२ मार्चला वाघोलीत होणार आहे. याप्रसंगी योगेश दोडके, मेघराज कटके, रामकृष्ण सातव, अनिल सातव, कृष्णाजी बुचडे, नटराज सातव, सुनील जाधवराव, राहुल सातव, केतन जाधव, सागर सातव, महेश माने, मुकेश सातव, संदीप वारे, मयूर सातव आदी उपस्थित होते.

## पिंपळेश्वर स्ट्रायकर्स संघ विजयी

**बांदा :** येथील देऊळवाडी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत पिंपळेश्वर स्ट्रायकर्स संघाने अंतिम सामन्यात श्री स्वामी समर्थ माऊली वॉरियर्स संघाचा पराभव करत विजेतेपद पटकावले. विजेता व उपविजेता संघाला रोख रक्कम व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. विजेता पिंपळेश्वर स्ट्रायकर्स संघाचे संघमालक विठ्ठल मुळ्ये व दादा साळगावकर यांनी मान्यवरांच्या हस्ते चषक स्वीकारला, तर उपविजेता श्री स्वामी समर्थ माऊली वॉरियर्सचे संघमालक विराज परब व आबा धारगळकर यांनी चषक स्वीकारला. यावेळी अनेक वैयक्तिक बक्षिसे देण्यात आली.

# नाशिक, रत्नागिरी, मुंबई संघ उपांत्य फेरीत

| मुंबई | प्रतिनिधी |

स्वामी समर्थ क्रीडा मंडळाच्या राजाभाऊ देसाई स्मृती चषक राज्यस्तरीय स्थानिक पुरुष कबड्डी स्पर्धेत पहिल्या दिवसापासून धडाकेबाज खेळ करणाऱ्या नाशिकच्या ब्रम्हा स्पोर्ट्स क्लब आणि रत्नागिरीच्या वाघजाई क्रीडा मंडळाने दिमाखदार विजयासह उपांत्य फेरी गाठली. तसेच मुंबई शहरच्या एसएसजी फाऊंडेशन आणि मुंबई उपनगरच्या पार्ले महोत्सव स्पोर्ट्स अकादमीच्या संघांनीही जोरदार खेळ करत अंतिम चार संघात आपले स्थान पक्के केले. आता अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी ब्रम्हा विरुद्ध पार्ले महोत्सव आणि वाघजाई विरुद्ध एसएसजी अशा उपांत्य लढती खेळल्या जाणार आहेत. दोन्ही लढतीतील विजेते जेतेपदासाठी एकमेकांशी भिडतील.



स्पर्धेतील पहिल्या सामन्यापासून सुसाट असलेल्या ब्रम्हा स्पोर्ट्स क्लबने विजय क्लबचा अक्षरशः धुव्वा उडवत उपांत्य फेरी गाठली. या अत्यंत निरसवान आणि एकतर्फी सामन्यात प्रफुल झवरे, आकाश शिंदे, स्वयम मालोदे, रत्नेश पाटील यांच्या चढाई-पकडींच्या वेगवान खेळाने २९-११ अशी आघाडी घेत आपला विजय निश्चित केला. सेमीफायनलचे चार संघ निश्चित, पाहा वेळापत्रक.पंकज मोहितेचा दर्जेदार खेळअंकूर स्पोर्ट्स क्लब आणि एसएसजी फाउंडेशन यांच्यात थरारक संघर्ष पाहायला मिळाला. उत्तरार्धात पंकज मोहितेने एकापोठापाठ एक अशा भन्नाट चढाया करत एसएसजी संघाला पहिल्या १० मिनिटांतच ३२-२४ अशी आघाडी मिळवून देत सारा खेळच बदलला. एसएसजी संघाने ४२-२९ अशा फरकाने उपांत्य फेरी गाठली.

## इराणी फुटबॉलपटूंना ऑस्ट्रेलियाचा आश्रय

**नवी दिल्ली :** एएफसी आशियाई चषक स्पर्धेत राष्ट्रगीत न गाण्याच्या घटनेमुळे इराण महिला फुटबॉल संघाभोवती निर्माण झालेला वाद आता आंतरराष्ट्रीय पातळीवर पेटला आहे. या पार्श्वभूमीवर ऑस्ट्रेलियाने पुढाकार घेत इराणच्या पाच महिला फुटबॉलपटूंना मानवीय कारणावरून विशेष व्हिसा देत देशात आश्रय दिला आहे. या निर्णयामुळे इराणमध्ये निर्माण झालेल्या संतापाच्या लाटेतून या खेळाडूंना काहीसा दिलासा मिळाला आहे. ऑस्ट्रेलियाचे स्थलांतर मंत्री टोनी बर्क यांनी दिलेल्या माहितीनुसार, जहरा घनबारी, जहरा सरबली, फतेमेह पसंदिदेह, अतेफे रमजानजादेह आणि मोना हमौदी या पाच खेळाडूंना मानवीय व्हिसा देण्यात आला आहे. सध्या त्यांना सुरक्षितस्थळी ठेवण्यात आले असून त्या ऑस्ट्रेलियात राहू शकतात.

# श्रीराम मंदिर ट्रस्ट जगदंब खुटिल संघ विजयी

| महाड | प्रतिनिधी |

महाड तालुक्यातील शिवतेज मित्र मंडळ देऊळवाडी आंबवली यांच्यावतीने तालुका महाड ग्रामीण क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेतून सद्गुरु दत्ताराम तु. जगताप व समाजसेवक दिवंगत विश्वासभाऊ महिपत थोरे स्मृती चषक २०२६ भव्य टेनिस क्रिकेट स्पर्धा यांच्या स्मरणार्थ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

क्रिकेट स्पर्धेचे यंदाचे तिसावे वर्ष मोठ्या उत्साहात आणि आनंदात संपन्न झाल्या. तालुका महाड ग्रामीण क्रिकेट असोसिएशनचे २४ नोंदनीकृत क्रिकेट संघ या स्पर्धेत खेळले होते. सर्व सामने रोमहर्षक झाले होते.

या क्रिकेट स्पर्धेनिमित्ताने आलेल्या सर्व खेळाडूंची, सर्व प्रेक्षकांची व पाहुण्यांची व्यवस्था करण्यात आल्याचे आयोजकांनी




सांगण्यात आले. स्पर्धेचा निकाल श्रीराम मंदिर ट्रस्ट जगदंब खुटिल, उपविजेता: आशीर्वाद तुडील, तृतीय क्रमांक: जन्नीदेवी क्रिकेट संघ जुइ संघानी प्राप्त केला.

वैयक्तिक पारितोषिके: मालिकावीर: राहुल सुकुम (खुटिल), उत्कृष्ट गोलंदाज: शुभम (जुई), उत्कृष्ट फलंदाज: दिपेश बैकर (तुडील), बेस्ट कीपर: राहुल सुकुम (खुटिल), सिक्सर किंग: दिपेश बैकर (खुटिल), चौकार किंग: प्रवीण भावे (जुई) उत्कृष्ट क्षेत्ररक्षक: स्वप्नील चोरगे (छ. गेळ आंबवली), सर्वोत्कृष्ट खेळाडू: राहुल सुकुम (खुटिल) विशेष चषक: नारायण उमासरे (खुटिल) यांना देण्यात आली.

# बीसीसीआयतर्फे वार्षिक पुरस्कारांची घोषणा

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने वार्षिक पुरस्कार २०२६ घोषणा केली आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा नवी दिल्लीत १५ मार्च रोजी पार पडेल. पण त्याआधी पुरस्कार विजेत्या खेळाडूंची नावं बीसीसीआयने जाहीर केली आहेत. तीन दिग्गज खेळाडूंचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे, तर शुभमन गिल आणि स्मृती मानधना सर्वोत्तम खेळाडू ठरलेत.

भारतीय महिला संघाची स्टार खेळाडू ठरलेल्या स्मृती मानधनाला २०२४-२५ मधील सर्वोत्तम महिला क्रिकेटपटूचा पुरस्कार दिला जाणार आहे. ती तिसऱ्यांदा हा पुरस्कार स्वीकारेल. तिने २०२५ मध्ये महिला संघाला वनडे वर्ल्ड कप जिंकून देण्यात मोलाचा वाटा उचलला होता. तसेच भारताचा वनडे आणि कसोटी कर्णधार शुभमन गिलला सर्वोत्तम पुरुष क्रिकेटपटूचा पॉली उम्रीगर पुरस्कार दिला जाणार आहे.

जीवनगौरव पुरस्कार १९८३ वर्ल्ड कप विजेत्या भारतीय संघाचे सदस्य रॉजर बिन्नी आणि माजी क्रिकेटपटू व प्रशिक्षक राहुल द्रविड यांना सीके नायुडू जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला होता. भारताची दिग्गज महिला क्रिकेटपटू मिताली राज हिला देखील जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. बिन्नी यांनी खेळाडू, मार्गदर्शक आणि प्रशासकर अशा तीन क्षेत्रात काम करताना भारतीय क्रिकेटसाठी योगदान दिले आहे. त्यांनी भारताला १९८३ वर्ल्ड कप आणि १९८५ मधील वर्ल्ड चॅम्पियनशीप जिंकून देण्यात योगदान दिले होते. त्यांनी २०१२ ते २०१६ दरम्यान निवड समिती सदस्य म्हणूनही काम पाहिले होते.



राहुल द्रविडने १९९६ ते २०१२ दरम्यान भारतीय संघासाठी क्रिकेट खेळताना अनेक अविस्मरणीय खेळी केल्या. त्याने भारताचे नेतृत्वही केले. त्याने ६०५ आंतरराष्ट्रीय डावात ४८ शतकांसह २४२०८ धावा केल्या. भारतीय महिला क्रिकेटवर मिताली राजचाही मोठा प्रभाव राहिला. तिने १० वर्षांहून अधिक काळ भारतीय संघाचे नेतृत्वही केले. तिने वनडेत ७००० हून अधिक धावा केल्या असून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १० हजारांपेक्षा जास्त धावा केल्या आहेत. मुंबईची इरा जाधव हिला देशांतर्गत क्रिकेटमधील सर्वोत्तम महिला खेळाडूचा जगमोहन दालमिया ट्रॉफी पुरस्कार मिळणार आहे, तसेच शफाली वर्माला सिनियर वनडे स्पर्धेतील सर्वोत्तम महिला फलंदाज म्हणून पुरस्कार मिळेल. देशांतर्गत मर्यादीत षटकांच्या क्रिकेटमधील सर्वोत्तम अष्टपैलू पुरुष खेळाडूचा लाला अमरनाथ पुरस्कार मुंबईच्या आयुष म्हात्रेला मिळणार आहे, तर हर्ष दुबेला रणजी ट्रॉफी २०२४-२५ मधील सर्वोत्तम अष्टपैलूचा लाला अमरनाथ पुरस्कार मिळेल. मुंबई क्रिकेट असोसिएशनला बीसीसीआयच्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये सर्वोत्तम कामगिरीसाठी पुरस्कार मिळणार आहे. याशिवाय चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ आणि टी-२० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धा जिंकणारे भारतीय पुरुष संघ, २०२५ वनडे महिला वर्ल्ड कप जिंकणारा भारतीय संघ, १९ वर्षांखालील वर्ल्ड कप २०२६ विजेता भारतीय संघ यांचाही या पुरस्कार सोहळ्यात सन्मान केला जाणार आहे.

इटलीला हरवून अंतिम फेरीत प्रवेश | संघाच्या खेळाडूंची उत्कृष्ट कामगिरी

# भारतीय महिलांना विश्वचषकाचं तिकीट

| हैदराबाद | प्रतिनिधी |

भारतीय महिला हॉकी संघाने विश्वचषकासाठी पात्रता मिळवली आहे. विश्वचषक पात्रता फेरीच्या उपांत्य फेरीत भारताने इटलीचा १-० असा पराभव केला. इटलीविरुद्धच्या सामन्यात मनीषा चौहानने भारतीय संघाकडून एकमेव गोल केला. आता अंतिम फेरीत भारताचा सामना इंग्लंडशी होईल. यासह भारतीय महिला हॉकी संघ १५ ते ३० ऑगस्ट दरम्यान बेल्जियम आणि नेदरलँड्स यांच्या यजमानपदाखाली होणाऱ्या वर्ल्ड कपमध्ये सहभागी होईल.




इटलीविरुद्धच्या सामन्याबाबत, भारतीय मिडफिल्डर मनीषा चौहानने ४० व्या मिनिटाला गोल केला. पहिल्या क्वार्टरमध्ये दोन्ही संघांमध्ये जोरदार स्पर्धा झाली. भारताने पूर्ण ताकदीने दोनदा वर्तुळात प्रवेश केला, परंतु इटलीने जोरदार प्रतिआक्रमण केलं आणि गोल करण्याच्या अनेक संधी निर्माण केल्या. मात्र, भारतीय संघाच्या खेळाडूंनीही उत्कृष्ट कामगिरी दाखवली, पहिल्या क्वार्टरमध्ये इटलीला गोल करण्यापासून रोखलं.

दुसऱ्या क्वार्टरमध्ये २७ व्या मिनिटाला भारताला दुसरा पेनल्टी कॉर्नर मिळाला. यावेळी नवनीतचा शॉट गोलपोस्टवरुन चुकला. भारताला दोन्ही पेनल्टी कॉर्नर गोलमध्ये रुपांतरित करण्यात अपयश आले.

दुसऱ्या हाफच्या सुरुवातीला इटलीने जोरदार पुनरागमन केले. एमिलिया मुनिटिसनं एका भारतीय बचावपटूला हरवले, परंतु गोलकीपर बिचू देवी खारीबामनं शानदार खेळ केला. ४० व्या मिनिटाला भारताला आणखी एक पेनल्टी कॉर्नर मिळाला. यावेळी चौहानने भारतीय संघाला ब्रेकथ्रू दिला. मनीषाच्या शक्तिशाली शॉटने इटलीच्या बचावपटूंना भेदले. शेवटच्या क्वार्टरमध्ये भारतालाही दोन पेनल्टी कॉर्नर मिळाले, परंतु त्यांना यश आले नाही. शेवटच्या मिनिटात इटलीनं बरोबरी करण्याचा प्रयत्न केला, परंतु गोल करण्यात अपयश आले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)